अकोला । मंगळवार
दि. १० जून २०२५
वर्ष : १९ अंक : १००
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत**
बातम्यांचा गतिमान पाठलाग




www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये

## थोडक्यात

### रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा द्यावा – वर्षा गायकवाड



**मुंबई :** मुंब्रा स्थानकाजवळ घडलेल्या दुर्घटनेवरून विरोधक आक्रमक झाले आहेत. मुंबईतील रेल्वे नेटवर्क सुरक्षित नसल्याचा आरोप करत काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. यासंदर्भात वर्षा गायकवाड यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी ही अतिशय धक्कादायक आणि दु:खद घटना आहे. गर्दीमुळे रेल्वेतून चार प्रवासी खाली पडून मृत्यूमुखी पडले, पण हे पूर्णपणे टाळता येण्यासारखं होते. मुंबईतील रेल्वे नेटवर्क, मग ते उपनगरी असो वा लांबपल्ल्याच्या गाड्या असो, अजूनही सुरक्षित नसल्याचे या दुर्घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. वाढती गर्दी, व्यवस्थापनातील निष्काळजीपणा आणि अपु-या सोयीसुविधा यामुळे दररोज हजारो प्रवाशांचे प्राण धोक्यात येतात. हे प्रश्न आम्ही अनेकदा संसदेतही उपस्थित केले असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### राणाला नातेवाईकांशी एकदा बोलता येणार



**नवी दिल्ली :** दिल्लीतील पतियाळा न्यायालयाने २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वुर राणाला त्यांच्या कुटुंबीयांशी फोनवरुन एकदा बोलण्याची परवानगी सोमवारी दिली. विशेष न्यायाधीश चंदरजीत सिंह यांनी राणाला ही परवानगी दिली. फोनवरील संवाद तुरुंग नियमावलीनुसार आणि तिहार तुरुंग अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली असेल, असे न्यायाधीशांनी सांगितले. न्यायालयाने सोमवारपासून १० दिवसांच्या आत दहशतवादी राणाच्या प्रकृतीबाबत नवीन अहवाल मागितला आहे. राणाला नियमित फोन कॉल करण्याची परवानगी द्यावी की नाही यावर तुरुंग अधिकाऱ्यांकडून त्यांची भूमिका स्पष्ट करणारा अहवालही न्यायाधीशांनी सादर करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, दहशतवादी तहव्वूर राणा सध्या तिहार तुरुंगात आहे.

### डॉ. जब्बार पटेल यांना ‘शाहू पुरस्कार’



**कोल्हापूर :** यंदाचा प्रतिष्ठेचा शाहू पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट नाट्य दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना जाहीर करण्यात आला आहे. राजर्षी शाहू मेमोरियल ट्रस्टच्या वतीने दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराची घोषणा ट्रस्टचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केली. शाहू जयंतीदिनी (दि. २६) शाहू स्मारक भवन येथे मान्यवरांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे म्हणाले, डॉ. जब्बार पटेल यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला संवेदनशील आणि विचारप्रवृत्त करणारे चित्रपट दिले. त्यांचे नाट्य आणि चित्रपट दिग्दर्शन, सामाजिक मुद्द्यांवरील आशय आणि प्रयोगशीलता यामुळे त्यांना भारतीय चित्रपट आणि नाट्यसृष्टीत आदरणीय स्थान प्राप्त झाले आहे.

# रेल्वेतून १३ प्रवासी पडले, ४ जणांचा मृत्यू!

## विरोधकांकडून टिकेची झोड

**मुंबई, दि. ९ वृत्तसंस्था**



ठाण्यातील मुंब्रा रेल्वेस्थानकाजवळ घडलेल्या रेल्वे दुर्घटनेमध्ये १३ प्रवासी रेल्वेतून खाली पडले आणि त्यापैकी चार जणांना या दुर्घटनेत आपला जीव गमवावा लागला आहे. हा अपघात त्यावेळी घडला ज्यावेळी कसाऱ्याहून सीएसएमटीला जाणाऱ्या लोकलमध्ये प्रचंड गर्दी होती.

प्रवासी अक्षरश: दारात लटकून जात होते. यावेळी १३ प्रवासी खाली पडले आणि ४ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ठाण्यातील एका ४४ वर्षीय आयटी इंजिनिअरचाही मृत्यू झाला आहे. मयूर शाह असे या आयटी इंजिनिअरचे नाव असल्याची माहिती आहे. डोंबिवलीत स्वप्नातील घर घेण्यासाठी निघालेल्या मयूरचा हात घसरला आणि त्याचा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यासह, स्टेशनरीमध्ये काम करणारे राहुल शाह, जीआरपीएफ जवान विकी मुख्यदल आणि दिवा येथील २८ वर्षीय राहुल गुप्ता यांचा समावेश आहे. ही दुर्घटना मुंब्रा स्टेशनजवळच्या धोकादायक वळणावर झाली, ज्यावर अनेक वर्षांपासून तोडगा काढण्याची मागणी होत आहे.

**बाहेरच्या लोंढ्यांमुळे मुंबईची अवस्था बिकट राज ठाकरे :** मुंबईत बाहेरच्या राज्यातून येणारे लोंढे यामुळे मुंबईची अवस्था बिकट झाली असल्याचा आरोप महाराष्ट्र निर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केला आहे. मुंबईतील रेल्वे दुर्घटनेनंतर तरी रेल्वे मंत्र्यांनी या घटनेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. राज्यातील शहरांची अवस्था बिकट झाली असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. मुंबईतील गर्दी नवीन नाही, अशा वेळी रेल्वेमंत्री काय करत आहेत? हा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

**वाढती गर्दी मुख्य कारण शरद पवार :** मध्य रेल्वेवर दररोज सरासरी ६ ते ७ प्रवाशांचा लोकलमधून पडून मृत्यू होतो. एका आकडेवारीनुसार समोर आलेली ही माहिती अत्यंत चिंताजनक आहे. लोकल ट्रेन्समधील वाढती गर्दी याचे मुख्य कारण असल्याचे सर्वज्ञात आहे. तरीही, असे अपघात घडल्यानंतर प्रवाशांवरच त्यांच्या मृत्यूचे खापर फोडून चालणार नाही. केंद्रीय रेल्वे प्रशासनाने या दुर्दैवी घटनेची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. मध्य रेल्वेनेही वेळेचे **(पान २ वर)**

### मृतांच्या कुटूंबीयांना ५ लाख रुपये जाहीर

» मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ चौकशी करण्याच्या सूचना दिल्या असून अपघातात ज्या ४ जणांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटूंबीयांना मदत म्हणून आम्ही ५ लाख रुपये जाहीर केले आहेत. याशिवाय जखमींना ५० हजार, एक लाख किंवा दोन लाख रुपये दिले जातील. तसेच त्यांचा सर्व उपचार शासनाच्या माध्यमातून केला जाईल. याशिवाय ज्युपिटरला जे दोन रुग्ण गंभीर आहेत, त्यांचा सर्व खर्च शासन करेल, अशी माहिती गिरीश महाजन यांनी दिली आहे.

# महाराष्ट्र आणि हरियाणा विधानसभा; मतदार यादीचा डेटा जाहीर!

## राहुल गांधींचा आरोप : निवडणूक आयोगाचे मोठे पाऊल

**नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था**

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या तीव्र टीकेनंतर निवडणूक आयोगाने महाराष्ट्र आणि हरियाणा विधानसभा निवडणुकांचा २००९ ते २०२४ या कालावधीतील मतदार यादीचा डेटा जाहीर केला आहे.**




राहुल गांधी यांनी या निर्णयाचे स्वागत करत आयोगाने निष्पक्षतेकडे पहिले पाऊल उचलल्याचे म्हटले आहे. मात्र, त्यांनी आयोगाला डेटा डिजिटल आणि मशीन-वाचनीय स्वरूपात सादर करण्यासाठी निश्चित तारीख जाहीर करण्याची मागणी केली आहे.

राहुल गांधी यांनी ‘मॅच फिक्सिंग महाराष्ट्र’ या लेखातून २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हेराफेरी झाल्याचा गंभीर आरोप केला होता. ते म्हणाले की, भारतीय जनता पक्ष (भाजप) यापुढे बिहार विधानसभा निवडणुकीतही असाच ‘मॅच फिक्सिंग’चा डाव खेळेल. निवडणूक हेराफेरीमुळे जनतेचा संस्थांवरील विश्वास ढासळतो आणि लोकशाहीला धोका निर्माण होतो, असे त्यांनी नमूद केले.

त्यांनी सर्व भारतीयांना निवडणूक प्रक्रियेतील पुरावे तपासून स्वतः निर्णय घेण्याचे आणि सरकार तसेच संस्थांकडून उत्तर मागण्याचे आवाहन केले. भाजपनेही राहुल यांच्या टीकेवर तीव्र प्रतिक्रिया दिली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल यांनी पराभव स्वीकारल्याचे सांगत, त्यांना जमिनीवर येऊन तथ्ये समजून घेण्याचा सल्ला दिला.

भाजप आमदार राम कदम यांनी राहुल यांच्या वक्तव्याची तुलना परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्याशी केली, ज्याला प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचे वाटतात. काँग्रेस निवडणूक जिंकते तेव्हा ईव्हीएम आणि निवडणूक आयोग बरोबर असतात, असे त्यांनी उपरोधिकपणे म्हटले. या प्रकरणाने राजकीय वातावरण तापले असून, निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. राहुल यांच्या नव्या मागणीमुळे आगामी काळात डेटा सादरीकरणाची तारीख आणि त्याचे स्वरूप यावर चर्चा तीव्र होण्याची शक्यता आहे.

### संस्थेला बदनाम करण्याचा प्रयत्न : आयोग

» निवडणूक आयोगाने राहुल यांच्या आरोपांना ‘निराधार’ ठरवत खंडन केले. आयोगाने २४ डिसेंबर २०२४ रोजी काँग्रेसला दिलेल्या उत्तरात सर्व तथ्ये स्पष्ट केल्याचा दावा केला, जी माहिती त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. गैरमाहिती पसरवणे हा कायद्याचा अनादर असून, संस्थेला बदनाम करण्याचा प्रयत्न पूर्णपणे चुकीचा आहे, असे आयोगाने म्हटले.

# शासकीय अधिकाऱ्यावर गाडी घातल्यास मोक्का लावणार - अजित पवार

**पुणे, दि. ९ वृत्तसंस्था**



प्रशासकीय अधिकारी आपले काम करत असतात. अवैद्य वाळू उत्खनन रोखण्यासाठी आणि कारवाई करण्यास जातात. त्यावेळी काही मस्तवाल लोक त्यांच्यावर गाडी घालण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे अधिकाऱ्यांवर गाडी घालणाऱ्यांवर मोक्काची कारवाई केली जाणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित महसूल लोक **(पान २ वर)**

### ‘सीएसआर बोर्ड’ तयार करणार

» सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) कामाची गुणवत्ता आणि त्यातील लोकसहभाग मोजण्यासाठी महाराष्ट्र शासन लवकरच ‘सीएसआर स्कोअर बोर्ड’ तयार करणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. सीएसआरमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या कंपन्यांचा गौरव केल्याने इतरांना प्रेरणा मिळेल, असेही ते यावेळी म्हणाले. पवार म्हणाले की, सीएसआरच्या माध्यमातून विकासकामांना गती मिळत आहे. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि कॉर्पोरेट यांच्यातील त्रिसूत्री भागीदारी महत्त्वाची आहे. सीएसआर कंपन्यांना सिंगल विंडो सुविधा देऊन तातडीने परवानग्या देण्यासाठी सरकारचा प्रयत्न आहे.

# दोन वर्षात भारतातील रस्ते अमेरिकेसारखे होतील - नितीन गडकरी

**नवी दिल्ली, दि. ९ वृत्तसंस्था**



देशात मोदी सरकारला ११ वर्ष पूर्ण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपा देशभरात सरकारने केलेल्या कामांबद्दल माहिती देताना दिसत आहे. यादरम्यान भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी एका मुलाखतीत येत्या दोन वर्षांमध्ये भारतातील रस्ते तुलनेने अमेरिकेच्या बरोबरीचे होतील असे म्हटले आहे.

एएनआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत बोलताना गडकरी म्हणाले की, प्रश्न हा फ`सलिफ्टचा नाही, ते आधीच बदलले आहे. तुम्ही आत्ताच न्यूज रील पाहिली, मुख्य चित्रपट तर अजून सुरू व्हायचा आहे. पाईपलाईनमध्ये असलेले प्रकल्प वेगाने पिढे जात आहेत. आणखी दोन वर्षात तुम्ही पाहू शकाल की भारतातील रस्त्यांच्या पायाभूत सुविधा अमेरिकेसारख्या होतील. अमेरिकेतील काही लोक मला भेटले आणि म्हणाले, की आपल्या पायाभूत सुविधा या अमेरिकेपेक्षा चांगल्या आहेत, असेही गडकरी पुढे बोलताना म्हणाले. भविष्यात होऊ घातलेल्या प्रकल्पांबद्दल बोलताना गडकरी म्हणाले की, २५ ग्रीनफिल्ड एक्सप्रेसवे, एक ३,००० किमीचा पोर्ट कनेक्टिव्हिटी हायवे आणि धार्मिक पर्यटन सर्किट्सना जोडणाऱ्या १ लाख कोटी रुपये किमतीच्या रस्त्यांचे काम सुरू आहे . यावेळी गडकरी यांनी बौद्धीष्ट सर्किट्स आणि चार धाम यांना ऑल-वेदर रस्त्यांनी जोडण्याच्या योजनेबद्दलही भाष्य केले. आम्ही दिल्लीत असंख्य रोड तयार करत आहोत, ज्यामुळे दिल्लीहीन देहरादून दोन तास, दिल्ली ते अमृतसर ३.५ ते ४ तास, दिल्ली ते कटारा ६ तास, दिल्ली ते श्रीनगर ८ तासात, दिल्ली ते जयपूर २ तास, चेन्नई ते बंगळुरू २ तासात, बंगळुरू ते म्हैसूर १ तासात, मेरठ ते दि्लली ५० मिनिटात **(पान २ वर)**

# पत्नी सोनम हिनेच पती राजा रघुवंशीची सुपारी देऊन घडवून आणली हत्या!

**इंदौर, दि. ९ वृत्तसंस्था**



मेघालयमध्ये हनिमूनसाठी गेलेले सोनम रघुवंशी आणि राजा रघुवंशी बेपत्ता प्रकरणात धक्कादायक खुलासा झाला आहे. पत्नी सोनम हिनेच पती राजा रघुवंशी याची सुपारी देऊन हत्या घडवून आणल्याचे समोर आले आहे. मध्य प्रदेशातील तिघा जणांना सुपारी देण्यात आली होती. या प्रकरणात सोनमचा प्रियकर राज कुशवाहा देखील सामील असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

सोनम रघुवंशी आणि राजा रघुवंशी बेपत्ता झाल्याचं प्रकरण सध्या चांगलंच चर्चेत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनम रघुवंशीचे राज कुशवाहा नावाच्या व्यक्तीसोबत प्रेमसंबंध होते आणि त्यानेच राजा रघुवंशीची हत्या कट रचला होता. पोलिसांच्या तपासात समोर आले आहे की, राज कुशवाहा हा मध्य प्रदेशचाच रहिवासी आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राज या हत्याकांडाचा मास्टरमाइंड आहे. त्यानेच सोनमसोबत मिळून मध्य प्रदेशातील तीन जणांना राजा रघुवंशीच्या हत्येची सुपारी दिली होती. या सर्वांनी मिळून मेघालयमध्ये हनिमून दरम्यान राजा रघुवंशीची हत्या केली. त्यानंतर सोनम तिचा प्रियकर राज कुशवाहा सोबत पळून गेली. सोनम आणि राज हे दोघे उत्तर प्रदेशातील गाझीपूर येथे पोहोचले, जिथे पोलिसांनी त्यांना पकडले. राजा रघुवंशी आणि सोनम हे दोघे मध्य प्रदेशातील इंदूरचे रहिवासी होते. हनिमूनसाठी मेघालयला गेल्यानंतर ते दोघे २३ मे रोजी बेपत्ता झाले होते. त्यानंतर २ जून रोजी राजाचा मृतदेह चेरापूंजीजवळ सोहरारिम येथील एका दरीत सापडला. सोनम रघुवंशीला अटक केल्यानंतर पोलिसांनी मध्य प्रदेशातून राज कुशवाहा, तसेच हल्लेखोर विक्की ठाकूर, आनंद आणि आकाश यांना सागर येथून अटक केली. सोनम पकडली गेल्यानंतर पोलिसांनी तिला उपचारासाठी **(पान २ वर)**

# जगातील सर्वात मोठे कंटेनर जहाज भारतात दाखल!

## गौतम अदानींचा पुत्र करनची होतेय चर्चा

**तिरुवनंतपुरम, दि. ९ वृत्तसंस्था**




करन अदानी यांच्या नेतृत्वाखालील अदानी ग्रुपच्या विझिंजम इंटरनॅशनल सीपोर्टवर आज जगातील सर्वात मोठं कंटेनर जहाज दाखल झालं आहे. या घटनेमुळे केवळ विझिंजमच नाही तर भारताचं जागतिक समुद्री वाहतूक नकाशावरील महत्वाचं स्थान अधोरेखित झालं आहे.

विझिंजम पोर्टवर आगमन ही भारताच्या समुद्रवाहतूक क्षमतेतील एक क्रांतिकारी घटना मानली जात असून भविष्यात हे बंदर भारताला जागतिक ट्रान्सशिपमेंट हब बनवण्यात महत्वाची भूमिका बजावणार आहे. हे जहाज २४,३४६ इतक्या कंटेनरांची वाहतूक करण्यास सक्षम आहे. ही क्षमता आजवरच्या सर्व जहाजांपेक्षा अधिक असून, हे जहाज पहिल्यांदाच दक्षिण आशियात दाखल झालं आहे. मंगळवार, १० जूनपर्यंत हे जहाज बंदरात थांबणार आहे. करन अदानी हे उद्योगपती गौतम अदानी यांचे पुत्र आहेत. ते भारतातील सर्वात मोठ्या बंदर आणि लॉजिस्टिक्स कंपनी, अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. त्यांनी २०२४ मध्ये या पदाची धुरा स्वीकारली, त्याआधी ते कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. त्यांनी अमेरिकेतील पर्ड्यू युनिव्हर्सिटी येथून अर्थशास्त्रात पदवी प्राप्त केली. याशिवाय वर्ल्ड इकनॉमिक फोरमचे ते अजेंडा योगदानकर्ता आहेत. तिथे ते जागतिक व्यापार, लॉजिस्टिक्स आणि सस्टेनेबिलिटी यासंबंधी विचार मांडतात. प्रसिद्ध कॉर्पोरेट वकील सिरिल आमरचंद श्रॉफ यांची कन्या पारिधी **(पान २ वर)**

### भारत आणि विझिंजमसाठी मोठे पाऊल

» हे जहाज भारतात प्रथमच दाखल झालं असून, यामुळे भारत आता मोठ्या प्रमाणावर ट्रान्सशिपमेंट (मालाची पुनर्गठित वाहतूक) हाताळण्यासाठी सज्ज झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २ मे २०२५ रोजी या बंदराचं औपचारिक उद्घाटन करण्यात आलं होतं. तेव्हा बोलताना पंतप्रधान मोदींनी म्हटले होते की, आजवर भारतातील ७५ टक्के ट्रान्सशिपमेंट परदेशी बंदरांवर होते, ज्यामुळे देशाचं आर्थिक नुकसान होत होतं. विझिंजम बंदर हे चित्र बदलू शकतं.

# यंदाच्या गणेशोत्सवात पीओपी मूर्तीच्या निर्मितीवर बंदी नसेल!

**मुंबई, दि. ९ वृत्तसंस्था**



यंदाच्या गणेशोत्सवात शाडूची की प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूर्ती या वादाबाबत मुंबई हायकोर्टात सोमवारी झालेल्या सुनावणीत न्या. आलोक आराधे आणि न्या. संदीप मारणे यांच्या पीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला. पीओपी मूर्तीच्या निर्मितीवर बंदी नसेल, मात्र नैसर्गिक जलाशयात पीओपींच्या मूर्तीचं विसर्जन करण्यास हायकोर्टाने मनाई केली असून या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जूनला होणार आहे.

मुंबईत पीओपी मूर्तीवरील बंदी प्रकरणी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल झाली आहे. या याचिकेवर सोमवारी सुनावणी झाली. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने हायकोर्टात भूमिका स्पष्ट केली. सीपीसीबीच्या समितीने केलेल्या शिफारसींचा दाखलाही हायकोर्टात देण्यात आला. आमचा आक्षेप हा पीओपीच्या मूर्तीचं नैसर्गिक जलाशयात विसर्जन करण्यावर असून मूर्तीच्या निर्मितीला विरोध नाही. पीओपी मूर्तीचं विसर्जन हे कृत्रिम तलावातच झालं पाहिजे, असं सीबीसीबीएच्या वतीने हायकोर्टात सांगण्यात आले. सर्व बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यावर हायकोर्टातील न्या. मारणे आणि न्या. आराधे यांच्या पीठाने छोट्या पीओपी मूर्तीचा प्रश्न निकाली काढला. पीओपीच्या मूर्ती बनवण्यास आणि त्याच्या विक्रीवर कोणतेही निर्बंध नसतील. मात्र, या मूर्तीचं विसर्जन नैसर्गिक जलस्रोतात होणार नाही, असा निर्णय हायकोर्टाने दिला. यापूर्वी पीओपीच्या मूर्तीच्या तयार करणे, विक्री करणे यावर बंदी होती. ती बंदी आता हटवण्यात आली आहे. छोट्या मूर्तीचा प्रश्न निकाली निघाला असला तरी २० फुटावरील मूर्तीबाबत भूमिका स्पष्ट झालेली नाही. सुनावणीदरम्यान महाधिवक्ता डॉ. विरेंद्र सराफ यांनी पीठाला विनंती की, राज्य सरकारला २० फुटांपेक्षा उंच गणेश मूर्तीबाबत काही मोकळीक मिळू शकते का. या मूर्तीही आपल्या संस्कृतीचा भाग झाल्या आहेत. **(पान २ वर)**

## पान 1 वरून...

### रेल्वेतून १३ प्रवासी पडले, ...

उत्तम नियोजन करून त्यानुसार महत्वांच्या मार्गांवर लोकल फ ेऱ्या वाढवणे गरजेचे आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात. वारंवार होणाऱ्या अशा अपघातांना आळा घालण्यासाठी लोकल गाड्यांमध्ये स्वयंचलित दरवाजे बसवण्याच्या निर्णयाची विहित वेळेत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे, असे मत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी या अपघातानंतर मांडले.

**दु:खद बातमीतून देशाचे वास्तव- राहुल गांधी**

मोदी सरकार ११ वर्षे ''सेवेचे'' साजरे करत असताना, मुंबईहून आलेल्या दु:खद बातमीतून देशाचे वास्तव दिसून येते. भारतीय रेल्वे लाखो लोकांच्या जीवनाचा कणा आहे, परंतु आज ती असुरक्षितता, गर्दी आणि अराजकतेचे प्रतीक बनली आहे. सरकारने २०२५ बद्दल बोलणे थांबवले आहे आणि आता २०४७ ची स्वप्ने विकत आहेत. मी मृतांच्या कुटुंबियांबद्दल मनापासून संवेदना व्यक्त करतो, असे मत काँग्रेस विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी व्यक्त केले.

### शासकीय अधिकाऱ्यावर गाडी ...

अदालतीत ते बोलत होते. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावणकुळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी आदी उपस्थित होते. पवार म्हणाले, अशा लोकांची मस्ती कमी करण्याचे काम आम्ही करू. त्यांना चक्कीत टाकून पिसू. त्यांचा मस्तवालपणा उतरवण्याची धमक आणि ताकत सरकार मध्ये आहे. आता सरकार हे प्रत्यक्ष कृतीत आणणार आहे. तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी महसूली अधिकाऱ्यांना मल्टी पर्पज व्हेकिकल देण्याचे मान्य केले आहे.

### दोन वर्षात भारतातील रस्ते ...

पोहतचा येईल. आम्ही यासारखे आणखी २५ ग्रीन एक्सप्रेस हायवे तयार करत आहेत जसे की उत्तराखंड येथील हेमकुंड रोपवेज. आम्ही दिल्लीला वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाच्या समस्यांपासून मुक्त करण्यासाठी १.५ लाख कोटी रुपयांचे रस्ते बनवत आहोत, असे ते म्हणाले.

जम्मू आणि श्रीनगर यामध्ये ३६ बोगदे

आम्ही जम्मू आणि श्रीनगर यामध्ये ३६ बोगदे विकसित करत आहोत, ज्यापैकी २३ पूर्ण झाले आहेत आणि आणखी ४-५ बोगद्यांचे काम सुरू आहे. आम्ही पर्वतमाला योजनेअंतर्गत १५ रोपवे विकसित करत आहोत, याशिवाय ३५ मल्टी-मोडल लॉजिस्टिक्स पार्क देखील विकसित करत आहोत, असेही गडकरी म्हणाले.

### पत्नी सोनम हिनेच पती राजा ...

सदर हॉस्पिटलमध्ये पाठवले. सध्या तिला सखी वन स्टॉप सेंटरमध्ये ठेवण्यात आले आहे. हे सेंटर हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांसाठी आश्रयस्थान आहे. सोनम रघुवंशीने पोलिसांना दिलेल्या जबाबात सांगितले की, तिचे राज कुशवाहा नावाच्या व्यक्तीसोबत प्रेमसंबंध होते. राज कुशवाहा देखील या कटात सामील आहे.

### जगातील सर्वात मोठे कंटेनर ...

श्रॉफ यांच्याशी करन यांचा विवाह झालेला आहे. दाम्पत्याला अनुराधा नावाची एक मुलगीही आहे. अदानी पोर्ट्स अॅन्ड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक करन अदानी यांनी (पूर्वीचे ट्विटर) वर लिहिले आहे की, , जगातील सर्वात मोठं कंटेनर जहाज विझिंजम पोर्टवर येणं ही केवळ बंदरासाठीच नव्हे, तर भारताच्या जागतिक स्तरावर उदयाला येण्याची खूण आहे. ही आमच्या दूरदर्शी ध्येयाची सुरूवात आहे.

यावर पीठाने तोंडी सांगितले की, पीओपी मूर्तींचं विसर्जन हे नैसर्गित जलस्रोतांमध्ये होऊ नये याबाबत आम्ही ठाम आहोत. मोठ्या मंडळांनी कृत्रिम तलावांची निर्मिती करून त्यातच विसर्जन केलं तर चालू शकेल. यावर महाधिवक्तांनी सांगितलं की, जर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळं यासाठी तयार असतील तर राज्य सराकरचं काहीच म्हणणं नाही. याबाबत राज्यसरकारला ३ आठवड्याचा वेळ देण्यात आला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जूनला होणार आहे. पीओपी मूर्तींच्या निर्मितीवरच बंदी घालायचा निर्णय सर्वप्रथम १२ मे २०२० रोजी जाहीर करण्यात आला. पण कोरोनाकाळ आणि मूर्तिकारांचा विरोध पाहता पर्यावरण मंत्रालयाने निर्णयात एक वर्षाची सूट दिली. यानंतर १ जानेवारी २०२५ रोजी पुन्हा एकदा पीओपीच्या मूर्ती पूर्णपणे बंद होतील, असा निर्णय घेण्यात आला. मात्र, २०२५ उजाडला तरी या निर्णयाची कठोर अंमलबजावणी झालेली नाही. पीओपी मूर्तिकारांचे असे म्हणणे आहे की, पीओपी मूर्ती प्रदूष करत असल्यास सरसकट पीओपीवरच बंदी घातली पाहिजे. तसेच शाडूच्या मूर्तींसाठी शाडू मातीचा उपसा करावा लागतो आणि शेवटी यामुळेही पर्यावरणाला धोका पोहोचतो, बंदीमुळे राज्यातील हजारो मूर्तिकारांवर उपासमारीची वेळ येऊ शकते, असा दावा पीओपी मूर्तिकारांनी केला आहे.

पीओपी मूर्तीचा वाद काय?

समुद्रात, तलावात किंवा नदीत विसर्जन केल्यानंतर पीओपी मूर्तींची विटंबना होते. तसेच पीओपी आणि केमिकल मिश्रीत रंगांमुळे जलप्रदुषणातही भर पडते. याविरोधात ३० ऑगस्ट २०२४ रोजी पर्यावरणवादी रोहित जोशी आणि काही मूर्तिकारांनी याचिका दाखल केली आहे.

### यंदाच्या गणेशोत्सवात पीओपी मूर्तींच्या निर्मितीवर बंदी नसेल!

यावर पीठाने तोंडी सांगितले की, पीओपी मूर्तींचं विसर्जन हे नैसर्गित जलस्रोतांमध्ये होऊ नये याबाबत आम्ही ठाम आहोत. मोठ्या मंडळांनी कृत्रिम तलावांची निर्मिती करून त्यातच विसर्जन केलं तर चालू शकेल. यावर महाधिवक्तांनी सांगितलं की, जर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळं यासाठी तयार असतील तर राज्य सराकरचं काहीच म्हणणं नाही. याबाबत राज्यसरकारला ३ आठवड्याचा वेळ देण्यात आला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जूनला होणार आहे. पीओपी मूर्तींच्या निर्मितीवरच बंदी घालायचा निर्णय सर्वप्रथम १२ मे २०२० रोजी जाहीर करण्यात आला. पण कोरोनाकाळ आणि मूर्तिकारांचा विरोध पाहता पर्यावरण मंत्रालयाने निर्णयात एक वर्षाची सूट दिली. यानंतर १ जानेवारी २०२५ रोजी पुन्हा एकदा पीओपीच्या मूर्ती पूर्णपणे बंद होतील, असा निर्णय घेण्यात आला. मात्र, २०२५ उजाडला तरी या निर्णयाची कठोर अंमलबजावणी झालेली नाही. पीओपी मूर्तिकारांचे असे म्हणणे आहे की, पीओपी मूर्ती प्रदूष करत असल्यास सरसकट पीओपीवरच बंदी घातली पाहिजे. तसेच शाडूच्या मूर्तींसाठी शाडू मातीचा उपसा करावा लागतो आणि शेवटी यामुळेही पर्यावरणाला धोका पोहोचतो, बंदीमुळे राज्यातील हजारो मूर्तिकारांवर उपासमारीची वेळ येऊ शकते, असा दावा पीओपी मूर्तिकारांनी केला आहे.

पीओपी मूर्तीचा वाद काय?

समुद्रात, तलावात किंवा नदीत विसर्जन केल्यानंतर पीओपी मूर्तींची विटंबना होते. तसेच पीओपी आणि केमिकल मिश्रीत रंगांमुळे जलप्रदुषणातही भर पडते. याविरोधात ३० ऑगस्ट २०२४ रोजी पर्यावरणवादी रोहित जोशी आणि काही मूर्तिकारांनी याचिका दाखल केली आहे.

# माध्यमांनी माझ्या वक्तव्याचा विपर्यास करू नये -संजय राठोड

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**मुंबई, दि.९:** माध्यमांनी माझ्या वक्तव्याचा विपर्यास करू नये, अशी परखड प्रतिक्रिया राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी दिली आहे. रविवारी नांदेड येथील बंजारा समाजाच्या संवाद मेळाव्यात आपण केलेल्या वक्तव्याचा काही माध्यमांनी विपर्यास करून, माझा उद्धव ठाकरे गटाशी संबंध असल्याच्या बातम्या दिल्या आहेत. प्रत्यक्षात मी असा कोणताही दावा अथवा विधान केलेले नाही. माझा विश्वास महायुती सरकारवर व शिवसेना व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरच आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

मंत्री संजय राठोड रविवारी नांदेड येथील बंजारा समाजाच्या संवाद बैठकीत सहभागी झाले होते. या बैठकीत त्यांनी बंजारा समाजाच्या विविध समस्या आणि उपाययोजना यावर भाष्य केले. त्यावेळी बंजारा भाषेत बोलताना, राज्यातील राजकीय परिस्थिती वेगळी असली तरीही राज्याच्या विकासासाठी नेत्यांमध्ये मतभेद नसावेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. बंजारा समाजातील बांधवांनी आपण कोणत्या पक्षात काम करतो, यापेक्षा समाजाच्या प्रगतीचा विचार केला पाहिजे, असे सांगताना त्यांनी वरिष्ठ पातळीवर मोठे नेते एकमेकांच्या संपर्कात असतात. इतकेच नव्हे तर विकासात्मक व धोरणात्मक मुद्यांवर एकमेकांना सहकार्य देखील करतात, असे ते म्हणाले. उदाहरण देताना शरद पवार साहेब आणि उद्धवजी ठाकरे यांचे त्यांनी उदाहरण दिले. सत्ताधारी व विरोधी पक्षातील नेते धोरणात्मक मुद्यांवर एकमेकांच्या संपर्कात असतात, असे त्यांना म्हणायचे होते. विकासकामे आणि राज्याच्या प्रगतीच्या मुद्यावर नेते एकमेकांशी बोलत असतात, तसेच समाजहिताच्या दृष्टिकोनातून तुम्ही सुद्धा पक्ष वेगळेअसले तरी एकमेकांशी संवाद ठेवावा, असे मंत्री संजय राठोड यांना म्हणायचे होते. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्क असल्याचा गैरसमज पसरवणे चुकीचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

> शिवसेना प्रमुख व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर माझा पूर्ण विश्वास असून, महायुती सरकारच्या माध्यमातून राज्याचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. विरोधकांना यातून पोटशूळ होत असल्याने माध्यमांना हाताशी धरून अफवा पसरविण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. माध्यमांनी कोणत्याही बातम्या प्रसिद्ध करताना त्याची खात्री करूनच बातमी द्यावी. कोणत्याही नेत्यावर विनाकारण टिप्पणी करू नये, अशी विनंतीही त्यांनी माध्यमांना केली आहे. आम्ही महायुती सरकार म्हणून राज्याला नवी दिशा देत आहोत. मात्र विरोधकांकडे कोणतेही विकासाचे मुद्दे नसल्यामुळे अशा पद्धतीचे राजकारण केले जात आहे. त्यामुळे अशा चुकीच्या बातम्यांकडे नागरिकांनी व माध्यमांनी दुर्लक्ष करावे, असे आवाहनही मंत्री संजय राठोड यांनी यावेळी केले.

## विदर्भ पाणी परिषदेत शाश्वत शेती विकासाच्या संकल्पनेवर भर
## डॉ. शरद गडाख आणि आ. संजय कुटे यांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि.९:** विदर्भातील शाश्वत शेती व जलसंपत्तीच्या समतोल व्यवस्थेसाठी ''शाश्वत विकासासाठी काटेकोर पाणी नियोजन आणि एकात्मिक शेतीपद्धती अत्यावश्यक'' असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. तर, ''विदर्भातील खारपाणपट्टा नष्ट करून सुपीक शेतजमीन तयार करणे हेच शाश्वत विकासाचे दिशासूचक पाऊल आहे,'' असे मत आमदार डॉ. संजय कुटे यांनी व्यक्त केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि जनकल्याणकारी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विदर्भातील कृषीयोग्य पाणी : सद्यस्थिती, समस्या आणि उपाययोजना या विषयावरील तीन दिवसीय विदर्भ पाणी परिषदेत प्रमुख मार्गदर्शन करताना हे विचार मांडण्यात आले.

डॉ. गडाख यांनी अध्यक्षीय भाषणात म्हटले की, विदर्भात शेतीयोग्य जमीन भरपूर असली तरी सिंचनाखाली येणारी जमीन केवळ ३० टक्क्यांपर्यंतच मर्यादित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीसोबत पूरक व्यवसायही स्वीकारावा. खरीप व रब्बीचे योग्य नियोजन आणि आधुनिक सिंचन पद्धतीचा अवलंब केल्यास शेतीच्या उत्पादकतेत वाढ होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

खारपाणपट्ट्याचे गंभीर परिणाम व उपाययोजना

आ. डॉ. संजय कुटे यांनी बुलडाणा, अकोला, अमरावती या खारपाणपट्ट्याच्या जिल्ह्यांचा उल्लेख करून कळमखेडसारख्या गावांतील किडनी रोग, क्षारयुक्त पाणी आणि टीडीएस वाढीचा धोका अधोरेखित केला. त्यांनी सांगितले की, ''जलयुक्त शिवार योजना, स्काडा योजना व आरओ प्लांट्स यांच्या माध्यमातून २०२५ च्या अखेरपर्यंत प्रत्येक वाडी-वस्तीत शुद्ध पेयजल उपलब्ध होणार आहे.ते पुढे म्हणाले की, २०१४ पासून सुरू झालेल्या विविध पाणलोट व्यवस्थापन योजनांमुळे ६-७ वर्षांत खारपाण पट्टा समूळ नष्ट करण्याचे उद्दिष्ट असून, मेगा रिचार्ज प्रकल्पाद्वारे २० टीएमसी पाणी साठवले जाईल. जल व्यवस्थापनातून कृषी समृद्धी परिषदेत तज्ञ वक्ते डॉ. महेंद्र देशमुख यांनी आधुनिक सिंचन पद्धती ठिबक व तुषार सिंचन याविषयी माहिती दिली. भारतात ८२% पाणी शेतीमध्ये वापरले जात असल्याने जल व्यवस्थापनात काटेकोर नियोजन करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रगतिशील शेतकरी आनंदराव राऊत यांनी कमी पाण्यात जास्त उत्पादन घेण्यासाठीच्या तंत्रांचा अनुभव उपस्थितांसोबत शेअर केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय इलोरकर यांनी केले. प्रमुख उपस्थितीत डॉ. सुभाष कोंडावार, डॉ. महेंद्र देशमुख, डॉ. नितीन मेहेत्रे, सुमंत पुणतांबेकर यांचा समावेश होता.

## प्रा. अजहर हुसेन विदर्भ कॅरम असोसिएशनचे चीफ पेट्रॉन!



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि.९:** ऑल इंडिया कॅरम फेडरेशनचे चीफ पेट्रॉन माजी आमदार गिरीश व्यास यांची विदर्भ कॅरम असोसिएशनच्या अध्यक्षपदी तर माजी मंत्री प्रा. अजहर हुसेन चीफ पेट्रॉन म्हणून निवड करण्यात आली.

अ. भा. कॅरम फेडरेशन अंतर्गत झालेल्या निवडणुकीत उपाध्यक्षपदी संदीप पुंडकर, सचिवपदी प्रभजीतसिंग बछेर, कोषाध्यक्षपदी अॅड. सुभाष मुंगी यांची निवड करण्यात आली. असोसिएशनच्या सहसचिवपदी हनीफ मोहम्मद तर कार्यकारी सदस्य म्हणून अॅड. सुभाषसिंह ठाकूर, अॅड. सुमेध मुंगी. जिब्राईल दिवान, अय्युब शाह उस्मान शाह, विलास मुकादम, तनवीर अहमद खान, विदर्भ कॅरम असोसिएशनचे आयोजक म्हणून इकबाल मोहम्मद तर कोच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय खेळाडू नवल मेश्राम यांची नियुक्ती कार्यकारी मंडळाच्या सभेत करण्यात आली. हॉटेल जसनागरा येथे झालेल्या सभेत प्रा. अजहर हुसेन यांनी असोसिएशनच्या अध्यक्षपदाची सूत्रे गिरीश व्यास यांना सोपविली. या निवडूक सभेचे संचालन बछेर यांनी तर आभार पुंडकर यांनी मानले.

## शारीरिक सुखाची केली मागणी; औष्णिक विद्युत केंद्रातील घटना

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**बाळापूर, दि.९:** एका महिलेला शारीरिक सुखाची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार तक्रारीनंतर समोर आला आहे. गेल्या दीड महिन्यापासून मुलाचा पगार मागायला आई गेल्या नंतर पारस औष्णिक विद्युत केंद्रात गेली असता संबंधित कर्मचाऱ्यांनी त्या आईला शरीर सुखाची मागणी केली.

पीडित महिलेचा मुलगा हा पारस औष्णिक विद्युत केंद्रात संजय देशमुख व सचिन जोशी राहणार औष्णिक विद्युत केंद्र पारस यांच्याकडे काम करत होता गेल्या दीड महिन्यापासून मुलाचा पगार न दिल्यामुळे रोखलेल्या पगाराची रक्कम मागण्यासाठी महिला गेली असता ५ जून रोजी संजय देशमुख कडे विनंती केली केली असता देशमुख यांनी एक महिलेचा हात पकडून हात जोडायचे काम नाही फक्त आम्हाला खुश करा आम्ही तुमचे पुढचे सगळे काही कामे पगारापेक्षा जास्त करून देऊ असे सांगत पीडित महिलेच्या अंगावर हात टाकण्यास सुरुवात केली.परिस्थितीचा फायदा घेऊन सचिन उर्फ गोलू देशमुख आणि साडी ओढून जबरदस्ती केल्याचा प्रकार पीडित महिलेने आधी ओरडाओरड केल्यानंतर ती पीडित महिला घाबरलेल्या अवस्थेत घरी पोहोचली. याप्रकरणी फिर्यादीवरून संजय देशमुख सचिन जोशी पारस औष्णिक विद्युत केंद्र येथील या दोघांवर बाळापुर पोलीस स्टेशन गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास बाळापुर पोलीस स्टेशनचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज कांबळे व त्यांची टीम करीत आहे.

## अकोट विधानसभा उपजिल्हाप्रमुखपदी संजय अढाऊ यांची निवड

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**तेल्हारा, दि.९:** राज्याचे उपमुख्यमंत्री शिवसेना नेते ना.एकनाथ शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना उपनेते माजी आमदार गोपीकिशनजी बाजोरिया आ. विप्लव बाजोरिया , शिवसेना जिल्हाप्रमुख नारायणराव गव्हाणकर चंद्रशेखर पांडे गुरुजी युवासेना जिल्हा प्रमुख निखिल ठाकुर नितीन मानकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात अकोट विधानसभा शिवसेना उपजिल्हाप्रमुख पदी मा.जिल्हा परीषद सदस्य संजय अढाउ यांची अकोला जिल्हा संपर्कप्रमुख गोपिकीशन बाजोरिया साहेब जिल्हा प्रमुख नारायणराव गव्हाणकर यांच्या हस्ते शिवसेनेचा अकोला जिल्हा मेळाव्यात नियुक्ती पत्राद्वारे निवड करण्यात आली .यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख प्रविण वैष्णव शहर प्रमुख अनिकेत ढवळे यांच्या सह उपशहरप्रमुख निखिल हिवराळे उपतालुकाप्रमुख आदित्य अग्रवाल युवासेना तालुका प्रमुख प्रसाद देशमुख सुधाकर होगे माजी सरपंच कोठा अनिल घोगले ग्रा.प. सदस्य माळेगाव बाजार राजेश अढाउ विनोद तायडे ग्रा.प. सदस्य माळेगांव बा. राजु पा. मनतकार मा. सरपंच मनात्री योगेश वाघ ग्रा प सदस्य वाडी अदमपुर अकुंश वाघोडे मनात्री राहुल बोडखे निंभोरा ग्रा.प. सदस्य शाम वाघमारे वडगाव रोठे श्याम डिगांबर जाधव वाडी अदमपुर राजीव अढाउ गोंविदा कुकडे माळेगांव बाजार य निखिल ठाकुर हरीओम अवचार दीनेश छांगाणी शिवराम गिरी अप्पु भटकर मयुर वर्मा यांच्या सह तेल्हारा तालुका व शहरातील आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

## जाहीर निवेदन

**शासकीय कार्यालय बाविप्रयअ (ग्रा) अकोला या कार्यालयाचा जाक्र/एबाविसेयो/कावि ८५/२०२५ दि. ०६/०६/२०२५ प्रमाणे सदरील कार्यालयास वाहन भाड्याने (किमान महिना १५०० किमी प्रमाणे) वाहक क्षमता मिळणेकरीता मागणी करण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी रकमेचे कोटेशन भरून सर्व कागदपत्रांसह या कार्यालयास दि. ०६/०६/२०२५ ते १६/०६/२०२५ पर्यंत सादर करावे.**

## मंगलाक्षी इव्हेंट्स संचालिका मीनाक्षी राजेंद्र फिरके कामावर विश्वास केल्याने झाल्या यशस्वी!

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि.९:** जीवनातील प्रत्येक उतार चढाव बघत दृढ निश्चय आणि आव्हानामधून उठून आपला आदर्श न डगमगता फक्त कामावर विश्वास ठेवून काम करत आहे.१० वर्ष नामवंत मीडिया मध्ये काम करून आत्मविश्वास सोबत चांगलाच जनसंपर्क वाढला.महिलांसाठी बरेच नवीन कार्यक्रम घेत त्यांचा विश्वास संपादित केला , नोकरी सोडल्यावर साधारण कुटुंबातील काही कलाकार महिला सोबत जोडल्या आणि मंगलाक्षी इव्हेंट्स नावाने डोहाळे जेवण, बारसे , वाढदिवस सारखे कार्यक्रम सोबत सुत्र संचालन सुरू केले, आज सांगताना गर्व होतो मंगलाक्षी इव्हेंट्स नी आत्तापर्यंत १६० च्या वर कार्यक्रम केले. पारंपारिकता जपत त्याला आधुनिकतेची जोड देत फक्त अकोलाच नव्हे मुंबई, पुणे, नागपूर, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम जळगाव पर्यंत आम्ही आमच्या कलेची चुणूक दाखविली.

मणप्पुरम | घर फायनान्स लि.

**मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड पूर्वी**
**मनप्पुरम होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड**
CIN : U65923KL2010PLC039179

नोंदणीकृत कार्यालय: IV/470A (जुने) W/638A (नवीन) मणप्पुरम हाऊस वलपद त्रिशूर, केरळ 680567
कॉर्पोरेशन ऑफिस: मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट क्रमांक ३०१ ते ३१५, ए विंग, 'कनकिया वॉल स्ट्रीट', अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३, महाराष्ट्र. फोन क्रमांक: ०२२-६६२११०००, वेबसाइट: www.manappuramhomefin.com

**मागणी सूचना**

मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, ज्याचे नोंदणीकृत कार्यालय IV/470A (जुने) w/638A (नवीन), मणप्पुरम हाऊस, वलपॅड, त्रिशूर, केरळ-680567 येथे आहे आणि भारतातील विविध ठिकाणी शाखा आहेत (यापुढे "MAHOFIN" म्हणून संदर्भित) ही कंपनी कायदा, 1956 अंतर्गत नोंदणीकृत कंपनी आहे आणि वित्तीय मालमत्तांचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002 (यापुढे कायदा म्हणून संदर्भित) च्या कलम 2 च्या उप-कलम (1) च्या कलम (m) च्या उप-कलम (iv) च्या अर्थाने एक वित्तीय संस्था आहे जी सरकारने 18 डिसेंबर, 2015 रोजी जारी केलेल्या अधिसूचना क्रमांक S.O. 3466 (E) सह वाचली जाते. भारत सरकार, वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली, इतर गोष्टींबरोबरच बांधकाम आणि/किंवा निवासी युनिट्स खरेदी करण्यासाठी कर्जे अग्रिम करण्याचा व्यवसाय करत आहे आणि खाली नमूद केलेल्या चार्टच्या कॉलम क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/सह-कर्जदारांनी MAHOFIN कडून कर्ज घेतले आहे आणि MAHOFN हा SARFAESI कायद्यांतर्गत सुरक्षित कर्जदार असल्याने आणि सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम २ सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/सह-कर्जदारांना नोटिसमध्ये नमूद केलेली रक्कम पुढील व्याजासह परत करण्याचे आवाहन करणारी मागणी नोटिस जारी केली आहे. नोटिसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, परंतु विविध कारणांमुळे त्यापैकी काहींना नोटिस बजावता आल्या नाहीत. त्याव्यतिरिक्त, खाली सूचीबद्ध केलेल्या कर्जदारांच्या माहितीच्या उद्देशाने, सदर कर्जदारांना या सार्वजनिक सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे.

| क्र. क्र. | कर्जदार/सह-कर्जदार/लॅन/शाखेचे नाव | ज्या हितसंबंधासाठी स्थापन करण्यात आले आहे त्या सुरक्षित मालमत्तेचे वर्णन | NPA तारीख | सूचना पाठविण्याची तारीख आणि थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | शांतकला शैलेश पारधी शैलेश छोटेलाल पारधी छोटेलाल धोंडू पारधी शामकाल छोटेलाल पारधी / MLAP0006005074/Nagpur | गावठाण ग्रामपंचायत घर/मालमट्टा क्रमांक ५२०/१ चे सर्व जमीन आणि पार्सल ५३.४१ चौ.मी. (५७५ चौ.फूट) मौजा-सिहोरा, तहसील तुमसर, जिल्हा भंडारा, महाराष्ट्र, पिनकोड: ४४१९१५ येथे स्थित. पूर्व-दिलीप बिसाणे यांचे घर, पश्चिम-ग्रामपंचायत रोड, दक्षिण-उर्मिला पारधी यांचे घर, उत्तरेकडे-रमेश गौतम यांचे घर | १६-०५-२०२५ | २१-०५-२०२५ आणि रु.२२७६७९/- |
| 2 | बेबी खरात, नंदकिशोर काशिनाथ खरात, नीलेश नंदू खरात / MA90MHLONS000005008489/अकोला | मौजे चिखली भाग-१ क्षेत्र सर्वेक्षण क्रमांक ८०/१, जुनी मालमत्ता क्रमांक १९७ नगर परिषद नवीन मालमत्ता क्रमांक z2w4013644 प्रभाग क्रमांक ४ एकूण एकूण ९४.७९ चौ.मीटर (१०२०.०० चौ.फूट) आहे. नगरपालिका चिखली तहसील चिखली आणि जिल्हा भुलढाणा, पिन: ४४३२०१, महाराष्ट्र पूर्व-सेवा मार्ग ५ चौ.फूट, पश्चिम-रस्ता, दक्षिण-अनुराधा संजय गाडे यांची जमीन, उत्तर-मालकांची जमीन | १६-०५-२०२५ | २१-०५-२०२५ आणि रु.३३९६२०/- |

म्हणून, वर नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना/सह-कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये त्यांना या सूचना प्रकाशित झाल्यापासून 60 दिवसांच्या आत संबंधित कर्जदार/सह-कर्जदारांविरुद्ध वर दर्शविल्याप्रमाणे एकूण थकबाकीची रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराने एकूण थकबाकीची रक्कम पुढील व्याजासह भरण्यात अयशस्वी झाल्यास, MAHOFIN वर वर्णन केल्याप्रमाणे मालमत्तेवर सुरक्षा व्याज लागू करण्यासाठी कलम 13(4) अंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल, तसेच कायद्यानुसार आणि येथे बनवलेल्या नियमांनुसार इतर पद्धतीने सूचना बजावण्यासाठी पावले उचलली जात आहेत. तुम्हाला सूचना देण्यात येते की, SARFAESI कायद्याच्या कलम 13(8) मध्ये तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे, सार्वजनिक लिलावासाठी किंवा विक्रीद्वारे हस्तांतरणासाठी खाजगी करारासाठी सूचना प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कधीही MAHOFIN ने केलेल्या खर्चासह संपूर्ण देय रक्कम, शुल्क आणि खर्च भरल्यानंतर सदर गहाणखत परत मिळवता येते. लक्षात ठेवा की SARFAESI कायद्याच्या S-13 (13) च्या अटींनुसार, तुम्हाला सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास आणि/किंवा व्यवहार करण्यास प्रतिबंधित केले आहे.

तारीख: १० जून २०२५ | ठिकाण: महाराष्ट्र

अधिकृत अधिकारी मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड

## थोडक्यात

### योगी आदित्यनाथ घेणार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट

**नवी दिल्ली:** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आज दिल्ली दौऱ्यावर आहेत. याठिकाणी ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यादरम्यान, मुख्यमंत्री योगी गोरखपूरमधील एका विद्यापीठाच्या उद्घाटन समारंभाचे निमंत्रण राष्ट्रपतींना सुपूर्द करणार आहेत. या विद्यापीठाचे उद्घाटन ३० जून रोजी प्रस्तावित आहे. मुख्यमंत्री योगी हिंडन विमानतळावर उतरतील आणि रस्त्याच्या मार्गाने दिल्लीला रवाना होणार आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, गोरखपूरमधील प्रस्तावित विद्यापीठाचे उद्घाटन हे उत्तर प्रदेशच्या शैक्षणिक विकासातील एक महत्त्वाचे पाऊल आहे. या विद्यापीठाच्या स्थापनेमुळे पूर्वांचल प्रदेशात उच्च शिक्षणाला चालना मिळेल आणि स्थानिक विद्यार्थ्यांना चांगल्या संधी मिळतील. ३० जून रोजी होणाऱ्या उद्घाटन समारंभाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित राहण्याची शक्यता आहे, मुख्यमंत्री योगी स्वतः राष्ट्रपतींना आमंत्रित करण्यासाठी दिल्लीत पोहोचत आहेत. त्यामुळे, हा प्रकल्प स्वतः मुख्यमंत्री योगींसाठी किती खास आहे हे समजू शकते.उत्तर भारतातील पहिले वन आणि फलोत्पादन विद्यापीठ गोरखपूरमध्ये बांधले जात आहे, ज्यासाठी ६२१ कोटी रुपये खर्च येणार आहेत. मुख्यमंत्री योगी यांनी याची घोषणा केली होती. एका अर्थाने हे विद्यापीठ मुख्यमंत्र्यांचा स्वप्न प्रकल्प आहे. हे विद्यापीठ आता गोरखपूरचे पाचवे विद्यापीठ असेल. ६ सप्टेंबर २०२४ रोजी कॅम्पियरगंज येथील जटायू संवर्धन केंद्राच्या उद्घाटनानिमित्त मुख्यमंत्री योगी यांनी विद्यापीठाची घोषणा केली होती. दरम्यान , मुख्यमंत्री योगी यांच्या कार्यालयातून त्यांच्या दौऱ्याचे वेळापत्रक जारी करण्यात आले आहे.

### अमेरिकेत ऑस्ट्रेलियन पत्रकारावर पोलिसांनी झाडली गोळी

**लॉस एंजेलिस :** अमेरिकेतील लॉस एंजेलिस शहरात सध्या सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान, ९ या ऑस्ट्रेलियन न्यूज चॅनेलच्या प्रतिनिधी लॉरेन टोमासी यांना पोलिसांनी रबरची गोळी झाडल्याची गंभीर घटना घडली आहे. या निदर्शनांचा तिसरा दिवस असताना, टोमासी शहराच्या डाऊनटाऊन भागातील मेट्रोपॉलिटन डिटेन्शन सेंटरजवळ थेट रिपोर्टिंग करत होत्या.थेट प्रक्षेपण संपवून काही सेकंद झाले होते, इतक्यात एका पोलिस अधिकाऱ्याने त्यांच्या दिशेने रबर बुलेट फायर केलं. टोमासी यांच्या पायाला ही गोळी लागली आणि त्या वेदनेने किंचाळल्या. सुदैवाने त्यांना गंभीर इजा झाली नाही, मात्र त्या वेदनेत होत्या. कॅमेरा लगेचच बाजूला वळवण्यात आला आणि थेट प्रक्षेपण थांबवण्यात आलं.ही घटना त्या वेळी घडली, जेव्हा टोमासी आंदोलनकर्त्यांच्या गर्दीत अडकल्या होत्या. त्या आवाजाच्या पार्श्वभूमीवर रिपोर्टिंग करत असताना, अचानक एका आंदोलकाने त्यांच्या कॅमेऱ्यावर हात घातला होता. त्या म्हणाल्या, ''पोलीस सतत लोकांना हा परिसर सोडण्यास सांगत आहेत, पण आंदोलक ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत. येथे सतत रबर बुलेट्स आणि फ्लॅशबँग्सचा वापर सुरू आहे.''
९ च्या वतीने एका अधिकृत निवेदनात सांगण्यात आलं की, लॉरेन टोमासी यांना रबर बुलेटचा फटका बसला आहे. त्या आणि त्यांचा कॅमेरामन सुरक्षित आहेत आणि त्यांचं काम सुरूच राहील. ही घटना पत्रकारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मोठा इशारा आहे.

### पाकिस्तानने पुन्हा हात पसरले ; अमेरिकेकडून एअर डिफेन्स सिस्टम मागितली

**नवी दिल्ली:** पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव सुरू होता. भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळांवर हल्ला केला, या हल्ल्यात अनेक दहशतवाद्यांचा खात्मा झाला. यानंतर भारताने या तणावाची माहिती देण्यासाठी खासदारांचे शिष्टमंडळ विदेशात पाठवले. असेच एक शिष्टमंडळ पाकिस्ताननेही विदेशात पाठवले.ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने केलेल्या हवाई हल्ल्यांमुळे अस्वस्थ झालेला पाकिस्तान आता उघडपणे अमेरिकेकडे प्रगत शस्त्रास्त्र प्रणालींसाठी विनंती करत आहे. वॉशिंग्टनमधील पाकिस्तानी शिष्टमंडळाचे सदस्य आणि नवाझ शरीफ मंत्रिमंडळातील मंत्री मुसादिक मलिक यांचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये ते अमेरिकेला हवाई संरक्षण प्रणाली आणि लढाऊ विमाने विकण्याची विनंती करत आहेत.व्हायरल व्हिडिओमध्ये मलिक बोलत आहेत की, ''भारत ८० विमाने आणि ४०० क्षेपणास्त्रांसह आला होता. यात ते क्षेपणास्त्र वाहने वाहून नेण्यास सक्षम आहेत. तुम्ही पाहिलं आहे आमच्यासोबत काय झालं असतं. आमच्याकडे जर एअर डिफेन्स सिस्टम नसती तर आम्ही आमचं नुकसा झालं असतं. भारत तंत्रज्ञानाचा वापर करतो. ते खूप प्रगत आहेत.

# पाकिस्तानवर ७६००७ अब्ज रुपयांच्या कर्जाचा डोंगर!

**इस्लामाबाद:, दि.९** वृत्तसंस्था




पाकिस्तानच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार त्या देशावर एकूण सार्वजनिक कर्ज मार्च २०२५ अखेर ७६,००७ अब्ज पाकिस्तानी रुपये (७६ ट्रिलियन) इतके झाले आहे. हे पाकिस्तानच्या इतिहासातील सर्वाधिक कर्जाचे प्रमाण आहे. या कर्जवाढीमुळे पाकिस्तानच्या आर्थिक स्थितीवर मोठे संकट निर्माण झाले आहे.
पाकच्या अर्थसर्वेक्षणात स्पष्ट करण्यात आले आहे की, ''अति किंवा चुकीच्या पद्धतीने व्यवस्थापित केलेले कर्ज हे गंभीर अस्थिरता निर्माण करू शकते. त्याचा व्याजदरांवर भार वाढतो आणि दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य धोक्यात येते.''जागतिक बँकेच्या ताज्या अहवालानुसार, पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती अत्यंत गंभीर आहे: एकूण लोकसंख्येपैकी ४५ टक्के लोक गरीबीरेषेखाली आहेत तर १६.५ टक्के अत्यंत गरीब श्रेणीत आहेत. २०२४-२५ मध्ये आणखी १.९ दशलक्ष (१९ लाख) लोक गरिबीच्या कक्षेत आले आहेत.पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी एका भाषणात म्हटले होते की, ''आज आपण कोणत्याही मैत्रीपूर्ण देशाला फोन केला किंवा भेट दिली, तर ते समजतात की आपण पैसे मागायला आलो आहोत. गेल्या ७५ वर्षांत पाकिस्तान केवळ भिक मागण्यात व्यस्त राहिला आहे, आणि आज अगदी लहान अर्थव्यवस्थाही आपल्यापेक्षा पुढे गेल्या आहेत.
पाकिस्तानला अंतर्गत १.०३ अब्ज डॉलर्सची आर्थिक मदत मिळाली आहे. परंतु ही मदत देखील तात्पुरत्या उपायांपेक्षा अधिक ठरणार नाही, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.
पाकिस्तान जागतिक निधीचा वापर देशातील जनतेच्या कल्याणासाठी न करता दहशतवादासाठी करत असल्यावरून भारताने आणि जागतिक बँकेकडे आक्षेप नोंदवले आहेत. पाकिस्तानला मिळणाऱ्या मदतीच्या उपयोगाची पारदर्शक चौकशी व्हावी, अशी मागणीही भारताने केली आहे.

## बिहार विधानसभेच्या सर्व २४३ जागा लढविणार

### चिराग पासवान यांची मोठी घोषणा

**नवी दिल्ली, दि.९** वृत्तसंस्था

आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोक जनशक्ती पक्षाचे नेते चिराग पासवान यांनी मोठी घोषणा केली आहे. बिहारच्या सर्व २४३ विधानसभा जागांवर उमेदवार रिंगणात उतरवणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. मी विधानसभा निवडणूक लढवणार आहे आणि बिहारच्या प्रत्येक मतदारसंघात आमचा उमेदवार असेल,'' असा निर्धार आरा येथे आयोजित सभेत त्यांनी केला. त्यामुळे बिहारच्या निवडणुकीत रंगत येणार आहे.चिराग पासवान म्हणाले, ''लोक वारंवार विचारतात की मी विधानसभा निवडणूक लढवणार का, तर माझं उत्तर आहे असं होय.
मी बिहारसाठी लढणार आहे, बिहारमधून नव्हे. मुख्यमंत्रीपदाची कोणतीही महत्त्वाकांक्षा नाही. लोकशाहीत लोकांचेच अंतिम मत महत्त्वाचे आहे. त्यामुळे मी कुठून निवडणूक लढवावी हे तुम्हीच ठरवा, मी तुमच्या निर्णयाचा आदर करेन, असंही त्यांनी म्हटलं आहे.



चिराग पासवान यांनी राजद आणि काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले की, ''बिहारमध्ये ज्याला आपण 'जंगलराज' म्हणतो, त्यासाठी केवळ आरजेडी नव्हे, तर काँग्रेसही तितकीच जबाबदार आहे.'' चिराग यांनी एनडीए सरकारने माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्न देण्याच्या निर्णयाची आठवण करून दिली आणि हा निर्णय जनतेच्या भावनांचा सन्मान असल्याचंही ते म्हणाले.
राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना चिराग म्हणाले, ''काँग्रेसची खरी अडचण ही आहे की पराभव स्वीकारण्याऐवजी ते आरोप करण्यात व्यस्त असतात. ईव्हीएमवर दोष, निवडणूक आयोगावर टीका, हे सगळं दाखवून राहुल गांधी यांनी आधीच पराभव स्वीकारला आहे. विधानसभा निवडणूक लढवली, तरी ती काही असामान्य गोष्ट नसेल. माझ्या लढण्यामुळे एनडीएचा स्ट्राइक रेट सुधारेल.
मात्र मी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत नाही, लोकांमध्ये गैरसमज पसरवला जात असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.चिराग पासवान यांनी केलेले हे वक्तव्य आगामी बिहार निवडणुकीत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यांच्या भूमिकेमुळे एनडीएत नवचैतन्य येऊ शकतं. मात्र राज्यात लढत अटीतटीची बनण्याची शक्यता आहे.

## केरळच्या किनाऱ्याजवळ सिंगापूरच्या जहाजावर शक्तिशाली स्फोट

**कोची : दि.९** वृत्तसंस्था

केरळच्या किनाऱ्याजवळ सोमवारी सकाळी सिंगापूर ध्वजाखालील मालवाहू जहाज ५०३ वर एक भीषण स्फोट झाला. हे जहाज कोलंबो (श्रीलंका) येथून ७ जून रोजी निघाले होते आणि १० जून रोजी मुंबईत पोहोचण्याचे नियोजन होते, अशी माहिती संरक्षण जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली आहे.
सुमारे २७० मीटर लांब व १२.५ मीटर खोल असलेले हे कंटेनर जहाज केरळच्या समुद्रकिनाऱ्याजवळ असताना सकाळी १०.३० वाजता जहाजाच्या अंतर्गत भागात स्फोट झाला. या स्फोटाची माहिती मुंबई येथील कोचीतील



त्यांच्या समकक्ष केंद्राला दिली.या घटनेनंतर, भारतीय नौदलाने तात्काळ या युद्धनौकेला कोचीला जाण्याऐवजी स्फोटग्रस्त जहाजाच्या दिशेने वळवले. पश्चिम नौदल कमांडने सकाळी ११ वाजता हा आदेश दिला. तसेच, कोची येथील या नौदल विमानतळावरून एक विमान पाठवण्याचीही तयारी सुरू करण्यात आली आहे, जेणेकरून हवेतून परिस्थितीचे आकलन करता येईल व आवश्यक मदत समन्वय साधता येईल.आतापर्यंत जिवीतहानीबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. नौदलाकडून मदतकार्य सुरू असून जहाजाच्या चालक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व उपाययोजना केली जात आहेत.

## युक्रेनसाठी सर्वात भयावह रात्र! रशियाने केला सर्वात मोठा ड्रोन हल्ला



**नवी दिल्ली, दि.९** वृत्तसंस्था

रशिया आणि युक्रेनमध्ये गेल्या तीन वर्षांपासून युद्ध सुरू आहे. पण, कालची रात्र युक्रेनसाठी खूप भयावह होती. रशियाने ४७९ ड्रोन आणि २० क्षेपणास्त्रांच्या मदतीने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला केला. युक्रेनियन हवाई दलाने सांगितले की, या हल्ल्यात देशाच्या मध्य आणि पश्चिमेकडील प्रदेशांना लक्ष्य करण्यात आले.
काही दिवसांपूर्वीच युक्रेनने रशियाच्या हवाई तळावर मोठा हल्ला केला होता. युक्रेनच्या हल्ल्यात रशियाचे अनेक लढाऊ विमान नष्ट झाले होते. आता रशियाने युक्रेनवर हा आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला आहे. युक्रेनियन हवाई दलाने दावा केला की, त्यांनी २७७ ड्रोन आणि १९ क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट केली. मात्र, १० ड्रोन आणि काही क्षेपणास्त्रे त्यांच्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाली. या हल्ल्यात किती नुकसान झाले, हे अद्याप समोर आले नाही.युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की म्हणाले की, पूर्व आणि ईशान्य आघाडींवरील परिस्थिती खूपच वाईट आहे. मात्र, त्यांनी रशियन हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानाबद्दल जास्त माहिती दिली नाही. युक्रेनला त्याच्या पाश्चात्य मित्र राष्ट्रांकडून हवाई संरक्षण प्रणालींची आवश्यकता आहे, परंतु अद्याप युक्रेनला हवी तशी मदत मिळाली नाही. आता हे युद्ध अजून किती दिवस चालते, हे पाहणे महत्वाचे आहे.
रशिया-युक्रेन युद्धाला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत, पण अजून या दोन्ही देशांमधील संघर्ष शांत झालेला नाही. उलट हे युद्ध दिवसेंदिवस धोकादायक होत चालले आहे. काही दिवसांपूर्वीच युक्रेनने रशियावर सर्वात मोठा ड्रोन हल्ला केला होता, त्याला रशियानेही तेवढ्यात ताकदीने प्रत्युत्तर दिले. एकीकडे युक्रेन रशियाच्या भूमीत घुसून हल्ले करत आहे, तर दुसरीकडे रशियन सैन्य युक्रेनियन शहरांवर सतत ताबा मिळवत आहे.रशियन संरक्षण मंत्रालयाने रविवारी दावा केला की, त्यांच्या सैन्याने युक्रेनच्या डोनेस्तक प्रदेशातील झोरिया नावाची वस्ती ताब्यात घेतली आहे. या विजयासह रशियाने युक्रेनच्या सुमारे २० टक्के भूभागावर नियंत्रण मिळवले आहे. वॉर रिपोर्ट कार्ड-२०२५ आणि रॉयटर्सच्या वृत्तानुसार, रशियन सैन्याने आतापर्यंत युक्रेनमधील १,१२,००० चौरस किलोमीटरपेक्षा जास्त भूभाग ताब्यात घेतला आहे.

## जम्मू काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा

### काँग्रेसची केंद्र सरकारकडे मागणी

**नवी दिल्ली, दि.९** वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरचा केंद्रशासित राज्याचा दर्जा काढून राज्याला पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करावा अशी मागणी या राज्यातील काँग्रेस पक्षाकडून केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे. जम्मू आणि काश्मीर काँग्रेसने गेल्या महिन्यात ऑपरेशन सिंदूर दरम्यान सीमेवर पाकिस्तानी गोळीबारात बळी पडलेल्यांसाठी विशेष पॅकेजची मागणीही केली आहे.
प्रकरणात जम्मू आणि काश्मीरच्या लोकांना सुरक्षा देण्यात केंद्र सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे अशी टीका करतानाच प्रदेश काँग्रेस समितीचे (पीसीसी)




कार्यकारी अध्यक्ष रमण भल्ला यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की, पंतप्रधानांनी जम्मू आणि काश्मीरचा राज्याचा दर्जा बहाल करण्याबाबतची संदिग्धता संपवण्याची गरज आहे. केंद्र सरकारमधील मंत्री योग्य वेळी राज्याचा दर्जा पुन्हा दिला जाण्याबद्दल बोलत आहेत, परंतु या मागणीच्या पूर्ततेसाठी लोकांना किती काळ वाट पाहावी लागेल? भल्ला यांनी लडाख आणि जम्मू आणि काश्मीरमधील हक्क आणि संवैधानिक संरक्षणातील असमानतेचाही उल्लेख केला.
त्यांनी प्रश्न उपस्थित केला की जम्मू आणि काश्मीरमधील रहिवाशांना समान अधिकार आणि लोकशाही तरतुदी का दिल्या जात नाहीत? ते म्हणाले की लडाखकडे दुर्लक्ष का केले जात आहे? रमण भल्ला यांनी २२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्याबद्दल सांगितले की, त्यासाठी जबाबदार असलेले अजूनही फरार आहेत. बॉम्बस्फोटानंतर सीमावर्ती गावांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या सुरक्षेबाबत केंद्र सरकारच्या तयारीवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

## आसाममध्ये ३.३७ लाख नागरिकांना पुराचा तडाखा; २३ मृत्यू

**नवी दिल्ली, दि.९** वृत्तसंस्था

आसामच्या १२ जिल्ह्यांमध्ये पुराता तडाखा बसला आहे. याठिकाणचे सुमारे ३.३७ लाख नागरिक अजूनही पुराच्या विळख्यात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी आज, रविवारी दिली.आसाम सरकारच्या अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार आतापर्यंत पुर आणि भूस्खलनामुळे एकूण २३ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ६ जण भूस्खलनात मरण पावले आहेत. राज्यातील श्रीभूम सर्वाधिक पूरप्रभावित भाग असून, १.९३ लाखांहून अधिक लोक



तिथे पुराच्या विळख्यात आहेत. इतर प्रभावित जिल्ह्यांमध्ये हैलाकांडी येथील ७३७२४ तर कछार येथील ५६३९८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. राज्यात एकूण ३३७३५८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. तर ४१ सर्कल व ९९९ गावे प्रभावित झाली आहेत. राज्यातील ३६ हजारांहून अधिक नागरिकांनी १३३ मदत छावण्यांमध्ये आश्रय घेतला आहे. तर ६८ मदत वितरण केंद्रांतून गरजूंना मदत पोहचवली जात आहे. राज्यात पुरामुळे १२६५९ हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली आहे.
तर राज्याच्या २ जिल्ह्यांमध्ये शहरी पूरामुळे २८४ लोक प्रभावित आहेत. तसेच काझीरंगा नॅशनल पार्क व पोबितोरा वन्यजीव अभयारण्य अजूनही पाण्याखाली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.ब्रह्मपुत्रा नदीसह प्रमुख नद्यांचा पूर सध्या ओसरत असला तरी काही नद्या अजूनही धोक्याच्या पातळीवर आहेत. धुब्री येथे ब्रह्मपुत्रा, धरमटुल येथे कोपिली, बीपी घाट येथे बराक, आणि श्रीभूमी येथे कुशियारा धोक्याच्या पातळीवर वाहत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

## कोरोनाचा होतोय देशभरात विस्तार; सक्रिय रुग्णांची संख्या ६ हजारांच्या पार

**नवी दिल्ली, दि.९** वृत्तसंस्था

मागील अनेक दिवसांपासून जगामध्ये कोरोना डोके वर काढत आहे. चार वर्षांपूर्वी धुमाकूळ घातलेल्या कोविड-१९ च्या नव्या व्हायरसने चिंता वाढवली आहे. भारतामध्ये देखील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत चालला आहे. कोविड-१९ वेगाने पसरत असून देशामध्ये सक्रिय रुग्णांची संख्याही ६ हजारांच्या पुढे गेली आहे. त्याचबरोबर मृत्यूंची संख्या देखील वाढत आहे. यामुळे आरोग्य विभागाकडून काळजी घेण्याचे आवाहन केले जात आहे.कोरोनाच्या केसेसे देशासह राज्यामध्ये वाढत आहे. देशामध्ये गेल्या २४ तासांत ०६ जणांचा मृत्यू झाला आहे. केरळमध्ये अजूनही सर्वाधिक सक्रिय रुग्ण आहेत. शुक्रवारी बिहारमध्ये एकाच दिवसात सर्वाधिक ९ नवीन संक्रमित रुग्ण आढळल्याने



खळबळ उडाली.आरोग्य मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, देशभरात नवीन कोरोना रुग्णांची संख्या ६ हजारांच्या पुढे गेली आहे. त्याच वेळी, गेल्या २४ तासांत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. केरळमध्ये कोरोनामुळे ०३ जणांचा मृत्यू झाला आहे तर कर्नाटकात ०२ जणांचा मृत्यू झाला आहे. त्याच वेळी, तामिळनाडूमध्ये कोविड-१९ मुळे एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे.जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत देशभरात कोरोनामुळे तब्बल

> केरळमधील रुग्णालयांमध्ये मॉक ड्रिल्स घेतल्या जात आहेत, तर हिमाचल प्रदेशातील रुग्णालयांच्या परिसरात मास्क वापरणे सक्तीचे करण्यात आले आहे.हाराष्ट्रामध्ये कोरोना रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. केंद्रीय आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज (दि.०८ जून) रोजी महाराष्ट्रामध्ये ५९५ सक्रीय रुग्ण आहेत. यामध्ये कालपासून १८ रुग्णांची वाढ झाली आहे. जानेवारी २०२५ पासून महाराष्ट्रामध्ये ७४९ रुग्ण आढळले आहेत. तर कालपासून ६८ रुग्णांच्या प्रकृतीमध्ये सुधार झाला आहे.

६१ जणांनी आपला जीव गमावला आहे. वर्षाच्या सुरुवातीपासून दिल्लीत कोरोनामुळे ०७ जणांचा मृत्यू झाला आहे. येथील सक्रिय रुग्णांची संख्या ६६५ झाली आहे. गेल्या २४ तासांत राजधानी दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये रुग्णांमध्ये वाढ दिसून आली आहे. यामुळे चिंता वाढली आहे.त्याच वेळी, बिहारची राजधानी पटना येथे गेल्या २४ तासांत १० नवीन संक्रमित रुग्ण आढळले आहेत, त्यानंतर एकूण रुग्णांची संख्या ४६ झाली आहे. एका दिवसात इतके रुग्ण आढळल्यानंतर, आरोग्य मंत्री मंगल पांडे यांनी नागरिकांना घाबरू नका तर सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.आरोग्य विभाग सतत लक्ष ठेवून आहे आणि रुग्णालयांना सतर्क ठेवण्यात आले आहे. दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये, लोकांना पुन्हा मास्क घालण्याचा आणि गर्दी टाळण्याचा सल्ला दिला जात आहे. आरोग्य अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की वृद्ध, मुले आणि आधीच आजार असलेल्या लोकांनी विशेषतः सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271



# पतीवरील प्रेमाचे प्रतीक : वट पौर्णिमा



दिन विशेष
प्रविण बागडे
नागपूर 9923620919

वटपौर्णिमा ज्याला वट सावित्री व्रत देखील म्हणतात. हा महाराष्ट्र, गोवा या पश्चिम भारतीय राज्यांमध्ये विवाहित महिलांनी साजरा केलेला हिंदू उत्सव आहे. तात्विक दृष्टिकोनातून, वटवृक्ष दीर्घायुष्य आणि अमरत्वाचे प्रतीक म्हणून देखील स्वीकारले जाते. वटवृक्ष हे ज्ञान आणि निर्वाणाचेही प्रतीक आहे. भगवान बुद्धांना याच झाडाखाली ज्ञान प्राप्त झाले. म्हणूनच पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची पूजा करणे हा या व्रताचा भाग झाला. कथा कर्माबरोबरच स्त्रिया उपवास करतात आणि पूजा करतात आणि परिक्रमेदरम्यान वटवृक्षाभोवती सुताचे धागे गुंडाळतात. एक विवाहित स्त्री तिच्या पतीवरील प्रेमाचे प्रतीक झाडाभोवती एक औपचारिक धागा बांधून दर्शवते. या व्रतामागे एक पारंपरिक सावित्री आणि सत्यवान यांची पौराणिक आख्यायिका सांगितली जाते. वटपौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात. पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने वडाचे महत्त्व विशेष असल्याने त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा ही पूजेचा एक हेतू आहे. वट सावित्री व्रत शुभ आणि संतान प्राप्तीसाठी मदत करणारे मानले जाते. भारतीय संस्कृतीत हे व्रत आदर्श स्त्रीत्वाचे प्रतीक बनले आहे. या व्रताच्या तिथीबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. स्कंद पुराण आणि भविष्योत्तर पुराणानुसार ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला हे व्रत करण्याचा नियम आहे, तर निर्णयामृत वगैरेनुसार ज्येष्ठ महिन्यातील अमावास्येला उपवास करण्याचे सांगितले आहे.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमेपर्यंत हे त्रिरात्र व्रत करावे असे सांगितले आहे. तीन दिवस उपवास करणे अशक्य असेल त्यांनी फक्त पौर्णिमेलाच उपवास करावा. सावित्रीसह ब्रम्हदेव ही या व्रताची मुख्य देवता असून सत्यवान-सावित्री, नारद व यमधर्म या उपांग देवता आहेत. या व्रताचा विधी असा, नदीकाठची वाळू आणून पात्रात भरावी, तिच्यावर सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाव्यात मग त्यांची षोडशोपचारे पूजा करावी. त्यानंतर पाच अर्घ्ये द्यावीत, मग सवित्राची प्रार्थना करावी. पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनीसह सावित्रीची कथा ऐकावी. या व्रतात सावित्रीच्या मूर्तीची पूजा सांगितलेली असली तरी रूढी मात्र वेगळी आहे. सावित्रीने आंतरिक गुणांची पारख करून निवडलेल्या वरास आई-बाप आणि देवगुरू यांच्या विरोधाला डावलून माळ घातली व पतीचे प्राण वाचवण्याचे अवघड काम चिकाटीने, दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि चातुर्याने करून दाखविले. योगी अरविंद यांनी आध्यात्मिक परिभाषेतून सावित्रीचे महत्त्व सांगणारे 'सावित्री' नावाचे महाकाव्य लिहिले आहे.

वटवृक्षाचे पूजन आणि सावित्री-सत्यवान कथेचे स्मरण करण्याच्या विधीमुळे हे व्रत वट सावित्री म्हणून प्रसिद्ध झाले. भारतीय संस्कृतीत सावित्रीला ऐतिहासिक पात्र मानले जाते. सावित्री म्हणजे वेदमाता गायत्री आणि सरस्वती. सावित्रीचा जन्मही विशेष परिस्थितीत झाला. भद्रा देशाचा राजा अश्वपती यांना मूलबाळ नव्हते असे म्हणतात. त्यांनी संततीप्राप्तीसाठी मंत्रोच्चारांसह दररोज एक लाख अर्पण केले. हा क्रम अठरा वर्षे चालू राहिला. यानंतर सावित्री देवी प्रकट झाली आणि वरदान दिले की, 'राजन, तुझ्या पोटी एक तेजस्वी मुलगी होईल'. सावित्रीदेवीच्या कृपेने जन्माला आल्याने मुलीचे नाव सावित्री ठेवण्यात आले. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.

सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता-तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू-सासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात. सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाची पूजा करून स्त्रिया 'मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे', अशी प्रार्थना करतात.

**सन् आहे सौभाग्याचा,**
**बंध आहे अतूट**
**नात्याचा ।**
**या शुभदिनी**
**पूर्ण होवोत**
**तुमच्या सर्व इच्छा ।।**
**वट पौर्णिमेच्या**
**हार्दिक शुभेच्छा!**



# वटपौर्णिमा हे एक व्रत व परंपरा!



प्रासंगिक
विजया झाडे
कुसुमकोट (बु.)

हिंदू धर्मशास्त्रानुसार वटपोर्णिमा म्हणजे हिंदू स्त्रियांचा एक महत्त्वाचा सण आहे. वटवृक्ष हा भारतीय संस्कृतीचा एक भाग आहे. वटपौर्णिमा हा सण याच झाडाशी संबंधित आहे. हा उत्सव महाभारतात वर्णन केलेल्या सावित्री आणि सत्यवान यांच्या आख्यायिकेवर आधारित आहे. वटपौर्णिमा ज्येष्ठ पौर्णिमेला हा सण महाराष्ट्रात अत्यंत उत्साहात स्त्रिया साजरा करतात.या दिवशी स्त्रिया वटपौर्णिमेचे व्रत करतात व वटवृक्षाचे मनोभावे पूजन करतात. आणि आपल्या पतीला दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य लाभावे याकरिता वडाच्या झाडाचे पूजन करतात. ही एक प्रथा, परंपरा असली तरी निसर्गाप्रती व आपल्या सांसारीक आयुष्यप्रती कृतज्ञता हाच सांस्कृतिक भाव आहे.वड हा यज्ञवृक्ष असून यज्ञपात्रे याच झाडाच्या लाकडाची बनवतात.चार वेदांपैकी ऋग्वेद व अथर्ववेदात वडाचा उल्लेख आढळतो.ब्रम्हा विष्णू महेश यांचे निवासस्थान या वृक्षावर आहे असे मानले जातात. हिंदू बौद्ध आणि इतर परंपरांमध्ये पूजनीय असलेले वडाचे झाड अमरत्व, अध्यात्मिक,ज्ञान आणि ज्ञानाचे प्रतीक म्हणून पाहिले जाते.त्याची खोलमुळे आणि विस्तृत छत जीवनावर चिंतन करण्यास प्रेरणा देतात.वडाच्या झाडाला अक्षयवृक्षही म्हणतात.अक्षय्य म्हणजे ज्याचा क्षय होत नाही.वटवृक्षाचा कधीही क्षय होत नाही.ते कायम वाढतच राहते. वडाच्या पारंब्या जमिनीतून पुन्हा पुन्हा जन्म घेऊन वडाचा विस्तार वाढत जातो. वडाच्या झाडाचे आयुष्य हजारो वर्षे असते. भारतीय संस्कृतीमध्ये वडाच्या झाडाचे असाधारण महत्त्व विषद केले आहे.वडाचे झाड जवळ जवळ ६० टक्के प्राणवायू हवेत सोडते आधुनिक भाषेत वटवृक्ष नैसर्गिक व्हेंटिलेटर चे काम करतो.आणि म्हणूनच आपोआप त्याच्या आसपास राहणाऱ्या लोकांना सहजपणे शुद्ध प्राणवायू मिळत असतो.एक पूर्ण वाढलेले वडाचे झाड एका तासाला ७१२ किलो इतक्या प्रचंड प्रमाणात प्राणवायू वातावरणात सोडत असते. वडाच्या झाडाखाली वेळ व्यतीत करणे म्हणजे शरीराला आवश्यक असणाऱ्या प्राणवायूची पूर्णता भरून काढणे होय. वडाच्या काटक्यांचा उपयोग होम हवनात व यज्ञात समिधा म्हणून करतात .वडाचे झाड हे शिवशंकराचे स्वरूप मानले गेले आहे. आणि वडाच्या पारंब्या या शिवाच्या जटा आहेत असे समजले जाते.वडाच्या झाडाच्या प्रत्येक फांदी पारंब्या व पानापासून सुद्धा नवीन वटवृक्ष जन्म घेते म्हणून त्याला अनादी अनंत असा अक्षय म्हटले गेले आहे. त्याच्या ह्या काळातील अस्तित्वामुळे स्त्रिया त्याला अखंड सौभाग्याचे साकळे घालतात .वडाच्या झाडाला फळे येतात आणि ती फळे अनेक पक्षी, वटवाघुळे,खारी, माकडे खातात आणि एक प्रकारे ते विजारोपण सुद्धा त्याद्वारे होते. आयुर्वेदात वटवृक्षाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.त्यामुळे त्याची मुळे,पाने, फुले,फळे, साल, पारंब्या या सगळ्यांचा औषधी उपयोग होतो व त्यातून असंख्य आजारांवर उपचार करता येतात. वडाचा जीवनकाळ खूप मोठा आहे. वड स्वच्छ हवा प्रदान करतो. त्याची तोड न होण्यासाठी व पुढच्या पिढीला त्याचे महत्त्व कळून येण्यासाठी प्रथेनुसार वटपूजन केले जाते.प्रथेमुळे का होईना वडाचे महत्त्व टिकून आहे.स्त्रिया वडाचे पूजन करून वडाचे महत्व पुढच्या पिढीकडे पोचवत आहेत. भक्तीच्या मार्गाने सुद्धा असाध्य ते साध्य करून घेता येते. वटवृक्षाखाली सावित्रीला सत्यवानाचे प्राण परत मिळाले असे समजले जाते. तसेच वटवृक्षाखाली ब्रम्हा- विष्णू- महेश आणि श्री. स्वामी समर्थ महाराजांचे नित्य वास्तव्य मानले जाते. स्त्रिया सात जन्मी हाच पती मिळावा म्हणून वटवृक्षाची पूजा करतात कारण सावित्रीला सत्यवानाचे प्राण वडाच्या झाडाखालीच परत मिळाले. वडाच्या झाडापासून भरपूर ऑक्सिजन ,सावली व औषधी गुणधर्म आहेत.निसर्गतः वड,पिंपळ यासारख्या दीर्घायुषी वृक्षाचे पूजन पवित्र मानले जाते.एखादा वृक्ष पवित्र मानला की त्याची सहसा तोड होत नाही.वडाच्या झाडाला धार्मिक, वैज्ञानिकआणि सामाजिक दृष्ट्या महत्त्व आहे.हे झाड भारतीय संस्कृतीत अत्यंत पवित्र मानले जाते. वडाचे झाड अनेक धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांशी संबंधित आहे. झाड आणि पर्यावरण हे समीकरण जाणून घेऊन वडाच्या झाडांचे वृक्षारोपण व्हायला पाहिजे. आज शासनाच्या जागृतीमुळे रस्त्याच्या दुतर्फा भरपूर वडाची झाडे पाहायला मिळतात. अशीच जागरूकता सामाजिक व्हायला पाहिजे.वटवृक्षांचे वृक्षारोपण व्हायला पाहिजे.काही स्त्रिया वटवृक्षाचे पूजनासाठी जाऊ शकत नाही तेव्हा वटवृक्षाची फांदी घरी आणतात व त्याचे पूजन करतात . परंतु अशी झाडाची हानी न करता एक वटवृक्ष वटपौर्णिमेला स्त्रियांनी घरामध्ये लावावा व त्याची पूजा करावी. त्याचे फायदे त्या घरातील कुटुंबाला मिळतील.तसेच स्त्रियांनी वटपौर्णिमेला एक वटवृक्ष तरी लावावा हा संकल्प केला पाहिजे. जेणेकरून वटवृक्षांचे वृक्षारोपण होईल. जर घरामध्ये जागा नसेल तर कुंडीत लावावा व कुंडीतही लावता येत नसेल तर आपल्या गल्लीत लावावा आणि गल्लीतही जागा नसेल तर माळरानावरती या दिवशी प्रत्येक स्त्रीने एक वटवृक्ष लावावा. यामुळे वातावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढेल व शुद्ध प्राणवायू सर्वांना मिळेल. असे हे वडाचे झाड बहुगुणी आहे. सर्वांनी याची जोपासना करायला हवी.या वृक्षाचे संवर्धन व जतन करावे.

# वटपौर्णिमा-अक्षय वृक्ष : प्राण वायू देणारा वड



वास्तव
अर्चना व्हाडपांडे
अमरावती

वडाचे झाड ७०% ऑक्सिजन पर्यावरणास देते .म्हणून वडाचे झाड पर्यावरणास महत्त्वाचे आहे. वडाचे झाड जिथे असते तेथे भरपूर प्रमाणात प्राणवायू असतो. वटवृक्षाचे वैद्यकीय सल्ल्यानुसार सेवन केल्याने आपल्या शरीरातील मुख्यदोषांपैकी कफ आणि पित्त हे दोन दोष शांत करता येतात.

वडाच्या झाडाला अक्षय वृक्ष किंवा संसार वृक्ष असेही म्हणतात .वडाचे झाड हे पाचशे गॅलोन शुद्ध हवा पर्यावरणास सोडते. म्हणून वडाच्या झाडाखाली भरपूर प्रमाणात ऑक्सिजन मिळतो या वृक्षाला नॅचरल व्हेंटिलेटर सुद्धा म्हटले जाते.

वडाच्या झाडाची साल, पाने, अंकुर आणि पारंब्या या अनेक प्रकारच्या विविध आजारावर वापरल्या जातात. वडाच्या झाडाचा संधिवातामध्ये तसेच आमवात ,केस गळती आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार पोटाच्या आजारासाठी उपयोग होतो. वडाच्या झाडातून निघणारा चीक हा जखमा भरून काढण्यासाठी वापरतात. वडाच्या झाडाचे आयुष्य हे हजारो वर्ष असते.

या झाडाच्या खोडामध्ये फांद्यामध्ये विष्णूचे स्थान असते तसेच मुळामध्ये ब्रह्माचा वास असतो तसेच शेंड्यामध्ये भगवान शंकर स्थित आहे असे मानले जाते. या दैवी वृक्षाच्या छायेखाली साधना व्रत केल्यास मनोकामना पूर्ण होते असे मानले जाते.

पूजेच्या निमित्ताने का होईना स्त्रिया या झाडाच्या सानिध्यात जास्त वेळ राहतात त्यामुळे त्यांच्या आरोग्यासाठी चांगले आहे सावित्रीने आपला पती सत्यवानाचे प्राण यमा कडून परत आणले ते याच दिवशी तो दिवस म्हणजे जेष्ठ मासातील पौर्णिमेचा म्हणजेच वटपौर्णिमा .जेव्हा यमराज सत्यवानाचे प्राण नेण्यासाठी आला होता .त्यावेळेस वटवृक्षाखाली सत्यवानाचे मृत शरीर सावित्रीच्या मांडीवर होते. परंतु जेव्हा यमराज सत्यवानाला घेऊन जात होते .त्यावेळेला सावित्री सुद्धा यमाच्या मागे मागे गेली. यमराजाने तिला परत जायला सांगितले. परंतु तिने माझा पतिव्रता धर्म आहे त्यामुळे मी इथुन जाणार नाही या तिच्या साहसीवृत्तिला प्रसन्न होऊन सावित्रीला त्याने तीन वर मागायला सांगितले .पहिला वर होता सासू-सासऱ्यांच्या डोळ्यांची ज्योती परत आणणे .दुसरा होता त्यांचे गेलेले राज्य पुन्हा मिळवणे. तिसरा होता शंभर पुत्रवती होण्याचा आशीर्वाद. त्यामुळे आता यमराज वचनबद्ध झाले असल्यामुळे यमराजाला सावित्री हुशारीने म्हणाली,'' सत्यवानाचे प्राण तुम्हाला मला परत द्यावेच लागतील ''नंतर सावित्री सत्यवानाचे शरीर वटवृक्षाखाली मृतावस्थेत होते तिथे गेली तिने वटवृक्षाला प्रदक्षिणा घातल्या आणि पाहते तर काय? सत्यवानाचे प्राण परत आले होते सत्यवान जिवंत झालेला होता.

म्हणूनच स्त्रिया अखंड सौभाग्यासाठी वटवृक्षाला साकडे घालतात. पतीच्या चांगल्या आरोग्यासाठी, दीर्घायुष्यासाठी सुवासिनी ही स्त्रिया नटून-थटून या वटवृक्षाची पूजा करतात. हे व्रत ज्येष्ठ त्रयोदशी पासून ते पौर्णिमेपर्यंत तीन दिवस करतात. हिंदू शास्त्रात वटवृक्षाला पवित्र मानले जाते.

**वडाचे झाड बहुगुणी**
**उपयोग करा सर्वांनी**
**वडाचे झाड लावूया**
**करूया संकल्प सर्वांनी**

# वटपौर्णिमेच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण



विचारमंथन
रमेश लांजेवार
मो. ९९२१६९०७७९

भारतीय संस्कृतीत प्रत्येक झाडांना आगळेवेगळे स्थान व महत्त्व आहे.त्यात वटवृक्ष म्हणजे मायेची सावली व शांतीचे प्रतीक आहे.वटपौर्णिमेला भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.सावित्री हे भारतीय संस्कृतीत एक ऐतिहासिक पात्र मानले जाते. सावित्री म्हणजे वेद माता गायत्री आणि सरस्वती. वटवृक्ष एक विशालकाय वृक्ष आहे.ज्यामध्ये त्या झाडाची जटा लटकत असतात.यालाच सावित्री देवी मानले जाते. हिंदु पुराणात ब्रम्हा, विष्णू आणि महेश हे वटवृक्षात राहतात असे मानले जाते.या झाडांच्या मुळामध्ये ब्रम्हा, मध्यभागी विष्णू आणि वरच्या भागात शिव आहे. म्हणून या झाडाच्या पुजेला अत्यंत महत्व आहे.कारण वटवृक्षाच्या पुजेने साक्षात ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचे दर्शन होते.त्यामुळे आज आपल्याला अशाच वृक्षांची नितांत गरज आहे.यावरून स्पष्ट होते की वटवृक्ष एक दैवी शक्तीचे प्रतीक आहेच हे आपल्याला पुराण सुध्दा सांगते. परंतू आज मानवाचा व संपूर्ण जीवजंतूच्या कल्याणासाठी व जीवनमरणाचा प्रश्न ऑक्सिजनवर येवुन ठेपला आहे.कारण दिवसेंदिवस पृथ्वीतलावरील ऑक्सीजनचे प्रमाणात कमी-कमी होत आहे.यामुळे मानवासह संपूर्ण जीवजंतूचे जीवन धोकादायक स्थितीत येवून ठेपले आहे. त्यामुळे आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात वृक्षलागवडीला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे.कारण आपण जेवढे वटवृक्ष लावू तेवढीच ऑक्सिजनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होवून मानव,पशुपक्षी व पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीत आल्हाददायक वातावरणात निर्माण होण्यास मोठी मदत होईल.आज आपण लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक झाडात, पानात, फुलात, मुळात, फळात देवी-देवतांचा वास आहे. त्यामुळेच आपण आज या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत व मोकळा श्वास घेऊ शकतो.परंतु वृक्ष तोड किंवा जंगल तोड वेळीच थांबली नाही तर पृथ्वीतलावरील संपूर्ण जीव सृष्टीचा विनाश कोणीही रोखू शकणार नाही हे सुद्धा कटु सत्य आहे. त्यामुळे प्रत्येक सनाला, वाढदिवसाला, लग्न कार्यक्रम या दिवसाला वृक्ष लागवड व्हायलाच हवी.वटपौर्णिमेप्रमाणे ३६५ दिवसांमध्ये जे कोणते सण येतात त्या-त्या सणाला वृक्षारोपण करून आगळावेगळा उपक्रम राबवायला हवा.तुळशी विवाहाच्या दिवशी तुळशीचे सुध्दा वृक्षारोपण व्हायला हवे.असे जर झाले तर देशात दरवर्षी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल व ऑक्सिजनची मात्रा वाढण्यास मोठी मदत होईल. आपण जगात किंवा भारतात जी काही औषधे पहातो ती कोणतीही असो उदाहरणार्थ ऍलोपॅथिक,आर्युवेदिक, होमिओपॅथिक किंवा जडी-बुटी या ज्या औषधी तयार होतात त्या संपूर्ण वनस्पती पासुनच तयार होतात.त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे.सावित्री आणि सत्यवान यांची कथा अनेक पुराणांमध्ये पहायला मिळते.नारद मुनी सावित्रीला सत्यवानशी लग्न न करण्याचा सल्ला देते. कारण सत्यवान यांचे जीवन काही काळापर्यंत मर्यादित असते.परंतु सावित्री नारदमुनीला न जुमानता सत्यवानशी लग्न करते.तीला पतीच्या मृत्यूची तारीख माहीत असते.अशा परिस्थितीत शिल्लक रहालेल्या दिवसात सावित्री कठोर तपश्चर्या करते.परिणामतः आपल्या पतीला मृत्यूच्या खाईतून बाहेर काढते. यामागे वटवृक्षाची लीला असते. कारण वटवृक्षांमध्ये ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचा वास आहे हे सावित्रीला तपश्चर्ये दरम्यान लक्षात आले व सावित्रीच्या मदतीसाठी स्वयंम ब्रम्हा, विष्णू आणि महेश प्रगट होतात व सावित्रीची मनोकामना पूर्ण होते.हे आपल्याला पुराणात सांगीतले आहे.त्याच अनुषंगाने वटपौर्णिमेला वडाच्या झाडाची पूजा करून महिला सुख-समृध्दीची आराधना करतात व वटवृक्षाच्या रूपात विराजमान असलेले ब्रम्हा, विष्णू आणि महेश व सावित्री यांचे साक्षात दर्शन घेऊन महिला स्वतःला धन्य मानतात.परंतु आज वटवृक्षाची गरज आपणासर्वांनाच आहे.कारण सत्यवानाला वाचवीण्यासाठी सावित्रीने वटवृक्षाचा सहारा घेतला व वटवृक्षाने सावित्रीला सत्यवानाला वाचविले सुध्दा. आज पृथ्वीतलावर जगात जी काही विनाश लीला दिसत आहे त्याला दोषी फक्त मानवच आहे.ही विनाश लीला रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.आज वृक्ष म्हणजे दैवी शक्तीच आहे.वड, आंबा,आवळा, कडुनिंब,उंबर,केळी, आपट्याचे झाड,बेल,पळस,कुड्याची पाने,इत्यादीसह अनेक झाडांच्या पानांचा,फुलांचा व फळांचा पुजेमध्ये वापर करीत असतो. आज स्त्री शक्ती वृक्षांना वाचवीण्यासाठी वृक्षांची पुजा अर्चना करीत आहे.तर मनुष्य दुसरीकडे जंगल तोड करीत आहे याला कुठेही थांबवायला हवे.पर्यावरण रक्षणासाठी १९७३ मध्ये चिपको आंदोलन करण्यात आले यात मोठ्या संख्येने महिलांनी भाग घेवून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड थांबवीली. यामागचा उद्देश म्हणजे झाडांना वाचवीने.या आंदोलनामुळे शेकडो झाडे, हजारो पक्षी व प्राण्यांची निवासस्थाने वाचली. झाडे लावा,झाडे जगवा,निसर्ग सुरक्षित तर आपण सुरक्षित, आपण सुरक्षित तर देश सुरक्षित, देश सुरक्षित तर जग सुरक्षित हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. यामुळे संपूर्ण सृष्टीत प्रफुल्लित होईल.वटपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

# नेत्रदान हेच सर्वश्रेष्ठ दान



**जगी सर्वश्रेष्ठ असे कन्यादान**
**दुजे असे ते नेत्रदान!**
**मरणोत्तर करून नेत्रदान**
**करा हे कार्य महान!!**

आपले डोळे हे निसर्गाने आपल्याला दिलेली सर्वात मोठी अनमोल देणगी आहे .डोळ्यांमुळेच सर्व जग, सृष्टी सौंदर्य पाहता येते ,आपल्या देशाचे उज्वल भविष्य असणाऱ्या अनेक अंध मुला-मुलींच्या, चिमूरड्यांच्या जीवनात प्रकाशाची लाट येईल व त्यांना देखील आपले आणि देशाचे भवितव्य घडवता येईल.

खरे तर प्रत्येकाने जसे आपण देहदानाचा संकल्प करतो तसेच नेत्रदानाचाही संकल्प करायला हवा नेत्रदान आपण एखाद्याच्या मृत्यूनंतर आपण आपले डोळे अंध व्यक्तीला दिले तर ती व्यक्ती आपल्या डोळ्यांनी जग पाहू शकते जर लोकांनी दृष्टी जणांचा निर्णय घेतला हजारो ,लाखो अंध व्यक्तीचे आयुष्य उजळू शकते त्यांच्या अंधार मय जीवन प्रकाश रुपी डोळ्यांनी उजळू शकते.

खरे तर सुप्रसिद्ध नेत्रशल्य चिकित्सक डॉक्टर के भालचंद्र यांचा १० जून १९२४ साली त्यांचा जन्म झाला .त्यांचा जन्मदिन त्यांच्या कार्याची स्मृती म्हणून राज्यात १९८२ सालापासून दृष्टिदान दिन म्हणून साजरा केला जातो. डॉक्टर .के .भालचंद्रांनी अंधांच्या दु:ख निवारणासाठी आपले सारे आयुष्य वाहून घेतले. महान नेत्र चिकित्सक म्हणून नावलौकिक मिळवला. गरीब दुखी कष्टी लोकांसाठी आपले आयुष्य वेचले .पैशापेक्षा माणूस मोठा असा दृष्टिकोन ठेवून दीनदुबळे गरीब लोकांची सेवा केली. डॉक्टर भालचंद्र यांनी ८०,०००व्यक्तीचे अंधत्व दूर केले .त्यांच्या या मानवतावादी कामाचा सन्मान म्हणून १० जून त्यांचा जन्मदिन त्यांच्या कार्याची स्मृती म्हणून साजरा केला जातो.

विज्ञानाने एवढी प्रगती केली आहे की मानवाचे जीवन अत्यंत सुसह्य असे केले आहे कृत्रिम रित्या अंधांना भूगोलाचे रोपण करता येते पण त्याकरिता गरज आहे मित्रदान करण्याची नेत्रदानामध्ये समाज जागृती करायला हवी अनेक समाजसेवी संस्था शाळा महाविद्यालय प्रसार माध्यमे यांना मनोत्तर नेतृत्वाची संकल्पना पटवून दिल्यास अनेक अंध व्यक्तींना सृष्टी सौंदर्य पाहता येईल म्हणूनच म्हणतात मरावे परी नेतृत्व उरावे आपल्या मृत्युपत्रात मित्रधनाची इच्छा व्यक्त करून त्याविषयी जवळच्या नातेवाईकांना कल्पना देऊन मृत व्यक्तीचे डोळे पुढे कोणास तरी उपयोगी पडू शकतात मृत्यूनंतर सहा ते आठ तासाच्या आत नेत्रदान करणे गरजेचे असते ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी करण्याचा वापर करायचा आहे त्याला २४ तासाच्या आत कॉर्नियाचे पत्र पण करणे गरजेचे असते इथे दलाची प्रक्रिया मृत्यूच्या काही रसामध्ये करण्यात येते त्यामुळे कोणते प्रकारचा त्रास होत नाही एका मृत्यू झालेल्या व्यक्तीची डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते तेव्हा त्याच्या आयुष्य प्रकाशमान होते तुम्हालाही एखाद्या व्यक्तीची आयुष्य उजळून टाकायचं असेल तर जवळच्या दवाखान्यामध्ये नेत्रदानासाठी अवश्य नोंदणी करू शकता.

***संकल्प घेऊ नेत्रदानाचा**
***राख होण्याआधीचा**
***आनंद एका जीवनात**
***नेत्रदानामुळे फुलवण्याचा**

**अर्चना वऱ्हाडपांडे**
अमरावती

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 67

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ठि | ण | स | म | य | ये | ता | को | ण | का | मा | स | ये | तो |
| | ■ | ■ | | ■ | | | ■ | | ■ | | | ■ | | रा |
| | | | | ■ | | ■ | | | | ■ | | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | | | | | ■ | | ■ | ■ | | | र |
| | ■ | | | | ■ | ■ | | | | | | ■ | | हा |
| | | ■ | ■ | | | | ■ | | ■ | | ■ | | | ट |
| | | | ■ | | | | | ■ | | | | | ■ | गा |
| | | | ■ | | | ■ | ■ | | | | ■ | | ■ | ड |
| ■ | | ■ | | ■ | | | | ■ | | ■ | | | ■ | गे |
| | | | | ■ | | ■ | | ■ | | ■ | | | | ■ |
| | ■ | | | | ■ | ■ | | | ■ | | | | ■ | |
| | | | ■ | | ■ | अ | ग्नि | प | री | क्षा | ■ | | | |
| | | ■ | | ■ | | | ■ | | ■ | | ■ | | | |
| | | | | | ■ | | | ■ | | | | | ■ | |
| | ■ | ■ | | | ■ | | | | | ■ | | ■ | | |

### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
- अग्र
- आत
- कल
- काका
- कारा
- खर्च
- गरा
- चार
- जन
- झोप
- तोरा
- दम
- दर
- धाम
- नाद
- नाम
- येन
- रम
- रव
- राहू
- लीला
- लेक
- वत्स
- सम
- सहा

**तीन अक्षरी**
- कसर
- कासव
- कोराडी
- गणक
- गनीम
- चकली
- चमक
- जनक
- नकली
- परीट
- माहूत
- याचक
- योजना
- रपका

**चार अक्षरी**
- रमणी
- रहाट
- लहर
- वडील
- वसूधा
- वळसा
- सप्तम
- सवड
- सागर
- सावळा
- स्थावर
- होकार
- क्षितिज

**पाच अक्षरी**
- अग्रलेख
- आरवणे
- एकमात्र
- एकविरा
- खलबत
- घननीळ
- जमदग्नि
- परवड
- भातुकली
- लाजाहोम
- यजमान
- विरजण
- साक्षात्कार

**सहा अक्षरी**
- अग्निपरीक्षा
- घटस्थापना
- धरणीकंप
- रजनीचर
- वरदक्षिणा
- शकटासूर
- साखरभात
- ये ग ये ग सरी
- रहाट गाडगे
- विजया दशमी

**अन्य अक्षरी**
- कपिलाषष्ठीचा योग
- पराचा कावळा करणे
- कठिण समय येता कोण कामास येतो

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रि | य | द | र्शी | नी | ■ | उ | ख | ळ | पां | ढ | रे | हो | णे |
| य | म | ■ | ■ | ल | क | ब | ■ | ■ | ढ | ■ | ब | ळी | ■ |
| त | या | र | ■ | म | ण | ग | ट | ■ | र | ■ | ती | ■ | झा |
| मा | त | क | ट | ■ | क | ■ | वा | ज | पे | यी | ■ | ग | डू |
| ■ | ना | म | क | र | ण | ■ | ळ | ■ | शा | ■ | वा | री | ■ |
| आ | ■ | वा | म | न | ■ | स | खो | ल | ■ | ग | ल | ब | त |
| सु | धा | र | क | ■ | मा | हे | र | वा | शी | ण | ■ | ■ | र |
| री | म | ■ | ■ | हु | तु | तू | ■ | ज | ■ | गो | री | ■ | णा |
| वि | ण | क | र | ■ | ल | क | ■ | मा | हू | त | ■ | गुं | ता |
| द्या | ■ | र्म | ■ | ऋ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | रा | ■ | ठा |
| ■ | ■ | ध | र | णी | कं | प | ■ | चे | ता | व | णी | ■ | ■ |
| स | क | र्म | क | ■ | क | ला | ग | त | ■ | च | व | री | ■ |
| व | ■ | सं | म | ती | ■ | य | म | क | ■ | क | सा | ■ | ग |
| ल | ■ | यो | ■ | ■ | गु | मा | न | ■ | अं | ■ | ■ | मा | ल |
| त | रं | ग | ■ | च | ल | न | ■ | ■ | श | त | ता | र | का |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 447

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | | 4 | ■ | 5 | 6 | 7 | | ■ | 8 | 9 | ■ | 10 |
| | ■ | 11 | | ■ | | ■ | 12 | | | ■ | 13 | | | 14 | |
| 15 | | | ■ | 16 | | 17 | | ■ | 18 | 19 | | ■ | 20 | | ■ |
| | ■ | 21 | 22 | ■ | 23 | | ■ | 24 | ■ | 25 | | ■ | 26 | | |
| 27 | 28 | ■ | | ■ | 29 | | | | | | ■ | 30 | | ■ | ■ |
| 31 | | 32 | ■ | 33 | ■ | | ■ | | ■ | 34 | 35 | | ■ | 36 | ■ |
| | ■ | 37 | | | 38 | ■ | 39 | | | ■ | | ■ | 40 | | |
| ■ | 41 | | ■ | ■ | | ■ | 42 | | ■ | ■ | 43 | | | | ■ |
| 44 | | | ■ | 45 | | | ■ | ■ | 46 | | | ■ | 47 | | 48 |
| ■ | | ■ | 49 | | | ■ | 50 | | | ■ | 51 | 52 | ■ | ■ | |
| 53 | | | ■ | 54 | | | ■ | ■ | 55 | 56 | ■ | 57 | 58 | | ■ |
| | ■ | ■ | 59 | | | ■ | 60 | 61 | | | ■ | 62 | | ■ | 63 |
| 64 | 65 | | | ■ | ■ | 66 | ■ | 67 | | ■ | 68 | ■ | 69 | | |
| 70 | | ■ | 71 | 72 | 73 | | ■ | | ■ | 74 | | ■ | | ■ | |
| ■ | | ■ | 75 | | | ■ | ■ | ■ | 76 | | | | | ■ | |

**—: आडवे संकेत :—**

1) आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आणि हाथरस गावी जन्मलेले एक प्रसिद्ध हिंदी हास्य कवी
5) पंचेचाळीस अंशाचा कोन
8) तोंडी घेतलेला अन्नाचा गोळा
11) लोक, नागरिक
12) मृदू, मुलायम
13) वरुन खाली उतरणे, ग्रंथातील उतारा
15) स्पष्ट, मोठे
16) अतिक्रमण, ओलांडणे, आज्ञाभंग
18) सुंदर स्त्री
20) तेथवर (हिं.)
21) डिंक, गोंद
23) नवरात्रात देवीच्या पूजेपूर्वी समंत्रक मांडलेला कलश
25) मार्ग, संप्रदाय
26) सर्पयोनीतील सरपटणारा एक घातक प्राणी
27) बळी (हिं.)
29) माणूसघाण्या, मत्सरी
30) पकड, आधार
31) सातांचा समुदाय
34) मोठ्या भावाची बायको
37) एखाद्या व्रताचरणाचे फल सांगणारा ग्रंथ
39) कृतज्ञता व्यक्त करणे, धन्यवाद
40) खादाड
41) रानटी जात
42) सचोटीविषयीचा दुसऱ्यावरचा विश्वास, अब्रू
43) मनन करण्यास योग्य
44) घटक, प्रमाण
45) लग्नाच्यावेळी नवरा व नवरी यांच्या कपाळावर बांधण्याचे आभूषण
46) विद्वान, ज्ञानी
47) त्या बाजूकडे
49) फुलातील रज:कण
50) अनुराग, तत्परता
51) चार युगांपैकी सध्या चालू असलेले युग
53) माणसाळलेला
54) महाराष्ट्रातील एक विशेष समाज
55) रयत, जनता
57) मायावी, कपटी, प्रेम लावणारा
59) अतिशय, भरपूर
60) खेडेगावातील पंचायत समितीचा मुख्य, कमिटीचा अध्यक्ष
62) नवरा, आशीर्वाद
64) एका पालेभाजीचे नाव
67) पायाची खोट
69) कुक्कुट
70) रिकामा, रिक्त
71) एका बाजूचा, एक पक्षीय
74) वृक्षाभोवती बांधलेला ओटा
75) वस्त्र
76) दुसऱ्याच्या मनातील नेमके भाव ओळखणारा

**—: उभे संकेत :—**

1) आवाजाच्या अधिकतेने बधिरता येते या अर्थाचा एक वाक्प्रचार
2) गुन्हेगारांच्या हातात पोलिसांनी घातलेली बेडी
3) पक्ष्यांच्या जमाव
4) दसऱ्याचे शिलांगण
5) अरण्य, जंगल
6) उपहास, थट्टा
7) मृदू, नरम
8) शस्त्राच्या वाराने झालेली जखम
9) एकसारखा पडणारा पाऊस
10) समुदाय, वर्ग, भक्तांचा समूह
13) ज्याला कुणीही नाही असा
14) द्रव्यसंख्या
17) एका रोगाचे नाव
19) लपाछपीचा खेळ, लपून केलेले कृत्य
22) डोंगराची तुटलेली बाजू
24) साखर, केशर, तूप घालून केलेला गोड भात
28) माखलेला, व्यापलेला
30) मालक, स्वामी
32) कंगाल, ज्याच्या जवळचे पैसे संपलेले आहे असा
33) डोळ्यातील आसवे
35) कल्याण चिंतणारा
36) हिंदीत आमदार, प्रत्यक्ष कृतीचा
38) तिरसट मनुष्य
39) उदक, पाणी
40) अधर्म, दुष्कर्म
41) पुरुषांनी कानात घालावयाचा मोत्याचा दागिना
45) पश्चिम महाराष्ट्रात पुण्याजवळील प्रसिद्ध असा एक लोकसभा मतदार संघ
46) पंगत वाढताना केलेला भेदभाव
48) रांजण, मोठे पोट
52) जाहिरपणे वस्तूची बोली बोलणे
53) पायी चालणारा
56) गांजणूक, छळ
58) एकलकोंडा, घरीच राहणारा. लोकांत मिसळयाचा कंटाळा करणारा
59) यासाठी
61) कंटाळणे, नीरस
63) जोराचे भांडण
65) ओळ, रांग (हिंदी)
66) एक चौकोर मिठाई
68) यमलोकीची पापीजनांना शिक्षा देण्याची यातनाप्रद जागा
72) तत्वांश, अर्क, धातूची परीक्षा
73) शरीर
74) विडा, पर्ण ●

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | थ | म | पु | रू | ष | ■ | कै | ला | स | वा | सी | ■ | वि | र | ह |
| यो | ■ | हा | र | ■ | ट | ■ | व | ज | न | ■ | ■ | वि | ष | ■ | ल |
| ग | ग | न | चुं | बी | ■ | श | ल्य | ■ | ई | शा | न्य | ■ | म | ट | क्र |
| शा | ळा | ■ | डी | ■ | पा | प | ■ | आ | ■ | खा | ■ | प्र | भू | ■ | ■ |
| ळा | ■ | अ | ■ | अ | ना | थ | आ | श्र | म | ■ | दो | ■ | ज | क्र | त |
| ■ | मो | ह | र | म | ■ | वि | ■ | या | त | ना | ■ | क्ष | त्रि | य | ■ |
| क | ल | म | ■ | र | ■ | धी | ■ | स | ■ | ग | ■ | ■ | के | म | ल |
| ल | ■ | ह | ■ | ■ | अ | ■ | गो | ■ | स | म | रां | ग | ण | ■ | ■ |
| प | रि | मि | ती | ■ | चा | ■ | ष | ष्ठी | ■ | णी | ■ | र्भा | ■ | अ | सा |
| ■ | ■ | क्र | र | स्था | न | ■ | वा | ■ | घ | ■ | प्र | श | म | न | ■ |
| ख | स | ■ | क | न | क | ना | रा | य | ण | ■ | ग | य | ■ | व | न |
| ड | म | ड | म | ■ | ■ | ग | ■ | ज्ञ | ■ | बे | ट | ■ | उ | धा | र |
| त | ■ | ■ | ठा | णे | दा | र | ■ | ■ | आ | ता | ■ | उ | द्या | न | ■ |
| र | वा | ना | ■ | ■ | ■ | मो | ड | ता | घा | ल | णे | ■ | प | ■ | पा |
| ■ | म | ■ | क्षौ | ■ | व्य | था | ■ | री | त | ■ | ■ | क | न | व | ट |
| ध | न | ग | र | ■ | य | ■ | डं | ख | ■ | स | त | र्क | ■ | र | ■ |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** आज तुम्ही मित्रांसोबत आनंदाने वेळ घालवाल. तुम्ही नवीन कपडे आणि दागिने खरेदी कराल. तुम्हाला सामाजिक सन्मान मिळेल.

**वृषभ:** आजचा दिवस व्यावसायिकांसाठी खूप चांगला आहे. कुटुंबातील वातावरण शांत असेल. तुमच्या जोडीदारासोबत सावधगिरी बाळगा.

**मिथून :** आज नवीन काम सुरू करू नका. बौद्धिक चर्चेसाठी आजचा दिवस चांगला नाही. मुलांबद्दल चिंता असेल. शारीरिक आरोग्यही चांगले राहील.

**कर्क :** आज तुमची निराशा तुम्हाला मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या त्रास देईल. आज मालमत्तेची कामे पुढे ढकलणे योग्य ठरेल. वैचारिक पातळीवर अस्वस्थ होऊ नका.

**सिंह :** आज धार्मिक प्रवासाची शक्यता आहे. नवीन कामे सुरू होतील. परदेशातून तुम्हाला चांगली बातमी मिळू शकते.

**कन्या :** आज तुम्ही कोणत्याही प्रकारच्या निर्णायक स्थितीत पोहोचू शकणार नाही, म्हणून नवीन कामे सुरू करू नका.

**तुळ :** आजची सुरुवात संतुलन आणि मजबूत विचारसरणीने होईल. तुमच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घ्या.

**वृश्चिक :** आज तुम्हाला अध्यात्म आणि देवाच्या भक्तीतून शांती मिळेल. मनात निर्माण होणाऱ्या नकारात्मक भावनांवर नियंत्रण ठेवा.

**धनु :** आज तुमच्या उत्पन्नात आणि नफ्यात वाढ होण्याचे संकेत मिळू शकतात. सामाजिक कार्यात सहभागी झाल्याने मन प्रसन्न होईल.

**मकर :** मालमत्तेची कागदपत्रे तयार करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्हाला व्यवसाय क्षेत्रात यश मिळेल आणि उच्च अधिकारी तुम्हाला प्रोत्साहन देतील.

**कुंभ :** आज व्यापारी वर्गाला काळजी घेण्याचा सल्ला दिला जातो. उच्च अधिकाऱ्यांशी बोलताना काळजी घ्या. मुलांबद्दल चिंता असेल. धार्मिक स्थळी भेट देण्याची शक्यता आहे.

**मीन :** आज तुम्हाला कोणाशीही वाद घालू नका किंवा भांडू नका असा सल्ला दिला जातो. तुमचा राग नियंत्रित करा.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

अजिंक्य भारत
# आपलं नागपूर
मंगळवार, दि. १० जून २०२५


## थोडक्यात

### रेल्वेतर्फे पर्यावरणाबद्दल जनजागृती

**नागपूर :** जागतिक पर्यावरणदिनानिमित्त दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभाग यांच्यावतीने विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. दपूम रेल्वेचे नागपूर विभागीय व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता मार्गदर्शनात विभागातील विविध रेल्वेस्थानकांवर आणि रेल्वे परिसरात पोस्टर्स व माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. रेल्वे स्काउट व गाईडच्या स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर केले रेल्वेस्थानकांवर घोषणांद्वारे एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा बहिष्कार करण्याचे आवाहन करण्यात आले. यासोबतच ओला व सुका कचरा वेगळा टाकण्यासाठी व्यवस्था करण्यात आली. नागपूर विभागातील सर्व गाड्यांमध्ये १०० टक्के बायो-टॉयलेट्सचा समावेश करून हरित विकास आणि स्वच्छतेला चालना दिली जात आहे. 'स्वच्छ रेल्वे-स्वच्छ पर्यावरण' या संकल्पनेत नागपूर विभाग आघाडीवर आहे.

### रेल्वे तिकीट तपासणींचा सन्मान

**नागपूर :** दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात तिकीट तपासणी क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या ३८ कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. नागपूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक दिलीप सिंह यांच्या नेतृत्वात विभागात सतत तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात येते. या मोहिमेद्वारे विनातिकिट प्रवासाला आळा घालण्याबरोबरच अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येते. यात तिकीट तपासणीकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, त्यांच्या कार्याची दखल घेत सन्मान करण्यात आला. नागपूर विभागीय व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांच्या हस्ते अधिक महसूल मिळविण्यात महत्त्वपूर्ण योगदान देणारे मुख्य वाणिज्य निरीक्षक, उप मुख्य वाणिज्य निरीक्षक, वरिष्ठ तिकीट तपासणी कर्मचारी अशा १५ कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले.

### धावती कार पेटली

**नागपूर :** अभ्यंकर नगरातून माटे चौकाकडे धावणाऱ्या कार वाहनाने अचानक पेट घेतला. चालक वेळीच कारमधून बाहेर आल्याने जीव वाचला. ही घटना रविवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास घडली. माहितीनुसार, धावत्या कारमध्ये आलेल्या तांत्रिक अडचणीमुळे चालत्या कारने पेट घेतला. ही बाबत चालकाच्या लक्षात येताच त्याने तत्काळ कार रस्त्याच्या कडेला उभी केली. माहिती मिळताच अग्निशमन दलाने तत्परता दाखवून घटनास्थळ गाठले. मात्र, तोपर्यंत कार पूर्णपणे जळाली होती. याप्रकरणी बजाजनगर पोलिसांनी घटनेची नोंद घेतली आहे.

## निधन

### सहदेव भगत यांचे निधन

**नागपूर :** उंटखाना निवासी आकाश सहदेव भगत यांचे अल्प आजाराने दु:खद निधन झाले. ते ४५ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी (१० जून) सकाळी ११ वाजता प्लॉट क्रमांक ३२३, ए.के. गांधी कार्समागे, उंटखाना, नागपूर येथील त्यांच्या निवासस्थानावरून निघेल. मोक्षधाम येथे अंत्यविधी होणार आहे.

---

कोरणी घाटात आंघोळ करताना बुडाल्या, आई आणि सख्ख्या बहिणींचा समावेश

# नागपुरातील तीन महिलांचा वाघ नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ९ :** पिंडदान कार्यक्रमानिमित्त कोरनी घाटात आंघोळ करताना तीन महिलांचा बुडून मृत्यू झाला. यात आई आणि सख्ख्या बहिणींचा समावेश आहे.

ही दुर्घटना गोंदिया जिल्ह्यातील बाघ नदीतील कोरणी घाटावर रविवारी दुपारी दीड वाजताच्या सुमारास घडली. मीनाक्षी संतोष बघेले (३९), नीतू शत्रुघ्न बघेले (३५), मीराबाई इशुलाल तुरकर (५०) अशी मृतांची नावे असून, राजीवनगर आणि निलडोह (हिंगणा रोड) येथे त्यांचे वास्तव्य होते. माहितीनुसार, लईटोलाजवळील (जि. गोंदिया) पगारटोला येथील तुरकर कुटुंबातील मुकेश तुरकर यांचा ३० मे २०२५ रोजी मृत्यू झाला होता. त्यांच्या पिंडदान कार्यक्रमानिमित्ताने तुरकर कुटुंबीय आणि त्यांचे नातेवाईक रविवारी (८ जून) दुपारी गोंदिया तालुक्यातील रावणवाडी पोलिस ठाणे अंतर्गत कोरणी घाट येथे आले होते. संपूर्ण पूजा अर्चा संपल्यानंतर तुरकर कुटुंबीय वाघनदीपात्रात आंघोळीसाठी उतरले. यावेळी दगडावरून पाय घसरल्यामुळे नीतू शत्रुघ्न बघेले ही पाण्यात बुडू लागली. तिला वाचवण्याकरिता बहीण मीनाक्षी संतोष बघेले ही गेली; परंतु ती सुद्धा बुडू लागल्याने मीराबाई इशुलाल तुरकर यांनी दोघींना वाचविण्याचा प्रयत्न केला मात्र, दुर्दैवाने तिघींचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला. आणखी एकीचा प्रयत्न या महिला पाण्यात बुडत असताना त्यांना वाचवायला आणखी एक महिला धावली मात्र, कुणालाही त्यात यश आले नाही. सदर घटनेची माहिती रावणवाडी पोलिसांना देण्यात आली घटनास्थळी पोहोचून उपस्थित लोकांच्या मदतीने तिन्ही महिलांचे मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढले. महिलांचे मृतदेह उत्तरीय तपासणी करिता गोंदिया येथील केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. त्यानंतर रविवारी रात्री उशिरा नागपूरकडे रवाना करण्यात आले.

**समाज सुन्न**

**तुरकर आणि बघेले कुटुंब गोंदिया जिल्ह्यातून नागपुरात रोजगारानिमित्त आले होते काही वर्षांपासून ते याच ठिकाणी स्थायिक झाले. ईलेक्ट्रिक व्यवसायात असलेल्या या कुटुंबातील एक सदस्य वानाडोंगरी नगरपालिकेत कार्यरत होता, अशातच मुकेश तुरकर यांचा आजाराने मृत्यू झाला, त्यांच्या पिंडदानानिमित्त सर्वजण मूळ गावी गेले होते, नियतीने मात्र बहिणी आणि आईला हिरावून घेतल्याने समाजमन सुन्न झाल्याचे दिसून आले.**

---

### प्राणघातक हल्ला करणारा जेरबंद

**नागपूर, दि. ९ :** दगडाने छाती आणि डोक्यावर मारून गंभीर जखमी करत मृत्यूला जबाबदार ठरलेल्या आरोपीला अटक करण्यात आली ही घटना रविवारी रात्री पावणे नऊ वाजताच्या सुमारास घडली. माहितीनुसार, तहसील पोलिस ठाण्याच्या हद्दीत पंजाब हार्डवेअर अँड सॅनिटरी स्टोअर्स येथे अनुराग उर्फ घोडा सुनील बोरकर याने त्याच्या ओळखीच्या अण्णा उर्फ शैलेश (कचरा वेचक) याला दगडाने छातीवर व डोक्यावर मारून गंभीर जखमी केले. जखमीला उपचारासाठी मेयो हॉस्पिटलमध्ये नेले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी फिर्यादी राकेश श्रीधर सबळ यांनी दिलेल्या तक्रारीवरून तहसील पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३ अन्वये गुन्हा दाखल करून तातडीने आरोपीचा शोध घेऊन त्याला अटक केली.

---

**CAPTION** धोका...




**नागपूर : महावितरणच्या मालकीची ही पेटी सताड उघडी आहे येथून प्रवाह सुरू असल्याचा वा नियंत्रित होत असल्याचे आतील लाल इंडिकेटरवरून दिसून येते आतील भागात कुणी व्यक्ती वा पाळीव जनावरांचा स्पर्श झाल्यास हानी होण्याची दाट शक्यता आहे; परंतु कुण्या जागरुक नागरिकानेही याबाबत महावितरणला माहिती दिली नसल्याचे दिसून येते मेडिकल चौक ते घाटरोडवरील रामबाग कॉलनी बाजूला ही स्थिती दिसून आली.**

---

## बदल्यांचे अर्ज प्रशासकीय मार्गानेच सोडवा

### पालकमंत्री बावनकुळे : जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. ९ :** वैद्यकीय मदतीसाठी शासनाकडे आलेले अर्ज संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ मार्गी लावावेत. नियमानुसार त्यावर तत्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासनाला दिले. तसेच जनसंवाद कार्यक्रमात बदल्यांची निवेदने स्वीकारण्यात येणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे पालकमंत्री बावनकुळे यांच्या जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांना २५६ टोकन वितरित करण्यात आले. सर्व निवेदनांचा स्वीकार करीत संबंधितांना कार्यवाहीचे निर्देश दिले. यात प्रामुख्याने वैद्यकीय मदतीचे अर्ज तत्काळ मार्गी लावावेत. जनसंवाद हा उपक्रम सर्वसामान्यांच्या प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी आहे. त्यामुळे बदल्यांचे अर्ज प्रशासकीय मार्गानेच सोडवावेत, असे निर्देश मंत्री बावनकुळे म्हणाले. प्रामुख्याने सांडपाणी, वीज, पाणी, रस्ते कामांसंबंधी निवेदनांची संख्या अधिक होती नगरपंचायत, नगरपरिषद, ग्राम स्तरावरील कामांचा प्रामुख्याने समावेश असल्याचे दिसून आले. नागरिकांची शासनाकडे प्रलंबित व नियमानुसार करता येणारी कामे दिरंगाई न करता तातडीने पूर्ण करण्याचे आदेश पालकमंत्र्यांनी शासकीय विभागांना दिले. सर्व निवेदने, समस्या व इतर प्रकरणांविषयी संबंधित विभागाने प्राधान्याने कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्र्यांनी दिले. महिलांपासून वयोवृद्ध नागरिकांपर्यंत, तरुणांपासून दिव्यांगांनी पालकमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना निवेदने दिली. निवेदन देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी मंडप, कुलर्स, नाश्ता, चहाची व्यवस्था करण्यात आली होती.

---

## नागपुरात उभारणार 'अ‍ॅग्रो बिझनेस स्कूल'

### केंद्रीय मंत्री गडकरी यांचा पुढाकार, स्पेनमधील उच्चस्तरीय शिष्टमंडळाकडून सहमती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. ९ :** आयआयएम, ट्रीपल आयटी, सिम्बॉयसिस, नॅशनल लॉ स्कूल, नॅशनल फॉरेन्सिक युनिव्हर्सिटी पाठोपाठ आता नागपुरात आंतरराष्ट्रीय दर्जाची 'अ‍ॅग्रो बिझनेस स्कूल' उभारण्यात येणार आहे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या कामी पुढाकार घतला आहे.

उपरोक्त संस्थाच्या निर्मितीसंदर्भात स्पेनमधील एक उच्चस्तरीय शिष्टमंडळाने मागील दिवसांत विदर्भाच्या दौऱ्यावर आले होते यावेळी त्यांनी शिष्टमंडळातील सदस्यांसोबत संवाद साधला. विदर्भातील संत्रा व फलोत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि उत्पादन वाढवण्यासाठी नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने स्पेन येथील डेव्हीस मॉरेनो, फ्रांसिस्को जॅव्हियर आणि जॉन अँटीनिओ यांनी संत्रा उत्पादक क्षेत्रांचा दौरा करून शेतकऱ्यांसोबत थेट संवाद साधला. शेतकऱ्यांच्या गरजा, अडचणी आणि संधी यांचा त्यांनी अभ्यास केला. यानंतर शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली आणि नागपुरात आंतरराष्ट्रीय 'अ‍ॅग्रो बिझनेस स्कूल' सुरू करण्यास सहमती दर्शविली. विदर्भातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची जोड दिल्यास उत्पादन आणि गुणवत्तेत लक्षणीय वाढ होऊ शकते. यासाठी जागतिक स्तरावरचे तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योगातील कौशल्ये आणि निर्यात केंद्रित दृष्टीकोन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळावी आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानामध्ये तरुणांना प्रशिक्षित आणि सक्षम करणे 'अ‍ॅग्रोव्हिजन'चे ध्येय असून, याच माध्यमातून नागपुरात 'अ‍ॅग्रोव्हिजन ग्लोबलअ‍ॅग्रो बिझनेस स्कूल' सुरू करण्याचा प्रयत्न आहे, असे केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सांगितले. शेती ही एक फायदेशीर व्यावसायिक प्रक्रिया होऊ शकते फक्त त्यासाठी योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. 'अ‍ॅग्रोव्हिजन ग्लोबल अ‍ॅग्रो बिझनेस स्कूल' या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. विदर्भातील तरुणांना जागतिक कृषी नवकल्पनांची माहिती मिळावी, त्यांना स्टार्टअप्स व निर्यातीसाठी मार्गदर्शन व्हावे, हा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

---

## 'त्या' साखळी उपोषणाचा २५० वा दिवस

### महसूलमंत्री बावनकुळेंच्या आश्वासनंतरही आंदोलन कायम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. ९ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनशनल पार्क बचाव कृती समितीच्या वतीने रविवारी २५० वा साखळी उपोषणाचा दिवस नारा पार्क येथे साजरा करण्यात आला.

पार्क बचाव कृती समितीचे अध्यक्ष चंदू पाटील यांनी आंदोलन स्थळी सांगितले, की उपोषणाला दिवस उलटूनही नारा पार्कचा विकास किंवा भूमिपूजन सुद्धा झाले नाही. न्याय मिळेपर्यंत लढाई चालूच राहणार आहे रविवारी सकाळी बुद्ध वंदना झाल्यावर सुमधुर भीम गीते सादर करण्यात आली. शशिकला चालखुरे, आनंद रक्षित, सुषमा नागरे कांबले, पंचशीला गजभिये, चंदा वाघमारे, भारती वानखेड़े यांनी गाणे सादर केले. याप्रसंगी चंदू पाटील डॉ. मोरे, अड. नारनवरे, शशिकला चालखुरे, प्रिया चालखुरे, यमुना रामटेके, विजया पाटील, रेखा खोब्रागडे, जीजा रामटेके, वनिता वालदे, अल्का रक्षित, वत्सला बेले, लीला सालवे, बेबी गजभिये, गजानन जांगळे, राजेश रंगारी, मंडपे साहेब, सुषमा नागरे, आनंद रक्षित, सुनीता सांगोले, पंचशीला गजभिये, अर्चना पाटिल, आनंद वाघमारे, हेमंत वाहने, आशा दाहाट, कृतिका दाहाट, जयश्री सोमकुंवर, कामिनी वनकर, सत्यभामा वनकर, विद्याधर बागडे, योगेंद्र शेंडे, बोनी वालदे, अरविंद बागड़े, पुरुषोत्तम भांगे, मधुकर जनबंधु, नारायण सुखदिवे, अजय खोब्रागडे, प्रफुल खोब्रागाड़े, रवि चौहान, रंजीत फुले, आकाश खोब्रागडे, वनेश्वर टेंभूर्णे, मुस्ताक पठाण, अमर शंभरकर, भारती वानखेडे, पूनम ढाले, सरिता डोंगरे, करुणा नागले, राजश्री इंगळे, राजेश फुले, रखूण्डे साहेब, वीरेंद्र मोटघरे, दिवाकर रामटेके, सुनंदा राऊत, विनोद बागडे, मिथिलेश पाटील, नंदू डोंगरे, प्रशांत रामटेके, राजकुमार मेश्राम आदी उपस्थित होते.

---

### बिरसा मुंडा यांची पुण्यतिथी

**रामटेक, दि. ९ :** शौर्य व प्रेरणाचे प्रतीक भगवान बिरसा मुंडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त देवलापार व रामटेक येथील कार्यालयात माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी अभिवादन केले.

आदिवासी हक्कांसाठी लढणारे, समाजासाठी अखंड संघर्ष करणारे भगवान बिरसा मुंडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी देवलापार व रामटेक येथील कार्यालयात उपस्थित राहून बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बिरसा मुंडा यांच्या विचारांनी अनेकांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा दिली, असे मत त्यांनी व्यक्त केले. बिरसा मुंडा यांच्या बलिदानाचे महत्त्व आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाबद्दल माजी मंत्र्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

---

## गोवंशीय जनावरांची वाहतूक करणाऱ्यांवर गुन्हे

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ९ :** पाचपावली पोलिसांनी गोवंशीय जनावरांची निर्दयतेने वाहतूक करून कत्तल करण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपींवर धडक कारवाई केली आहे. दोन कारवायांतून मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पाचपावली पोलिस रविवारी सकाळी गस्त घालत असताना राय आशियाना सोसायटीसमोर एका वाहनातून गोवंशीय जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी गाडी थांबवून तपासणी केली असता अत्यंत क्रूरपणे व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरिता बांधलेली पाच लहान-मोठी गोवंशीय जनावरे आढळून आली. वाहनचालक जावेद खान नासिर खान याने जनावरांचा मालक सलमान कुरेशी असल्याचे सांगितले. पोलिसांनी एकूण ५,२५,२०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात गोवंशीय जनावराना गोरक्षण येथे दाखल केले. याप्रकरणीजावेद खान आणि सलमान कुरेशीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोठ्यावर धाड, पाच जनावरे जप्त अन्य एका कारवाईत पाचपावली पोलिसांनी छोटी रेल्वे लाईन, माता टोळी, मोतीबाग येथील गोठ्यावर धाड टाकली. याठिकाणी अत्यंत क्रूरपणे व निर्दयतेने दाटीवाटीने, चारापाणी न देता कत्तलीकरिता बांधलेली पाच गोवंशीय जनावरे मिळून आली. जनावरांचा मालक गुड्डुदादा शेख शादाब शेख गुलाब याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून घटनास्थळावरून अंदाजे ६०,२०० रुपयांचा मुद्देमाल (पाच गोवंशीय जनावरे) जप्त करण्यात आला.

---

## बुटीबोरीतील उपकेंद्रांना 'आयएसओ' मानांकन

### महावितरणकडून ग्राहकांना अखंडित व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा देण्याचा मानस

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. ९ :** महावितरणच्या नागपूर परिमंडळाने ग्राहकांना अखंडित व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा देण्याच्या वचनबद्धतेत आणखी एक मैलाचा दगड गाठला आहे. सावनेर विभागातील धापेवाडा उपकेंद्रानंतर आता बुटीबोरी विभागातील तब्बल चार ३३/११ केव्ही उपकेंद्रांना एकाचवेळी आयएसओ ९००१:२०१५ गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीचे मानांकन प्राप्त झाले आहे.

आयएसओ मानांकनामुळे निलडोह, सोनेगाव, मोहगाव आणि डोंगरगाव या चारही उपकेंद्रांची गुणवत्ता व सेवा अधिकृतपणे प्रमाणित झाली आहे. अखंड वीज वितरण, ३३/११ केव्ही उपकेंद्रे, उच्चदाब व लघुदाब वाहिन्या आणि वितरण रोहित्रांची देखभाल व संचालन या सेवांमध्ये आता आयएसओ मानकांचे पालन केले जाणार आहे. या उपकेंद्रांचे सक्षमीकरण आणि नूतनीकरण केल्यामुळे यश शक्य झाले आहे.

महावितरणच्या अलीकडेच पार पडलेल्या २०व्या वर्धापनदिन कार्यक्रमात या यशाचे शिल्पकार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ कवी लोकनाथ यशवंत, सुप्रसिद्ध टीव्ही कलाकार अजित कोष्टी, संचालक (ग्राहक व्यवहार) गौरी चंद्रायण यांच्या उपस्थितीत व मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा पार पडला. नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे आणि नागपूर ग्रामीण मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय वाकडे उपस्थित होते. बुटीबोरी विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्नील गोतमारे यांच्या नेतृत्वाखालील निलडोह, सोनेगाव, मोहगाव व डोंगरगाव उपकेंद्रांतील अधिकाऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. यामध्ये एमआयडीसी-दोन उपविभागाचे अति. कार्यकारी अभियंते फिरोज कनोजे व पराग फाटे, सहायक अभियंते प्रणय काळे व शैलेश निमकर, हिंगणा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंते भूपेंद्र रंधे, कनिष्ठ अभियंता सुमित पिसे, बुटीबोरी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंते प्रशांत चरपे, सहायक अभियंते मनोज पुरी तसेच यंत्रचालक प्रशांत ओसवाल, सारंग चापले, महेंद्र वेठी, गणेश शंभरकर, नितीन वैद्य, संजय सिरसाम, गोविंद मानेकर, निलेश जाधव, मनोज चौधरी, हरीश झिले, राहुल शेंडे, प्रजापती व नीता काकडे यांचा समावेश होता. बुटीबोरी विभागाचे अति. कार्यकारी अभियंते अशोक गाणार यांना सन्मानित करण्यात आले. धापेवाडा उपकेंद्रासाठी, ज्याला पूर्वीच आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे, सावनेर विभागाचे कार्यकारी अभियंते सुधीर हेडाऊ, अति. कार्यकारी अभियंते जयंत ठाकरे, कळमेश्वर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंते रोशन शेंद्रे, कनिष्ठ अभियंते रजत पवार व यंत्रचालक योगेश खिरडकर यांचाही सत्कार पार पडला.

---

## बॅनर्जी ले-आऊटमध्ये छत्री वितरित



**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. ९ :** राष्ट्रीय एससी-एसटी विकास परिषद नवी दिल्ली (भारत) अंतर्गत महाराष्ट्र राज्य आयोजित मजूरश्रम सन्मानानिमित्त बॅनर्जी ले-आऊट गार्डन येथे रविवारी छत्री वाटप करण्यात आले

कार्यक्रमात राष्ट्रीय एससी-एसटी विकास परिषद नवी दिल्लीचे अध्यक्ष रवी गिरधारी सोमकुवर, सरचिटणीस डॉ. रुषिकेश मेश्राम, प्रवीण पाटील, अरविंद दुपारे, रुपेश नागदेवे, माजी नगरसेवक रिता मुळे, मंगेश गाकरे लालूचंद चौधरी, नरेश चव्हाण, रवी अण्णा, सतीश कडू, सुनील खोले, विनायक ठक्कर, रविंद ठक्कर आदी उपस्थित होते.

# भारतीय संघाच्या घरच्या मैदानावरील मालिकांच्या वेळापत्रकात बदल

नवी दिल्ली, दि. ९ प्रतिनिधी

भारतीय संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. नवा कर्णधार शुबमन गिलच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघ इंग्लंडविरूद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेदरम्यान सोमवारी भारतीय संघाच्या २ कसोटी सामन्यांच्या वेळापत्रकात बदल केला आहे. तर भारतीय महिला क्रिकेट संघाच्या एकदिवसीय मालिकेतील तीन सामन्यांचे ठिकाण देखील बदलण्यात आले.




नवीन वेळापत्रक जाहीर करताना बीसीसीआयने म्हटले आहे की, २ ऑक्टोबर २०२५ पासून वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना आता कोलकाताऐवजी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर होईल. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना १४ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे, जो आता दिल्लीऐवजी कोलकात्यातील ईडन गार्डन्सवर खेळवला जाईल.बीसीसीआयने अपडेट देत सांगितलं की भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील तिन्ही सामने आता चेन्नईमध्ये होणार नाहीत. या मालिकेतील दोन सामने आता न्यू चंदीगडमधील नवीन पीसीए स्टेडियममध्ये खेळवले जातील, तर शेवटचा एकदिवसीय सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये होईल. चेपॉक स्टेडियमम्ये काम सुरू असल्याने ही मालिका आता तिथे होणार नाही.ऑस्ट्रेलिया अ संघाचा पुरुष संघही भारत दौऱ्यावर येणार आहे. पहिला बहुदिवसीय सामना १६ सप्टेंबरपासून लखनौमध्ये होणार आहे.
दुसरा सामना २३ सप्टेंबरपासून लखनौमध्ये होणार आहे. यानंतर ऑस्ट्रेलिया अ संघ कानपूरमध्ये भारत अ संघाविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळेल.



## 'लॉर्ड्स'वर आफ्रिकेची अग्निपरीक्षा!

नवी दिल्ली, दि. ९ प्रतिनिधी

द. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील टूर्नामेंट्सच्या नॉकआऊट सामन्यांमधील स्पर्धा ही नेहमीच तीव्र आणि रोमांचक राहिली आहे. विशेषतः . १९९९ च्या वनडे विश्वचषक सेमीफायनलपासून ते २०२३ च्या विश्वचषकापर्यंत, या दोन संघांमधील लढतींनी क्रिकेट चाहत्यांना अनेक अविस्मरणीय क्षण दिले आहेत. आता, २०२५ च्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप () फायनलमध्ये या दोन बलाढ्य संघांमधील चौथी नॉकआऊट लढत होत आहे. यावेळी हा सामना कसोटी स्वरूपाचा आणि फायनलचा आहे, ज्यामुळे त्याचे महत्त्व आणखी वाढले आहे.

लॉर्ड्स मैदानावरील ही लढत द. आफ्रिकेसाठी 'चोकर्स' हा टॅग पुसण्याची आणि इतिहास रचण्याची संधी आहे.द. आफ्रिका क्रिकेट संघाने १८८८-८९ मध्ये आपला पहिला आंतरराष्ट्रीय सामना खेळला आणि २०व्या शतकाच्या सुरुवातीला एक मजबूत संघ म्हणून उदयास आला. १९६० च्या दशकात त्यांनी ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघाला पराभूत केले. पण रंगभेद धोरणामुळे १९७० ते १९९१ पर्यंत त्यांच्यावर आंतरराष्ट्रीय बंदी घालण्यात आली. १९९१ मध्ये पुनरागमन केल्यानंतर द. आफ्रिकेने अनेकदा उत्कृष्ट कामगिरी केली. पण टूर्नामेंट्समधील महत्त्वाच्या सामन्यांमध्ये त्यांनी संधी गमावल्या. १९९९, २००७ आणि २०२३ च्या विश्वचषकांतील सेमीफायनलमधील पराभव आणि २०२४ च्या २० विश्वचषक फायनलमधील भारताविरुद्धची हार यामुळे त्यांचा 'चोकर्स' हा टॅग अधिक घट्ट झाला.

द. आफ्रिकेने २०२३-२५ च्या पर्वात प्रभावी कामगिरी केली. त्यांनी भारताविरुद्ध १-१ अशी बरोबरी, सेंचुरियन येथे पाकिस्तानविरुद्ध विजय, तसेच वेस्ट इंडीज, बांगलादेश आणि श्रीलंकेविरुद्धच्या मालिकांमध्ये विजय मिळवले. न्यूझीलंडविरुद्ध त्यांना पराभव स्वीकारावा लागला, तरीही त्यांची विजयाची टक्केवारी ६९.४४ राहिली. ते गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर राहिले, ज्यामुळे ते फायनलमध्ये पोहोचले. ही कामगिरी त्यांच्या सातत्यपूर्ण खेळाचे आणि संघाच्या संतुलनाचे द्योतक आहे.द. आफ्रिकेचा संघ संतुलित आहे, ज्यामध्ये अनुभवी आणि युवा खेळाडूंचा समावेश आहे. एडेन मार्करम, डेव्हिड मिलर आणि टेम्बा बावुमा यांच्या फलंदाजीवर मोठी जबाबदारी आहे. मार्करमने फायनलपूर्वी आत्मविश्वास व्यक्त केला की, त्यांचा संघ ऑस्ट्रेलियाला हरवून चोकर्सचा टॅग पुसून टाकू शकतो.

कागिसो रबाडा आणि मार्को यान्सेन यांचा वेगवान मारा ही त्यांची सर्वात मोठी ताकद आहे. रबाडाने अलीकडेच कसोती क्रिकेटमध्ये नंबर १ गोलंदाजाचा मान मिळवला आहे, ज्यामुळे त्यांच्या गोलंदाजीला धार आली आहे. शिवाय, केशव महाराज सारखा फिरकीपटू महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.ऑस्ट्रेलिया हा एक अनुभवी आणि यशस्वी संघ आहे. त्यांनी पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली २०२३ चे जेतेपद जिंकले आहे. त्यांच्याकडे स्टीव्ह स्मिथ, जोश हेझलवूड आणि मिचेल स्टार्क यांसारखे खेळाडू आहेत, जे कोणत्याही परिस्थितीत सामना फिरवू शकतात. लॉर्ड्सच्या खेळपट्टीवर वेगवान गोलंदाजांना मदत मिळते, पण द. आफ्रिकेचे माजी खेळाडू जॉन्टी रोड्स यांच्या मते, या सामन्यात वेगवान गोलंदाजांपेक्षा फलंदाज आणि रणनीती महत्त्वाची ठरेल.

द. आफ्रिकेला त्यांच्या फलंदाजीवर विशेष लक्ष द्यावे लागेल, कारण ऑस्ट्रेलियाची गोलंदाजी अत्यंत आक्रमक आहे.२००७ च्या वनडे विश्वचषकात सेंट लुसिया येथे पुन्हा एकदा द. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया सेमीफायनलमध्ये आमनेसामने आले. त्यावेळीही ऑस्ट्रेलियाने द. आफ्रिकेचा ७ गडी राखून दणदणीत पराभव केला. आफ्रिकेची फलंदाजी ग्लेन मॅकग्राथ आणि शॉन टेट यांच्या भेदक गोलंदाजीसमोर कोसळली. ज्यामुळे त्यांना केवळ १४९ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाने हे लक्ष्य सहज गाठले. या पराभवाने द. आफ्रिकेची आणखी एक स्पर्धा निराशेत संपली.

## सारा इराणी-पाओलिनीला महिला दुहेरीत पहिले ग्रँड स्लॅम

नवी दिल्ली, दि. ९ प्रतिनिधी

इटलीच्या सारा इराणी आणि जास्मिन पाओलिनी या जोडीने फ्रेंच ओपन २०२५ टेनिस स्पर्धेत महिला दुहेरीचे विजेतेपद पटकावत आपले पहिले ग्रँड स्लॅम जिंकले. रविवारी सायंकाळी रंगलेल्या अंतिम सामन्यात त्यांनी कझाकिस्तानची डॅनिलिना आणि सर्बियाची अलेक्सांड्रा क्रुनिच यांचा ६-४, २-६, ६-१ असा पराभव केला. या विजयासह इराणी आणि पाओलिनी यांनी कारकिर्दीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.
रोलँड गॅरोसवरील अंतिम सामन्याची सुरुवात अत्यंत चुरशीची झाली. पहिल्या सेटमध्ये दोन्ही बाजूंनी जोरदार टक्कर पाहायला मिळाली, पण अखेरीस ५-४ अशा निर्णायक क्षणी ब्रेक मिळवत इराणी-



पाओलिनी जोडीने पहिला सेट ६-४ असा जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये मात्र डॅनिलिना आणि क्रुनिच यांनी उत्कृष्ट पुनरागमन करत इटालियन जोडीवर दबाव आणला आणि तो सेट ६-२ असा सहज जिंकला. त्यामुळे सामना तिसऱ्या आणि निर्णायक सेटमध्ये पोहोचला.
तिसऱ्या सेटमध्ये सारा-जास्मिन पाओलिनी यांनी आपला अनुभव आणि कौशल्याचा पुरेपूर वापर केला. त्यांनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत ५-० अशी मोठी आघाडी घेतली. अखेरीस क्रुनिचचा फोरहँड नेटमध्ये गेल्याने इटालियन जोडीने हा सेट ६-१ असा जिंकत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.
विशेष म्हणजे, याच क्ले कोर्टवर या जोडीने गेल्या वर्षी पॅरिस २०२४ ऑलिम्पिकमध्ये दुहेरीचे सुवर्णपदक जिंकले होते.३८ वर्षीय सारा इराणीसाठी ही स्पर्धा अविस्मरणीय ठरली. महिला दुहेरीच्या अंतिम सामन्यापूर्वी तिने इटलीच्याच आंद्रिया वावास्सोरीसोबत मिश्र दुहेरीचे विजेतेपदही पटकावले होते, ज्यामुळे तिने या स्पर्धेत दुहेरी मुकुट मिळवला. दुसरीकडे, जास्मिन पाओलिनीने गेल्या वर्षी फ्रेंच ओपनच्या एकेरी आणि दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली होती. यंदा एकेरीत चौथ्या फेरीत पराभूत होऊनही तिने दुहेरीतील कामगिरीने सर्वांना प्रभावित केले.

## एकाच ओव्हरमध्ये हिंगानेकरने ठोकले ५ षटकार!



नवी दिल्ली, दि. ९ प्रतिनिधी

महाराष्ट्रमध्ये सुद्धा महाराष्ट्र प्रीमियर लीग २०२५ सुरू आहे, यामध्ये अनेक मोठे क्रिकेट खेळाडू देखील सामील झाले आहेत. सूर्यकुमार यादव, शिवम दुबे त्याचबरोबर पृथ्वी शॉ, श्रेयस अय्यर हे खेळाडू देखील या लीगमध्ये सामील झाले आहेत. रत्नागिरी जेट्स विरुद्ध कोल्हापूर टक्कर्स यांच्यामध्ये सामना पार पडला. त्या सामन्यात एका खेळाडूने कहर केला आहे. रत्नागिरी जेट्स या संघाकडून खेळणारा दिव्यांग हिंगणेकर कर या खेळाडूने एकाच ओव्हर मध्ये पाच षटकार ठोकले आहेत.

## इंग्लंड लायन्सला भारताने ३२७ धावांवर रोखले; खलील अहमदने केली कमाल

नवी दिल्ली, दि. ९ प्रतिनिधी

भारत अ विरुद्ध इंग्लंड लायन्स यांच्यामध्ये सध्या दुसरा कसोटी सामना सुरू आहे. काल म्हणजेच ६ जून रोजी या कसोटी सामन्याचा तिसरा दिवस पार पडला. या तिसऱ्या दिनी भारतीय संघाने इंग्लंडला ३२७ धावांवर रोखले. पहिल्या डावामध्ये भारताच्या संघाने फलंदाजी करीत ३४८ धावा केल्या होत्या. कालच्या सामन्याचा हिरो हा वेगवान गोलंदाज खलील अहमद ठरला. त्याने त्याच्या चार ओव्हरमध्ये चार विकेट्स नावावर केल्या आहेत. तिसऱ्या दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज खलील अहमद याने संघाला चार विकेट्स मिळवून दिल्या. त्याने तिसऱ्या दिवशी जॉर्डन मॅथ्यू, जेम्स रिव्ह, जॉर्ज हिल आणि क्रिस वोक्स या खेळाडूंना बाहेरचा रस्ता दाखविला. अंशुल कंबोज याने संघासाठी दोन विकेट्स घेतल्या. दुसऱ्या सामन्यांमध्ये तुषार देशपांडेला देखील संधी मिळाली आणि संघाला दोन विकेटची कमाई करून दिली. तनुष कोटीयान आणि नितीश कुमार रेड्डी यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. तिसऱ्या डावाच्या समाप्तीनंतर भारताचा संघ सध्या फलंदाजी करीत आहे. यामध्ये भारताच्या संघाने पहिल्या डावामध्ये ३४८ धावा केल्या आहेत. दुसऱ्या डावामध्ये भारताच्या संघाने तिसऱ्या दिवसाच्या समाप्तीनंतर ४ विकेट्स गमावून १६३ धावा केल्या आहेत. या सामन्यात यशस्वी जयस्वाल आणखी एकदा फेल ठरला. त्याने फक्त ५ धावा केल्या आणि विकेट गमावली. तर केएल राहुल याने आणखी एक अर्धशतक झळकावले. त्याने ५१ धावांची खेळी खेळली, यामध्ये त्याने ९ चौकार मारले.
अभिमन्यु ईश्वरन याने दुसऱ्या डावामध्ये कमालीची कामगिरी केली. तो पहिल्या डावामध्ये विशेष कामगिरी करू शकला नाही; पण या डावामध्ये त्याने ८० धावांची खेळी खेळली. यामध्ये त्याने १० चौकार मारले. भारतीय संघासाठी ८ वर्षानंतर पुनरागमन करणारा करुण नायर या डावामध्ये लवकर बाद झाला. त्याने फक्त १५ धावा केल्या.
भारतीय संघासाठी तिसऱ्या दिवसाच्या समाप्तीनंतर ध्रुव जुरेल आणि नितिश कुमार रेड्डी हे दोघे फलंदाजी करीत आहेत. यामध्ये ध्रुव जुरेल याने ६ धावा केल्या आहेत तर नितिश कुमार रेड्डी १ धाव केली आहेत. आज हे दोघे भारतीय संघासाठी सुरुवात करतील.




## ट्रम्प यांच्याशी वाद आणि १५२ अब्ज डॉलर्स पाण्यात



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनामधून उद्योगपती इलॉन मस्क बाहेर पडल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प आणि इलॉन मस्क यांच्यामध्ये वाद सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. मागील काही दिवसांपासून ट्रम्प आणि मस्क हे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत, त्यामुळे दोघांमधील मतभेद समोर आले असून अमेरिकेच्या राजकीय वर्तुळात याची चर्चा रंगली आहे. यातच आता इलॉन मस्क यांना डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात बोलणं चांगलंच महागात पडलं आहे.
टेस्लाच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली असून इलॉन मस्क यांचं १५२ अब्ज डॉलर्सचं नुकसान झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. टेस्लाचे शेअर्स गुरुवारी तब्बल १४ टक्के घसरले असून बाजारमूल्यात १२.६ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. त्यामुळे इलॉन मस्क यांना डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी आधी मैत्री आणि त्यानंतर त्यांच्या विरोधात बोलणं महागात पडलं आहे. तसेच मस्क यांना ट्रम्प यांच्या वादाचा परिणाम मस्क यांच्या टेस्ला कंपनीवर होत असल्याचं दिसून येत आहे. टेस्लाच्या शेअर्समध्ये गुरुवारी १४ टक्के घसरण झाल्याने त्याचं बाजारमूल्य १५२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान मानलं जात आहे. तसेच गेल्या पाच ट्रेडिंग सत्रांपैकी चार सत्रांमध्ये या शेअरमध्ये घसरण झाली आहे. दरम्यान, टेस्लाच्या शेअर्समध्ये मे महिन्यात २२ वाढ झाली होती. मात्र, मस्क आणि ट्रम्प यांच्यातील वादानंतर या आठवड्यात टेस्लाच्या शेअर्समध्ये जवळपास १८ टक्क्यांची घट झाली. तसेच या वर्षी आतापर्यंत टेस्लाचे शेअर्स जवळपास ३० टक्के घसरले आहेत.डोनाल्ड ट्रम्प यांच्याबाबत बोलताना इलॉन मस्क यांनी एक मोठं विधान केलं आहे. इलॉन मस्क यांनी म्हटलं की, ''माझ्याशिवाय ट्रम्प निवडणूक हरले असते.

## नॉनव्हेज थाळी झाली स्वस्त: व्हेज थाळीच्या किमतीतही बदल

नवी दिल्ली, दि. ९ प्रतिनिधी

शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही थाळींच्या किमतीत घट झाली आहे. या वर्षी मे महिन्यात दोन्ही थाळींच्या किमती दरमहा कमी झाल्या आहेत. शाकाहारी आणि मांसाहारी थाळी देखील दरवर्षी स्वस्त झाल्या आहेत. शाकाहारी थाळीमध्ये रोटी, भात, डाळ, दही, सॅलड तसेच कांदा, बटाटा आणि टोमॅटो असतात. मांसाहारी थाळीमध्ये शाकाहारी थाळीचे अनेक पदार्थ असतात. परंतु डाळीऐवजी चिकन (ब्रॉयलर) असते. या घरी शिजवलेल्या थाळींची सरासरी किंमत उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम भारतात या थाळीमध्ये समाविष्ट असलेल्या अन्नपदार्थांच्या किमतींवरून मोजली जाते.क्रिसिल या रेटिंग एजन्सीने प्रसिद्ध केलेल्या 'रोटी राईस रेट' या अहवालानुसार, या वर्षी एप्रिलमध्ये शाकाहारी थाळीची किंमत २६.३ रुपये होती, जी मे महिन्यात २६.२ रुपयांवर आली.
वार्षिक आधारावर, या थाळीची किंमत २७.८ रुपयांवरून २६.२ रुपयांवर आली. अशाप्रकारे, शाकाहारी थाळी मासिक



आधारावर किरकोळ स्वस्त झाली आणि वार्षिक आधारावर २.७७% स्वस्त झाली.क्रिसिलच्या या अहवालानुसार, दरवर्षी शाकाहारी थाळीच्या किमतीत घट होण्याचे मुख्य कारण म्हणजे टोमॅटो, बटाटे आणि कांद्याच्या किमतीत झालेली घसरण. मे महिन्यात टोमॅटोच्या किमती २९ टक्के, कांदे १५ टक्के आणि बटाट्याच्या १६ टक्क्यांनी घसरल्या. खाद्यतेल आणि गॅस सिलिंडरच्या वाढत्या किमतींमुळे शाकाहारी थाळी स्वस्त होण्यापासून रोखली गेली.क्रिसिलच्या या अहवालानुसार, या वर्षी मे महिन्यात मांसाहारी थाळीची किंमत ५२.६ रुपये होती, जी एप्रिलमध्ये असलेल्या ५३.९ रुपयांपेक्षा कमी आहे. मांसाहारी थाळीची किंमतही वार्षिक आधारावर कमी झाली आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात या थाळीची किंमत ५५.९ रुपये होती, जी या वर्षी मे महिन्यात ५२.६ रुपयांवर आली आहे. मांसाहारी थाळी दरवर्षी स्वस्त होण्याचे कारण म्हणजे ब्रॉयलरच्या किमतीत ४% घट, जी या थाळीचा सर्वात मोठा घटक आहे (५०%). ब्रॉयलरच्या किमतीत दरवर्षी ६% घट झाली आहे.
मांसाहारी थाळीतील अनेक खाद्यपदार्थ शाकाहारी थाळीसारखेच असतात, पण डाळऐवजी ब्रॉयलर आहे. क्रिसिल इंटेलिजेंसचे संचालक पुषण शर्मा म्हणाले की, मे २०२५ मध्ये महिना-दर-महिना थाळीच्या किमतीत किंचित घट झाली. शाकाहारी थाळीच्या किमतीत थोडीशी घट होऊन स्थिर राहिल्या आणि मांसाहारी थाळी २ टक्क्यांनी स्वस्त झाली.

## सलग चौथ्या दिवशी शेअर बाजार तेजीत

नवी दिल्ली, दि. ९ प्रतिनिधी

आज लंडनमध्ये होणाऱ्या अमेरिका आणि चीनमधील व्यापार चर्चेमुळे जागतिक बाजारपेठेत वाढ झाल्यामुळे सोमवारी (९ जून) भारतीय शेअर बाजार वाढीसह बंद झाला. यामुळे, सलग चौथ्या व्यापार सत्रात बाजार हिरव्या रंगात राहण्यात यशस्वी झाला. रिझर्व्ह बँकेने () रेपो दरात ०.५% कपात करण्याच्या आणि रोख राखीव प्रमाण () कमी करण्याच्या निर्णयामुळे बँकिंग शेअर्समध्ये वाढ झाली याचाही बाजारावर सकारात्मक परिणाम झाला.आज बीएसईचा ३० शेअर्सचा सेन्सेक्स ८२,५७४.५५ अंकांवर उघडला, जो ३०० पेक्षा जास्त अंकांनी वाढला. तो उघडताच त्यात वाढ दिसून आली. व्यवहारादरम्यान तो ८२,६६९ अंकांवर पोहोचला होता. शेवटी, तो २५६.२२ अंकांनी किंवा ०.३१% च्या वाढीसह ८२,४४५.२१ वर बंद झाला.त्याचप्रमाणे, राष्ट्रीय शेअर बाजार () चा निफ्टी-५० २५ हजारांच्या वर जोरदारपणे उघडला. व्यवहारादरम्यान, तो २५,१६०.१० अंकांच्या उच्चांकावर पोहोचला. शेवटी, तो १००.१५ अंकांच्या किंवा ०.४०% च्या वाढीसह २५,१०३ वर स्थिरावला.१३ प्रमुख क्षेत्रांपैकी बारा क्षेत्रे वधारली. हेवीवेट वित्तीय क्षेत्र सुमारे ०.५% ने वाढले. तर खाजगी बँका आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँका १% आणि १.५% ने वाढल्या. विस्तृत स्मॉल-कॅप आणि मिड-कॅप अनुक्रमे सुमारे १.६% आणि १.१% ने वाढले. यासह, २०२५ मध्ये आतापर्यंत स्मॉल-कॅप्स सकारात्मक झाले आहेत.रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया () ने रेपो रेटमध्ये अपेक्षेपेक्षा जास्त ५० बेसिस पॉइंट्सची कपात केल्यानंतर आणि कॅश रिझर्व्ह रेशो () १०० बेसिस पॉइंट्सने कमी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आज रेट सेन्सिटिव्ह शेअर्समध्येही वाढ झाली.आशियाई बाजारांमध्येही तेजी दिसून आली. लंडनमध्ये अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापार चर्चेपूर्वी गुंतवणूकदार आशावादी होते.

## सोन्याच्या मूल्याच्या ८५ टक्क्यांपर्यंत कर्ज मिळणार

नवी दिल्ली, दि. ९ प्रतिनिधी

जनसामान्यांना कठीण प्रसंगात सोने तारण ठेऊन जलद कर्ज मिळविणे मदतकारक ठरते, त्यामुळे छोट्या कर्जदारांसाठी रिझर्व्ह बँकेने दिलासा देणारा निर्णय घेतला असून, त्यांना त्यांच्या सोन्याच्या मूल्याच्या ८५ टक्क्यांपर्यंत कर्ज आता मिळविता येईल. आतापर्यंत बँकांकडून कर्जा रक्कम सोन्याच्या मूल्याच्या कमाल ७५ टक्के भरेल इतकीच निर्धारीत केली जात होती.प्रति कर्जदार २.५ लाख रुपयांपेक्षा कमी सोने तारण कर्ज घेणाऱ्यास, सुवर्ण मूल्याच्या (लोन टू व्हॅल्यू एलटीव्ही) ८५ टक्क्यांपर्यंत कर्ज देण्यास बँकांना मुभा देणाऱ्या आदेशाला रिझर्व्ह बँकेकडून लवकरच अंतिम रूप दिले जाणार आहे. सुवर्ण



मूल्याची गणना ही मुद्दल आणि व्याज दोहोंना विचारात घेऊन केली जाईल, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्पष्ट केले. बँकेतर वित्तसंस्थांकडील कर्जदाते आणि लहान बँकांच्या बाबतीत, एलटीव्ही हे सध्या ८८ टक्क्यांपर्यंत जाणारे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काही महिन्यांपूर्वी, रिझर्व्ह बँकेने सोने तारण कर्जाबाबत एक धोरण मसुदा तयार केला होता. त्याबाबत संबंधित भागधारकांची सल्लामसलत आणि होणाऱ्या परिणामांचे मूल्यांकन केल्यानंतर अंतिम निर्देश तयार केले गेले आहेत, असे मल्होत्रा यांनी स्पष्ट केले. इतर पैलूंबरोबरच, नवीन सोने तारण कर्जाच्या नियमांत सोन्याच्या मालकीबाबत स्पष्टता आणली गेली आहे. परंपरागत स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेले सोन्याबाबत खरेदीच्या पावत्या सादर करता आल्या नाहीत, तर कर्जदाराने स्व-घोषित प्रतिज्ञापत्र दिले तरी चालू शकेलरिझर्व्ह बँकेने सोने तारण कर्जासंबंधी नियम सर्वच वित्तसंस्थांमध्ये आणि देशात सर्व ठिकाणी एकसारखेच असावेत, या दिशेने कठोर नियम प्रस्तावित केले आहेत. यानुसार सोने तारण कर्ज देताना त्याचे प्रमाण तारण ठेवलेल्या सोन्याच्या मूल्याच्या ७५ टक्क्यांपेक्षा अधिक नसावे, असेही या मसुद्यात आहे. या मसुद्याची अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या मार्गदर्शनाखाली वित्तीय सेवा विभागाने (डीएफएस) तपासणी केली आहे. छोट्या कर्जदारांवर याचा कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची खात्री करण्यासाठी डीएफएसने मध्यवर्ती बँकेला सूचना दिल्या होत्या. त्यामुळे डीएफएसच्या प्रस्तावानुसार, २.५ लाख रुपयांपेक्षा कमी कर्ज घेणाऱ्या छोट्या कर्जदारांना प्रस्तावित निर्देशांमधून वगळण्याची सूचना केली



# वटपौर्णिमा विशेष



**हिंदू धर्मात वटपौर्णिमेला फारच महत्व आहे. आज सगळीकडेच वटपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. वट वृक्षाला ब्रम्हा, विष्णु, महेशाचं रुप मानलं जातं. अशी आख्यायिका आहे की, वटवृक्षाची पूजा केल्याने त्यांच्या पतीची रक्षा केली जाते. वटवृक्षाच्या फांद्यांना आणि पारंब्यांना सावित्रीचं रुप मानलं जातं. कारण देवी सावित्रीने तपस्या करुन पती सत्यवानाचे प्राण यमाकडून परत आणला होता, असे मानले जाते.**

## कथा

जेष्ठ पौर्णिमा हा दिवस 'वटपौर्णिमा' म्हणून साजरा केला जातो. हे व्रत सुवासिनी अपल्या पतिला उत्तम आरोग्य लाभावे, दीर्घायुष्य प्राप्त व्हावे म्हणून करतात. अनेक वर्षापूर्वी भद्र देशात अश्वपती नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला सावित्री नावाची कन्या होती. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली.सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू



नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला. व जंगलात येऊन नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.

सत्यवानाचा मृत्यू जेंव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेंव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागली. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासूसासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेंव्हा त्या वचनबध्द झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व सावित्री व्रत आचरतात.

## वटवृक्षाला सूत गुंडाळण्याचे महत्त्व

अशी मानले जाते की, वटवृक्षाच्या खोडाच्या उभ्या छेदावर असणाऱ्या सुप्त लहरी शिवतत्त्व आकृष्ट करून वायुमंडलात प्रक्षेपित करतात. ज्या वेळी वटवृक्षाच्या खोडाला सुती धाग्याने गुंडाळले जाते, त्या वेळी जिवाच्या भावाप्रमाणे खोडातील शिवतत्त्वाशी संबंधित लहरी कार्यरत होऊन आकार धारण करतात. सुती धाग्यातील पृथ्वी व आप या तत्त्वांच्या संयोगामुळे या लहरी जिवाला ग्रहण करण्यास सुलभ होतात.

## पूजा साहित्य

२ हिरव्या बांगड्या, शेंदुर, एक गळसरि, अत्तर, कापुर, पंचामृत, पुजेचे वस्त्र , विड्याचे पाने, सुपारी, पैसे, गुळ खोबरयाचा नैवेद्य, आंबे, दूर्वा, गहु , सती मातेचा फोटो किंवा सुपारी इ.



## वटसावित्री आरती

अश्वपती पुसता झाला।। नारद सागंताती तयाला।।
अल्पायुषी सत्यवंत ।। सावित्री ने कां प्रणीला।।
आणखी वर वरी बाळे।। मनी निश्चय जो केला।।
आरती वडराजा ।। १

दयावंत यमदूजा। सत्यवंत ही सावित्री।
भावे करीन मी पूजा। आरती वडराजा ।। धृ।।
ज्येष्ठमास त्रयोदशी। करिती पूजन वडाशी।।
त्रिरात व्रत करूनीया। जिंकी तू सत्यवंताशी।
आरती वडराजा ।। २।।

स्वर्गावारी जाऊनिया। अग्निखांब कचळीला ।।
धर्मराजा उचकला। हत्या घालिल जीवाला। येश्र में पतिव्रते।
पती नेई गे आपुला ।। आरती वडराजा ।। ३।।

जाऊनिया यमापाशी। मागतसे आपुला पती।
चारी वर देऊनिया। दयावंता द्यावा पती।
आरती वडराजा । १४११

पतिव्रते तुझी कीर्ती। ऐकुनि ज्या नारी।। तुझे व्रत आचरती।
तुझी भुवने पावती ।। आरती वडराजा ११५११

पतिव्रते तुझी स्तुती। त्रिभुवनी ज्या करिती।।
स्वर्गी पुष्पवृष्टी करूनिया। आणिलासी आपुला पती।।



सौ. संगिता वसंत आत्राम
जिल्हा महासचिव महिला कांग्रेस, अकोला



सौ. पूजा प्रतीक रत्नपारखी
गृहिणी

-: जाहिरात संकलन :-
दिपाली बाहेकर, आकांक्षा गोमासे, चंचल देशमुख

## वटपौर्णिमेला स्त्रियांनी वटवृक्षाची पूजा करण्याचे महत्त्व

प्रामुख्याने महाराष्ट्रात वट पौर्णिमा मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते. ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा ही वट पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. हे व्रत विवाहित स्त्रिया आपल्या पतीला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य प्राप्त व्हावे म्हणून करतात. यासाठी वटवृक्षाची, वडाच्या झाडाची पूजा व प्रार्थना करतात.



पुराणकथेप्रमाणे भगवान शंकराचे लक्ष संसारात नाही म्हणून रागावलेल्या पार्वतीने त्याला तू वृक्ष होशील असा शाप दिला आणि तो वटवृक्ष झाला! महाप्रलय झाल्यावर सगळे चराचर नष्ट झाले तेव्हादेखील फक्त वटवृक्ष पृथ्वीवर घट्ट पाय रोवून उभा राहिला! त्याच्या प्रत्येक फांदी, पारंबी व पानातून सुद्धा नवीन वटवृक्ष जन्म घेतो. म्हणून त्याला अक्षयवट म्हटले गेले आहे. त्याच्या ह्या कालातीत अस्तित्वामुळे स्त्रिया त्याला अखंड सौभाग्याचे साकडे घालतात. गीता जन्माचा एकमेव साक्षीदार म्हणून देखील वटवृक्ष पूजनीय मानतात. नैसर्गिक गुणाप्रमाणे आपल्या पतीला आणि कुटुंबीयांना आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभावे हा त्यामागचा हेतू आहे. म्हणून वट पौर्णिमेला वडाच्या झाडाची पूजा करतात.

**सावित्रीसह ब्रह्मा ही या व्रताची मुख्य देवता आहे. सत्यवान, नारद आणि यमधर्म या उपांग (गौण) देवता आहेत.**

# वटपौर्णिमानिमित्त सर्व महिलांना हार्दिक शुभेच्छा


कोमल आकाश इंगळे
गृहिणी


सौ.वैष्णवी अक्षय झटाले
गृहिणी


डॉ संजीवनी अशोक बिहाडे
उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस


सौ दिपीका शशिकांत चोपडे
गृहिणी


ॲड.सौ.शुभांगी राजेश साकरकार
संचालिका लाईट ऑफ सक्सेस अकॅडमी


सौ. पुष्पा देशमुख
अध्यक्ष, अकोला महानगर महिला काँगेस


सौ.प्रतिभा शिरभाते
अध्यक्ष-शुभोदय फाऊंडेशन महा राज्य, कार्याध्यक्ष -राष्ट्रीय चर्मकार महासंघ महिला आघाडी महा.प्रदेश


सौ. अंकिता गिरीश मंत्री
सरोज अँड सन्स मेकोवर


सौ. मीनल शुभम जाधव
फॅशन डिझायनर
मीनल बुटिक अँड फॅशन स्टुडिओ


सौ.सुमनताई श्रीरामजी गावंडे
प्रथम महापौर अकोला महानगरपालिका, विद्यमान नगर सेविका मनपा अकोला


सौ. शिल्पा राठी बांगड
नृत्यदिग्दर्शक फॅशन डिझायनर
श्रीमती महाराष्ट्र फिटनेस फ्रीक
२०२२ झुम्बा प्रशिक्षक


सौ. योगिता गणेशराव पावसाळे
प्रभाग क्रमांक १९ सभागृह नेता


सौ. मीनाक्षी राजेंद्र फिरके
संचालिका, मंगलाक्षी इव्हेंट


सौ.दीप्ती हरीष अग्रवाल
दीप्ती क्रिएशन, साड्या आणि कुर्तीचे कलेक्शन, मिसेस महाराष्ट्रमध्ये पहिली उपविजेता


सौ. नितिशा पंकज कोठारी
संचालक आणि विपणन प्रमुख - कोठारी कन्स्ट्रक्शन कंपनी


सौ. नयना शरद भुयार
मेकअप आर्टिस्ट आणि त्वचा तज्ञ


सौ. प्रिती निळकंठ जामोतकर
बिजनेस वुमन अँड ब्युटीशियन अँड मिसेस अकोला पार्टिसिपेटेट


सौ पूजा पंकज गावंडे
गृहिणी


सौ. भाग्यश्री अशोक काशिद
पोलिस हेड कॉन्स्टेबल


सौ दीपाली योगेश हिरळकर
(क्लर्क) ग्रा.पं.भौरद, अकोला


सौ.खुशी अमोल खडसान
गृहिणी


सौ. रूपाली सतीश उभे
सरस्वती विद्या मंदिर स्कूल पातुर नंदापूर


सौ. अस्मिता अल्केश खेंडकर
सहसचिव : खेंडकर विद्यालय अकोला


सौ. मृणालिनी निलेश खेंडकर
कोषाध्यक्ष: खेंडकर विद्यालय अकोला


सौ भारती प्रवीण इंगळे
गृहिणी


सौ.स्वाती शुभम वाकोडे
दत्तात्रय अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक अकोला


सौ. अश्विनी शुभम ढोरे
कृष्णा आर्ट


सौ प्राची अंकुश गंगाखेडकर
अध्यक्ष ,अरुणोदय अकोला


सौ.किरण शुभम कडू
सीनियर ॲनालिस्ट


सौ.नताशा शर्मा
संस्थापिका व प्राचार्या
बाऊन्सी बाऊन्स प्री-स्कूल, डेकेअर व ॲक्टिव्हिटी सेंटर, शास्त्री नगर, अकोला


सौ मयुरी शुभम इंगळे पाटील
गृहिणी


डॉ सौ.मनीषा आशिष राठोड
दंतरोग व मुखरोग तज्ञ






अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, मंगळवार, दि. १० जून २०२५







# ३८६ नेत्रदानांतून उजळली २१० जणांची दृष्टी!

## जनजागृतीसह मृत्यूनंतरचे दान ठरत आहे जीवनदायी

। शरद शेगोकार ।

**अकोला, दि. ९ : मृत्यूनंतरही एखाद्याचे डोळे दुसऱ्याला जीवनदायी ठरू शकतात, याचे जिवंत उदाहरण अकोल्यातील 'जीएमसीआय बँक'ने साकारले आहे. ३८६ नेत्रदानांमधून २१० अंधांना नवदृष्टी मिळाली असून, दृष्टीदान ही केवळ वैद्यकीय सेवा नसून, ती एक मानवी संवेदनांची शृंखला असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट होते.**



''नेत्रदान म्हणजे महादान'' या घोषवाक्यावर विश्वास ठेवत अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या (जीएमसी) आय बँकेने गेल्या तीन वर्षांत ३८६ नेत्रदानांची नोंद केली असून, त्यातून तब्बल २१० रुग्णांना नवदृष्टी मिळाली आहे. समाजासाठी आशेचा किरण ठरणाऱ्या या उपक्रमाची माहिती आय बँकचे प्रमुख डॉ. भावेश गुरुदासानी यांनी दिली.

दरवर्षी १० जून रोजी दृष्टीदान दिन साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर बोलताना डॉ. गुरुदासानी यांनी सांगितले की, जून २०२२ पासून जून २०२५ पर्यंत या कालावधीत ३५६ नेत्रदान अकोल्यातून प्राप्त झाले असून, याशिवाय अन्य जिल्ह्यांतून आणखी ३० नेत्रजोड्या प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारे एकूण ३८६ नेत्रजोड्यांपैकी २१० रुग्णांवर यशस्वी केराटोप्लास्टी (कॉर्निया प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया करण्यात आल्या. नेत्रदानामुळे अंधत्व निवारणाची मोठी संधी उपलब्ध होते. केराटोकॉनस, कॉर्निया आघात वा संसर्गामुळे दृष्टी गमावलेल्यांसाठी हे प्रत्यारोपण म्हणजे नवजीवनच ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. नेत्रदानासंदर्भात जनजागृती करणे, मृत व्यक्तीच्या कुटुंबियांशी संपर्क साधणे व त्यांना या पुण्यकार्यात सहभागी करून घेणे ही प्रक्रिया अत्यंत संवेदनशील व गरजेची आहे, असेही त्यांनी सांगितले.

मृत्यू झाल्यानंतर ४ तासांच्या आत नेत्रदान करता येते. अशा वेळी आमच्या आय बँकेला त्वरित कळवावे लागते. आमचे प्रशिक्षित कर्मचारी घटनास्थळी जाऊन नेत्रगोलक संकलित करून ते रुग्णालयात आणतात. तिथे १ ते दीड तासांत प्रत्यारोपणाची प्रक्रिया सुरू होते, अशी माहिती डॉ. गुरुदासानी यांनी दिली. नेत्रगोलक १५ दिवसांपर्यंत सुरक्षित ठेवता येतो. त्यामुळे गरजूंना वेळेवर दृष्टीदान करणे शक्य होते.

> मृत्यू झाल्यानंतर त्वरित आमच्या नेत्रपेढीला कळवणे आवश्यक असते. आमचे प्रशिक्षित डॉक्टर घटनास्थळी जाऊन नेत्रगोलक संकलित करतात. हे नेत्रगोलक विशेष बॉक्सद्वारे सुरक्षितपणे रुग्णालयात आणले जातात व १५ दिवसांपर्यंत साठवले जाऊ शकतात. योग्य रुग्णाची निवड करून एक ते दीड तासात केराटोप्लास्टीद्वारे प्रत्यारोपण केले जाते. वेळेवर ही प्रक्रिया झाल्यास अंध रुग्णाला नवदृष्टी देणे शक्य होते.
>
> **- डॉ.भावेश गुरुदासानी,**
> आय बँक विभाग प्रमुख जीएमसी.

# निविदा अपात्र ठरल्याने फेरनिविदा प्रसिद्ध

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील घनकचरा संकलनाचा ठेका देण्यासाठी महापालिकेने निविदा प्रसिद्ध केली असता, तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या; मात्र यापैकी दोन निविदा अपात्र ठरल्या. त्यामुळे या कामाची फेरनिविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. याची मुदत ११ जूनपर्यंत आहे. महापालिका स्वतः शहरातून घनकचरा संकलित करीत आहे. कचरा संकलन करणाऱ्या वाहनांवर महिन्याकाठी १२ लाख रुपयांचा इंधन खर्च लागत आहे. याशिवाय वाहनाचा देखभाल दुरुस्तीचा खर्चही महापालिकेला करावा लागत आहे. या खर्चाच्या तुलनेने महापालिकेला कोणताही महसूल मिळत नाही. अकोला शहरात दीड लाखाहून अधिक मालमत्ता असून, निवासी मालमत्तांसह व्यावसायिक आस्थापना तसेच इतर प्रतिष्ठान आहेत. महापालिका स्तरावर ट्रॅक्टर व कचरा घंटागाड्यांद्वारे कचरा संकलनाचे काम सुरू आहे; मात्र प्रभावीपणे कचरा संकलनाचे काम होत नसल्याने अनेक ठिकाणी कचरा साचलेला दिसून येतो. त्यामुळे आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार स्वच्छता विभागाने घनकचरा संकलनाचा ठेका देण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली. या कामासाठी तीन निविदा प्राप्त झाल्या; परंतु यापैकी दोन निविदा अपात्र ठरल्या आहेत. महापालिकेने या कामाची फेरनिविदा प्रसिद्ध केली असून, निविदा भरण्यासाठी ११ जून रोजी अंतिम मुदत देण्यात आली आहे. या कामात घनकचरा संकलनाचे दर ठरविण्याचे अधिकार महापालिकेला राहणार आहेत. सद्यस्थितीत घरोघरी कचरा संकलनासाठी ३० रुपये महिना आकारला जात असून, लहान व्यावसायीकांकडून १०० आणि मोठ्या व्यावसायीकांकडून २०० रुपये महिना दर आकारला जात आहे.

## पावसाळ्यात उन्हाचा तडाखा...



**काही दिवसांपासून अवकाळी पावसाने विश्रांती घेतली आहे. आता मृग नक्षत्र लागले असून, उन्हाचा पारा अधिकच वाढत आहे. या उन्हामुळे जनतेच्या जीवाची लाही-लाही होत असून, मृग राजा कधी हजेरी लावणार आहे आणि उकाड्यापासून कधी मुक्ती मिळणार आहे, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. (छाया. संजय ताथुरकर )**

तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोला व दै.अजिंक्य भारत यांच्या विद्यमाने

# बालकामगार विरोधी दिन विषयावर आज भव्य चित्रकला स्पर्धा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** १२ जून हा दिवस जगभरात बालकामगार विरोधी दिन म्हणून ओळखला जातो. या निमित्ताने समाजात जागृती व्हावी, या उद्देशाने प्रसिद्ध उद्योजक, समाजसेवक तथा तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे यांच्या सूचनेनुसार तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोला व दै.अजिंक्य भारत यांच्या विद्यमाने बालकामगार विरोधी दिन या विषयावर भव्य चित्रकला स्पर्धा उद्या, १० जून रोजी आयोजित करण्यात आली आहे.



१२ जून हा दिवस जगभरात बालकामगार विरोधी दिन म्हणून ओळखला जातो. या दिवशी सगळीकडे बालमजुरी विरुद्ध जनजागृती केली जाते. कारण आजची बालके उद्याचे भविष्य आहेत व बालमजुरीमुळे या बालकांचे भविष्य अंधारात जात आहे. पर्यायाने देशाचे भविष्यसुद्धा अंधारात जात आहे. शासनस्तरावर तसेच समाजातील खासगी संस्था, समाजसेवी संस्था या दिवशी विविध उपक्रम राबवतात व बालमजुरी विरुद्ध जनजागृती करतात. या कार्यक्रमांमध्ये किंवा उपक्रमांमध्ये बालमजुरी समाजासाठी कशी घातक आहे ? याबद्दल माहिती दिली जाते, तसेच बालकांसाठी त्यांच्या कोवळ्या वयात मजुरी करून अर्थार्जन करणे यापेक्षा शिक्षण किती महत्त्वाचे आहे, याविषयी जनजागृती केली जाते. याच अनुषंगाने प्रसिद्ध उद्योजक, समाजसेवक तथा तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे यांच्या सूचनेनुसार तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोला व दै.अजिंक्य भारत यांच्या विद्यमाने भव्य चित्रकला स्पर्धा १० जून रोजी आयोजित करण्यात आली आहे. बालकामगार विरोधी दिनाचा या चित्रकला स्पर्धेत विषय राहणार आहे. तसेच ही स्पर्धा सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी खुली राहणार आहे. या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस १००१ रुपये आहे तर दुसरे बक्षीस ७०१ रुपये आहे, तिसरे बक्षीस पाचशे ५०१ रुपये असे आहे. या स्पर्धेसाठी पेपर साइज ११,१३ सुपर व्हाईट शीट पेपरवर चित्र असावे.

चित्र घरूनच काढून आणावे. ११ जून २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजताच्या आत तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी, सुगत भवन, रणपिसे नगर, अकोला येथे चित्र जमा करावे. या स्पर्धेमध्ये ज्या स्पर्धकांना सहभाग नोंदवायचा आहे, त्यांनी ७५८८२५४१५४ या नंबरवर संपर्क साधावा. या स्पर्धांचे बक्षीस वितरण १३ जून रोजी करण्यात येणार आहे.

# सोनोग्राफी कक्षासमोर बेवारस मृतदेह आढळला; प्रशासनाची दुर्लक्षी भूमिका उघड

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय अकोला येथील सोनोग्राफी कक्षासमोर आज दुपारी एक बेवारस मृतदेह आढळून आला. विशेष म्हणजे, सदर मृतदेह दोन ते तीन तास सार्वजनिक ठिकाणी पडून होता, मात्र प्रशासनाकडून कोणतीही तत्काळ चौकशी वा कारवाई करण्यात आली नाही.

ही गंभीर बाब सामाजिक कार्यकर्ते ऋषभ काळे यांच्या लक्षात येताच त्यांनी प्रशासकीय अधिकारी महेश महाकालीवाल तसेच स्मार्ट कंपनीचे सुपरवायझर प्रशांत ठोंबरे यांच्याशी तत्काळ संपर्क साधला. त्यांच्या हस्तक्षेपानंतरच सदर मृतदेह सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आला.

दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास रुग्णालयाचे सीएमओ करीत असून, मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत; मात्र रुग्णालय प्रशासनाच्या दुर्लक्षित भूमिकेमुळे जीएमसीमध्ये रुग्ण सुरक्षा व व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** अकोला जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांनी अवैध जुगार अड्ड्यांवर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ८ आरोपींना ताब्यात घेऊन एकूण २२ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## ८ जुगारी गजाआड!

९ जून २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पो.स्टे. जुने शहर हद्दीतील यशवंत नगर व वाशिम बायपास परिसरात जुगार अड्ड्यावर छापा टाकत नीलेश सुरेश तेलगोटे, भारत गोपनारायण, शब्बीर खान, अनिल महल्ले, पवन धाडसे व मच्छिंद्र पाटील या ६ आरोपींना अटक केली. या ठिकाणाहून १६ हजार २९० ची रोख रक्कम व जुगार साहित्य जप्त करण्यात आले.

यानंतर दुसऱ्या टप्प्यात सोनटक्के प्लॉट, अकोला येथे दुसरा जुगार अड्डा उघडकीस आला. याठिकाणी नूर खा नियमात खा व अब्दुल शकील अब्दुल हकीम यांना ताब्यात घेऊन ६ हजार २५० रोख रक्कम व साहित्य जप्त करण्यात आले.या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ८ आरोपींविरुद्ध पो.स्टे. जुने शहर अकोला येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी, हवा. अविनाश पाचपोर, पो.हवा. वसीमोद्दीन, निलेश खंडारे, अब्दुल माजिद, इजाज, अशोक सोनवणे, मो. आमीर यांनी संयुक्तपणे केली.

# वटपौर्णिमा: श्रद्धेचा फेर, सौभाग्याची आस

## पारंपरिक व्रताला धार्मिक व वैज्ञानिक अधिष्ठान

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. ९ :** उद्या, १० जून रोजी वटपौर्णिमा. सौभाग्यवती महिलांसाठी पतीच्या दीर्घायुष्यासाठी उपवास, व्रत आणि वड पूजन करण्याचा हा शुभ दिवस आहे. अकोल्यातील शिवाजी नगर परिसरातील शेकडो वर्ष जुना वटवृक्ष यानिमित्ताने श्रद्धेचे केंद्र ठरणार आहे. या परिसरातील प्राचीन महादेव मंदिराजवळ असलेले हे वडाचे झाड प्रत्येक वर्षी वटपौर्णिमेला महिलांची मोठी गर्दी आकर्षित करते. सकाळपासूनच पूजन, ओवाळणी, फेर घेणे, नवस फेडणे आदी विधी पार पडतात. नवविवाहित महिलांसह विविध वयोगटातील सौभाग्यवती पारंपरिक वेशात येथे उपस्थित राहतात.

पुराणकथांनुसार, सावित्रीने सत्यवानासाठी वडाखाली यमराजाशी युक्तिवाद करत त्याचा जीव वाचविला होता. ही कथा भारतीय संस्कृतीत 'वटसावित्री व्रता'च्या रूपात साजरी केली जाते. त्यामुळे वडाचे झाड अखंड सौभाग्याचे प्रतीक मानले गेले आहे. वडाचे झाड धार्मिकदृष्ट्या जसे पूजनीय आहे, तसेच त्याचे वैज्ञानिक महत्त्वही मोठे आहे. वड २४ तास प्राणवायू सोडते. त्याच्या मुळांपासून पानांपर्यंत अनेक औषधी गुणधर्म असून आयुर्वेदात याचा उपयोग त्वचारोग, मधुमेह व दातांच्या समस्यांवर केला जातो.

### वटपौर्णिमा म्हणजे नात्यांचा, श्रद्धेचा आणि संस्कृतीचा उत्सव



वटपौर्णिमा हा सण फक्त उपवास वा पूजेपुरता मर्यादित नसून, तो स्त्रीच्या निष्ठा, प्रेम आणि त्यागाचे प्रतीक आहे. सावित्रीच्या कथेमुळे हे व्रत प्रेरणादायी ठरते. आजच्या युगातही महिलांनी जपलेली ही श्रद्धा आणि कुटुंबप्रेम हीच आपल्या संस्कृतीची खरी ताकद आहे. वडाच्या वृक्षाभोवती फिरताना नात्यांची जपणूक आणि स्त्रीशक्तीचे सामर्थ्य जाणवते, म्हणूनच वटपौर्णिमा म्हणजे एक सजीव संस्कार परंपरा आहे.

**सौ. वंदना महेंद्र गोमासे**

### वटपौर्णिमा : विज्ञान, पर्यावरण आणि नात्यांचा संगम



वटपौर्णिमा हा सण केवळ धार्मिक परंपरा नसून त्यामागे पर्यावरण, आरोग्य व नातेसंबंध दृढ करण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन आहे. वडाच्या झाडाभोवती प्रदक्षिणा, उपवास व ध्यान यामुळे मानसिक शांती, शरीरशुद्धी व आत्मसंयम मिळतो. चंद्राच्या प्रभावामुळे पौर्णिमेला मनोवृत्ती अस्थिर असते, अशावेळी व्रत-पूजन मानसिक संतुलन राखण्यास मदत करते. भारतीय सणांचे खरे मूल्य त्यामागील विज्ञान समजून घेतल्यासच पटते.

**- ॲड. शुभांगी राजेश साकरकार**

### वटपौर्णिमा म्हणजे नात्याचे नवे चिंतन



वटपौर्णिमा हे केवळ नवऱ्याच्या दीर्घायुष्यासाठी केलेले व्रत नाही, तर नात्याच्या दृढतेचा मनोमय संकल्प आहे. सावित्रीसारखं नात्यावरील निष्ठेचं प्रतीक वाटणारी ही पौर्णिमा मला दरवर्षी आमच्या सहजीवनातील आठवणी जागवते. भांडणं, समजुती, संकटं सगळ्या क्षणांची साथ याच नात्याला बळकट करत आली आहे. वटपौर्णिमा माझ्यासाठी एक नवं वचन आहे प्रेम, विश्वास आणि समर्पणाचं!

**- सौ. मीनल शुभम जाधव**

# रामपीर नगरातील महिलांचे मनपावर ठिय्या आंदोलन!

## पाण्याच्या लेखी हमीशिवाय न उठण्याचा निर्धार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ९ :** जुन्या शहरातील रामपीर नगरमध्ये गेल्या तीन महिन्यांपासून सुरू असलेल्या पाण्याच्या टंचाईने अखेर महिला संतप्त झाल्या असून, ९ जून रोजी दुपारी १ वाजता त्यांनी थेट अकोला महापालिकेच्या आयुक्त कार्यालयात धडक देत निवेदन देण्याचा प्रयत्न केला. मात्र, आयुक्त कामानिमित्त बाहेर गेल्याचे कळताच महिलांनी संतापाने पाणीपुरवठा विभागातच ठिय्या दिला आणि ''लेखी हमीशिवाय हटायचं नाही'' असा ठाम पवित्रा घेतला.



विभाग प्रमुख अनुपस्थित असल्याने महिलांचा संताप अधिकच वाढला. अखेर दुपारी ४ वाजता विभागप्रमुख अमोल डोईफोडे आले. त्यांनी महिलांचे म्हणणे ऐकून घेतले, परंतु निवेदन स्वीकारण्याऐवजी केवळ तोंडी आश्वासन देत ''दहा दिवसात पाणी मिळेल'' असे सांगितले. मात्र महिलांनी स्पष्ट शब्दात म्हटले की, ''आम्ही लेखी हमीशिवाय उठणार नाही. आमच्या गल्लीत तीन महिन्यांपासून एक थेंब पाणीही आलेले नाही!''

रेखाबाई सदांशीव यांच्या नेतृत्वात झालेल्या या ठिय्या आंदोलनात परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. महिलांनी प्रशासनावर गंभीर आरोप करताना सांगितले की, ''पाठीमागच्या आणि समोरच्या गल्लीत नियमित पाणी येते, पण आमच्या गल्लीत काहीच नाही. अमृत योजनेतून टाकलेली पाइपलाइन चुकीच्या पद्धतीने जोडल्यामुळे पाण्याचा फोर्सच येत नाही. पाच मिनिटं गढूळ पाणी आलं की लगेच थांबतं. कधी अळ्यांसह पाणी आले तर मुलाबाळांना आजार होण्याची भीती वाटते.''

भीमनगर येथून आलेल्या मुख्य जलवाहिनीऐवजी पाइपलाइन वेगळ्या दिशेने जोडल्याने रामपीर नगरात पाणी पोहोचत नाही. जवळचा मार्ग सोडून लांबचा वळसा घेत जोडणी करण्यात आल्यामुळे पाण्याचा दाब कमी होतो, असा महिलांचा आरोप आहे. मुख्य जलवाहिनीशी थेट जोडणी दिल्यास समस्येवर कायमचा तोडगा निघेल, असे महिलांचे म्हणणे आहे.महापालिकेच्या हलगर्जी कारभारामुळे महिलांना उकाड्याच्या दिवसांत पाण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागत आहे. आता विभागप्रमुखांच्या तोंडी आश्वासनानंतर खरोखर १० दिवसात पाणी येते की पुन्हा आंदोलन उसळते, याकडे संपूर्ण रामपीर नगरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### आमदार साजिद खान पठाण यांचा पुढाकार

रामपीर नगरातील महिलांच्या पाण्यासाठीच्या ठिय्या आंदोलनाची दखल घेत पश्चिम अकोल्याचे आमदार साजिद खान पठाण यांनी पुढाकार घेतला आहे. महिलांनी त्यांच्याशी संपर्क साधताच आमदारांनी महापालिका पाणीपुरवठा विभागाला तातडीने सूचना दिल्या. या गल्लीला पाणी का मिळत नाही, याचा त्वरित शोध घ्या व समस्या लवकरात लवकर सोडवा,असे स्पष्ट आदेश आमदार पठाण यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा

बुलडाणा, मंगळवार दि.१० जुन २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### हर्ष औ.प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक सोहळा साजरा



खामगाव : हर्ष औद्योगिक प्रशिक्षण संस्था संस्थे मध्ये एक अत्यंत गौरवशाली आणि प्रेरणादायी कार्यक्रम पार पडला. आजच्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याला राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, आणि आपल्या संस्थेनेही या पवित्र प्रसंगाला आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जनार्दन हेंड पाटील यांनी मार्गदर्शन केले, तसेच संस्थेचे सचिव मा. हर्षदजी हेंड पाटील, यांनी विद्यार्थांना मागर्दर्शन दिले तर प्राचार्य माननीय अंकित जैस्वाल सर यांनी शालेय व शैक्षणिक महत्वाचे संदेश दिले. तसेच, आपल्या विविध ट्रेडच्या मार्गदर्शकांनी देखील उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. तेसेच वीजतंत्री ट्रेड चे निदेशक गणेश वानखडे सर यांनी सूत्रसंचालन केले व वेल्डर ट्रेड चे निदेशक अनिल तेलगोटे सर यांनी आभार प्रदर्शन केले या वेळी फिटर ट्रेडचे निदेशक प्रकाश माकोडे सर, व राजेश ओईम्बे सर, कोपा ट्रेडचे निदेशक विवेक शेजोळे सर, व लिपिक निखिल जयस्वाल सर, व सर्व विध्यार्थी उपस्थित होते.

### खड्ड्यामुळे दुचाकी स्लिप होऊन एकाचा मृत्यू; दोघे गंभीर

**दे.राजा :** खड्यामुळे दुचाकीचा अपघात होऊन एका इसमाचा जागीच मृत्यू झाला तर दोघेजण गंभीररित्याा जखमी झाल्याची घटना खामगाव एमआयडीसी परिसरातील एका ढाब्यासमोर घडली. जळगाव जामोद येथील रहिवासी साबिर खान सुभान खान, साहिल खान साबिर खान व उमेर खान महेबुब खान हे तिघे ८ जूनच्या रात्री खामगाव शहरात नातेवाईकाच्या अंत्यविधीसाठी येत होते. दरम्यान लाबेला हटिल जवळ खड्ड्यात दुचाकी उसळून स्लिप झाली. या अपघातात साबिर खान सुभान खान यांचा जागीच मृत्यू झाला. तर साहिल खान साबिर खान व उमेर खान महेबुच खान हे दोघे गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच शिवाजी नगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते. नांदुरा रस्त्याचे काम सुरू असून अर्धवट रस्ताकामामुळे ठिकठिकाणी मोठे मोठे खड्डे पडले असूनअपघातात कारणीभूत ठरत आहे.

### अनोळखी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

**खामगाव :** एका अनोळखी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. स्थानिक सामान्य रुग्णालयात ६ जून रोजी अंदाजे ५० वर्षीय अनोळखी महिलेला. उपचारार्थ भरती करण्यात आले होते. दरम्यान सदर महिलेचा काल ८ जून रोजी पहाटे ४.०९ वा.च्या सुमारास उपचार सुरू असताना मृत्यू झाला. याप्रकरणी डॉ. देशमुख यांच्या तर्फे कक्षसेवक यांनी दिलेल्या मेमोवरून शहर पोलिसांनी कलम १९४ नुसार मर्ग दाखल केला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# शास्त्रज्ञांच्या माध्यमातून शेती तंत्रज्ञान समजून घ्यावे

## विकसित कृषि संकल्प अभियान केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे आवाहन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि. ९**

विकसित कृषी संकल्प अभियान शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यामधील संवाद अधिक बळकट करण्याकरिता मोहिम राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून विद्यापीठ आणि कृषी शास्त्रज्ञांनी निर्माण केलेले विविध संशोधन, तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत अधिक जलद गतीने पोहोचविण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन संशोधनाला नवीन दिशा मिळणार आहे. त्याचा लाभ शेतकरी बांधवानी घ्यावा, असे आवाहन आयुष्य राज्यमंत्री व आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे.

कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग आणि आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित कृषी संकल्प अभियानाच्या




आयोजित कार्यक्रमात ना. प्रतापराव जाधव बोलत होते. यावेळी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अमोल झापे, कृषी विभागाचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, आत्माचे प्रकल्प संचालक पुरुषोत्तम उन्हाळे, तहसीलदार संतोष काकडे, कृषि विज्ञान केंद्राच्या डॉ. भारती तिजारे (कृषिविद्या विभाग), डॉ. वाडकर (विस्तार शिक्षण), केळवद येथील प्रगतशील शेतकरी प्रताप पाटील आणि शेतकरी बहुसंख्यने उपस्थित होते.

राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव म्हणाले की, महाराष्ट्रात आणि भारतामध्ये सुरू असलेल्या विकसित कृषी संकल्प अभियानाची माहिती देत शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यामधील संवाद अधिक बळकट करण्याकरिता हे अभियान असल्याचे सांगितले. शास्त्रज्ञांनी निर्माण केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून त्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी नक्कीच मदत होणार आहे. मृदा परीक्षण, मृदा आरोग्य पत्रिकेचे वाचन, बियाण्यांची निवड, खतांचा योग्य वापर, लागवड पद्धती, शेतीमधील नवीन तंत्रज्ञान जसे ड्रोनचा फवारणीसाठी वापर, रासायनिक कीटकनाशकांच्या ऐवजी जैविक कीटकनाशक व बुरशीनाशकांचा वापर शेतीमध्ये करावा, असेही त्यांनी सांगितले. .

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी कृषि विज्ञान केंद्र, कृषी विभाग, बुलढाणाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी जैविक निविष्ठा, वाचन साहित्या आणि बीजप्रक्रिया प्रात्याक्षिकाचे आयोजन केलेल्या दालनाची पाहणी केली.

या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, कृषी महाविद्यालय, बुलढाणा, कृषी विभाग आणि आत्मा, बुलढाणा यांच्या माध्यमातून दिनांक २९ मे पासून सुरू असलेल्या या अभियानामध्ये शेतकरी सक्रियतेने सहभाग घेत असून शेतीसाठी आवश्यक तंत्रज्ञानाची माहिती उत्स्फूर्तेने घेत असल्याबाबत सांगितले.

यावेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून नॅशनल ब्युरो ऑफ सॉईल सायन्स नागपूर या संस्थेच्या वतीने डॉ. निर्मल कुमार यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षण, बीज आणि खत व्यवस्थापन, ओलीत व्यवस्थापन आणि जमिनीच्या सुपीकतेचे व्यवस्थापन करण्याबाबत मार्गदर्शन केले.

# भाजपा तालुका अध्यक्षपदी सतिष पाटील

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.९**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनी सागवन येथील गावकरी मंडळींनी सतीश भाकरे पाटील यांची भाजपा तालुका अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल जाहीर सत्कार व त्यानिमित्त शिवव्याख्यानाचे आयोजन करून आनंदोत्सव साजरा केला.

गावातील तरुणांनी ढोल ताशे नगारे लावून वाजत गाजत सतिश भाकरे पाटील यांची गावातून मिरवणूक काढली. या मिरवणुकीमध्ये गावातील सर्व अबाल वृद्ध महिला शेतकरी कष्टकरी तरुण-तरुणींनी मोठ्या संख्येने सहभागी झाले. महिलांनी सडा, रांगोळ्या काढून नवनियुक्त भाजपा तालुकाध्यक्षांचे स्वागत केले. मिरवणुकीमध्ये सर्व गावकऱ्यांनी भगवे फेटे बांधलेले होते तसेच फटाक्यांची आताशबाजी करून आपल्या लाडक्या भूमिपुत्राला आशीर्वाद दिले. गावातील सर्वांच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या आपल्या गावाच्या तरुणाची भाजप सारख्या राष्ट्रीय विचारांवर चालणारा व जनकल्याणकारी



कार्याने संपूर्ण जगभर प्रसिद्धी पावणारा राष्ट्रीय पक्षाचे तालुका अध्यक्षपदी निवड होणे हा सागवन गावाचाच सन्मान आहे असे मानून सर्वांनी एक दिलाने आनंदोत्सव जल्लोष साजरा केला. हा सत्कार सोहळा छत्रपती शिवरायांच्या शिवराज्याभिषेक दिनाच्या मुहूर्तावर असल्याने शिवशाहीर जगदीशचंद्र पाटील यांचे व्याख्यान सुद्धा गावकऱ्यांनी ऐकले. शिवव्याख्यानाचा सर्व गावातील मंडळींनी लाभ घेऊन छत्रपती शिवरायांच्या जगप्रसिद्ध शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या आठवणी पुन्हा एकदा जागृत करून हिंदवी स्वराज्याच्या रयतेसाठी छत्रपतींनी घेतलेल्या अपार कष्टाचा, पराक्रमाचा, त्यागाचा, बलिदानाचा इतिहास सर्वांनी शिवशाहीर जगदीशचंद्र पाटील यांच्या चित्तथरारक व्याख्यानातून अनुभवला.

# आदिशक्ती मुक्ताईचे आज बुलडाण्यात आगमन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.९**

आषाढी वारीच्या निमित्ताने श्री संत मुक्ताबाई च्या पालखी सोहळ्याला प्रथम पंढरपुरात दाखल होण्याचा सन्मान मिळतो. सलग ३१६ व्या वर्षी आदिशक्ती मुक्ताईचे खानदेश, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र मार्गे पंढरपुरात ३३ व्या दिवशी सातशे किलोमीटर प्रवास करून प्रथम आगमन होते. ६ जून रोजी मुक्ताईनगर कोथळी वरून आदिशक्ती मुक्ताई चे प्रस्थान पंढरपूरच्या दिशेने झालेले आहे.आज पालखी बुलडाणा पोचत आहे.

दिंडी प्रमुख मुक्ताई शिष्यशिरोमणी रवींद्र महाराज हरणे यांच्या मार्गदर्शनात तापितीर ते भिमातीर ७०० किलोमीटर पायी दिंडी सोहळा सलग तीनशे



सोळाव्या वर्षी सलग निघाला आहे.

दिंडी सोहळ्यात मुक्ताई संस्थांनचे अध्यक्ष रवींद्रभैय्या पाटील, मुक्ताई फळावरील सर्वश्री हभप रतिराम महाराज, नितीन महाराज, विशाल महाराज खोले, अमोल महाराज कासलीकर,पंकज महाराज, लखन महाराज, सतीशचंद्र रोठे पाटील,विजय महाराज खवले, निनाजी महाराज खोडके यांच्यासह महाराष्ट्रातील नामवंत, कीर्तनकार, प्रवचनकार, टाळकरी, विणेकरी, मृदुंगाचार्य, गायनाचार्य, पताकाधारी, वारकरी, महिला, अबाल- वृध्द बहुसंख्येने सामील झालेले आहे.

मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक चार राज्यातील मुक्ताई सेवक वयाच्या सातव्या वर्षापासून तर ८५ वर्षापर्यंत मुक्ताई दिंडी सोहळ्यात सामील झाले आहे. मुक्ताईनगर कोथळी ते मलकापूर - मोताळा मार्गे श्री संत ब्रह्मचित्कला आदिशक्ती मुक्ताई चे आज बुलडाण्यात आगमन होणार आहे. सकाळी सहा वाजता मोताळ्यातून आदिशक्ती आईसाहेब मुक्ताबाईचे प्रस्थान होणार असून सायं. पाच वाजेपर्यंत श्रीसंत मुक्ताई माता विसाव्यासाठी बुलडाण्यात स्थानापन्न होणार आहेत. आमदार चैनसुख नऊ किलोमीटर पायी वारीत सहभागी. यावेळी महाप्रसादाचे उत्कृष्ट आयोजन केले.

# आरपीआयच्या भारत जिंदाबाद यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**दे.राजा दि.९**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया बुलढाणा जिल्हा च्या वतीने मेहकर येथे गत ४ जून रोजी भारत जिदाबाद यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले). राष्ट्रीय अध्यक्ष ना.रामदास आठवले केंद्रीय सामाजिक न्याय अधिकारिता सक्षमीकरण मंत्री, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरोदे, कार्यअध्यक्ष बाबुराव दादा कदम, राज्य संघटक सचिव अँड ब्रह्मानंद चौहान, जिल्हा निरीक्षक तथा राज्य संघटक सुधाकर तायडे, जिल्हा संपर्कप्रमुख बाबासाहेब जाधव, यांच्या आदेशाने बुलढाणा जिल्हा जिल्हाध्यक्ष शरदभाऊ खरात यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा भर जिंदाबाद भारत यात्रेचे आयोजन २५ मे ते ५ जून पर्यंत करण्यात आले होते. जिल्हाभर यात्रेचे उत्साहात स्वागत करण्यात आले. या अनुषंगाने पैलगाम मध्ये जो आतंकी



हमला पाकिस्तानने केला त्या पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारत देशाने सिंदूर ऑपरेशन करून पाकिस्तानला धडा शिकवला व त्याचा विजय दिवस साजरा करण्यासाठी देशातील सैनिकांचा गौरव करण्यासाठी भारत जिंदाबाद यात्राचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षातर्फे जिल्हाभर करण्यात आल्याची माहिती बुलढाणा जिल्हाध्यक्ष शरदभाऊ खरात यांनी दिली. देशाच्या स्वाभिमानासाठी तसेच भारतीय सैन्याच्या शौर्याबाबत त्यांना सलामी देण्यासाठी करण्यात आलेल्या भारत जिंदाबाद यात्रेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# सहकार विद्या मंदिरात पर्यावरण दिन साजरा

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**संग्रामपूर दि.९**

तालुक्यातील वरवट बकाल येथील सहकार विद्या मंदिरात आज ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीचे उपाध्यक्ष तथा सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष किशोर केला व मुख्य संयोजिका तसेच महाराष्ट्र बाल शिक्षण परिषदच्या अध्यक्षा डॉ. स्वाती केला यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन प्राचार्य



योगेश घाटोळे, उपप्राचार्य कोकाटे, पर्यवेक्षिका येऊतकार आणि मानकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शितल सावतकर यांनी केले. यावेळी प्राचार्य घाटोळे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्व पटवून दिले. तसेच वर्ग तिसरीतील विद्यार्थिनींनी झाडे लावा झाडे जगवा ही कविता सादर करून विद्यार्थ्यांना झाडे लावण्याचा संदेश दिला. ही ऍक्टिव्हिटी सादर करण्यासाठी विमल माकोडे व मनीषा जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरण दिनाविषयी घोषणा देत शाळा परिसरात वृक्षदिंडी काढली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# दोशी संस्थेच्यावतीने मोफत ताक वाटप

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.९**

श्रीमती मानकुंवरबेन लालचंद दोशी संस्थेच्या वतीने यंदा खामगाव शहरात ६ अप्रैल २०२५ पासून छास (ताक)चे वाटप सुरू करून आज ८ जून पर्यंत कोणत्याही भेदभाव न करता सर्व लोकांना ८०० किलोग्रॅम दूध पावडर चे ताक निशुल्क वितरित करण्यात आले. अकोला येथील जोशी परिवारा च्या वतीने सतत ४९ वर्षापासून खामगाव शहरात ताक निशुल वाटप करण्यात येते. श्रीमती मानकुंवरबेन लालचंद दोशी सार्वजनिक छास वितरण केंद्र खामगाव ची स्थापना १९७६ साली झाली. हि संस्था ४९ वर्षांपासून अखंड सेवा देत आहे. मानव सेवा - जीव दया ही सेवा अविरतपणे करत आहेत आजच्या युगात माणसाला पोटभर जेवण मिळत नाही गरीबी उपासमारी चा शाप दुर करण्यासाठी संस्थेचा एक छोटासा प्रयत्न आहे. खामगाव शहरात दरवर्षी तापमान खूप जास्त जाते त्यामुळेच संस्था ताक चे वाटप करते. ८ जून रोजी सकाळी सहा वाजेपासून ताक वितरित करण्यात आले. महेंद्र शहा प्रफुल्ल कमानी , हंसमुख कमानी , भिकु भाई संघराजका , किर्ती किलोशिया , दिनेश कमानी , सुनील माने आदी सदस्य यावेळी उपस्थित होते.

# विना नंबर टिप्पर आणि अवैध गौणखनिज वाहतुकीवर कडक कारवाई

## ५ महिन्यांत ३३९ विना नंबर टिप्परवर कारवाई, ३५ लाखांचा दंड वसूल

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**बुलडाणा दि.९**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बुलढाणा अंतर्गत कार्यरत वायुवेग पथकाने जानेवारी ते मे २०२५ या पाच महिन्यांच्या कालावधीत बेकायदेशीर खनिज वाहतूक करणाऱ्या आणि विना नंबर प्लेट टिप्पर वाहनांवर धडक कारवाई केली आहे. या कालावधीत एकूण ८३५ वाहनांची तपासणी करण्यात आली असून, त्यातील ३३९ विना नंबर टिप्पर वाहनांवर कारवाई करत ३५ लाखावरुन जास्त दंड वसूल करण्यात आल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी दिली.

महिन्यानुसार तपासणी व कारवाईचा तपशील : जानेवारी महिण्यात ११६ वाहनांची तपासणी करुन ४० वाहनावर कारवाईत ४ लक्ष



९ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. फेब्रुवारीमध्ये १८९ वाहनांची तपासणी करुन ६३ वाहनावर कारवाई करत ८ लक्ष ७१ हजार रुपये दंड, मार्चमध्ये १२७ वाहनांची तपासणी करुन ३६ वाहनावर कारवाई करत ५ लक्ष ८७ हजार रुपये दंड, एप्रिलमध्ये ९८ वाहनांची तपासणी करुन २५ वाहनावर कारवाई करत ५ लक्ष ६८ हजार ५०० रुपये दंड, मेमध्ये ३०५ वाहनांची तपासणी करुन १७५ वाहनावर कारवाई करत १० लक्ष ९६ हजार ३५० रुपये दंड, असे एकूण पाच महिण्यात ८३५ वाहनांची तपासणी करुन ३३९ विना नंबर टिप्पर वाहनांवर ३५ लक्ष ३१ हजार ८५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

विना परवाना, विना नंबर प्लेट किंवा बेकायदेशीर गौण खनिज वाहतूक करू नये. असे प्रकार आढळल्यास मोटार वाहन कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येईल, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी वाहनधारकांना केले आहे. परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे की भविष्यात देखील अशा बेकायदेशीर कृत्यांवर लक्ष ठेवून कठोर पावले उचलण्यात येणार आहेत. वाहनधारकांनी नियम पाळून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# कर्जमुक्ती व पीकविम्यासाठी संतनगरीत आज शेतकऱ्यांचा एल्गार

## शेगावात धडाडणार रविकांत तुपकरांची तोफ

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**शेगाव दि.९**

शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती तसेच ज्या शेतकऱ्यांना अद्याप पिक विमा मिळालेला नाही त्याा शेतकऱ्यांना त्वरित पीक विमा देण्यात यावा या दोन प्रमुख मागण्यांसह शेतकरी, कष्टकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी संतनगरी शेगाव येथे शेतकऱ्यांचा एल्गार आयोजित करण्यात आला आहे. १० जून रोजी संत गजानन महाराज यांचे दर्शन घेऊन शेतकरी नेते रविकांत तुपकर शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती व शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांसाठी एल्गार पुकारणार आहेत. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या मेळाव्याला उपस्थित राहावे असे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी राज्यभर एल्गार पुकारला आहे. राज्यभरात ठिक ठिकाणी एल्गार मेळावे घेऊन शेतकऱ्यांना एकत्रित करून सरकारवर दबाव बनवण्याचे काम रविकांत तुपकर करीत आहेत. संपूर्ण कर्जमाफी तसेच शेतकऱ्यांचा हक्काचा पिकविमा तातडीने त्याांच्या खात्याात जमा करावा, अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेती पिकांची नुकसान भरपाई तातडीने द्यावी, सक्तीची कर्ज वसुली तातडीने थांबवावी, पिकांचे जंगली जनावरांपासून रक्षण करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबवाव्या, सोयाबीनला- कापसाला प्रति क्विंटल तीन हजार रु भावफरक मिळावा, यासह विविध मागण्यांसाठी युवा नेते रविकांत तुपकर यांनी राज्यभर दौरे सुरू केले आहेत. नाशिक, निफाड, सिन्नर, संगमनेर, अहिल्यानगर, शिक्रापूर, शिरूर,कर्जत, जामखेड, पंढरपूर, कोल्हापूर, सांगली, धाराशिव, नांदेड, परभणी, लातूर, बीड, नागपूर, नरखेड, अमरावती आदी जिल्ह्यांमध्ये दौरा करून रविकांत तुपकर यांनी २७ मे रोजी सिंदखेड राजा येथे आयोजित एल्गार मेळाव्यात सरकारच्या विरोधात तफ डागली. त्याानंतर आता १० जून रोजी विदर्भ पंढरी, संतनगरी शेगाव येथे एल्गार सभा आयोजित करण्यात आली आहे. अग्रसेन चौकातील माहेश्वरी भवन येथे सकाळी ११ वाजता हा एल्गार होणार आहे. संपूर्ण कर्जमुक्तीसाठी व ज्या शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला नाही त्याा शेतकऱ्यांनी आपल्या पावत्याा घेऊन शेगाव येथे जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

मंगळवार, दि. १० जून २०२५




## थोडक्यात

### भाजपच्या वाशिम शहर अध्यक्षपदी मनीष मंत्री



**वाशिम :** भाजप वाशिम शहर अध्यक्षपदी मनिष मंत्री, तर पोहरादेवी मंडळ अध्यक्षपदी गणेश जाधव यांची निवड करण्यात आली आहे. ही घोषणा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी ८ जून रोजी केली. मनिष मंत्री हे सुरुवातीपासूनच भाजपशी एकनिष्ठ राहून पक्षाच्या विविध जबाबदाऱ्यांवर काम करत आले आहेत. तर गणेश जाधव हे देखील पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. यापूर्वी जिल्ह्यातील १६ मंडळ अध्यक्षांपैकी १४ अध्यक्षांची निवड पार पडली होती. उर्वरित वाशिम शहर व पोहरादेवी मंडळ अध्यक्षपदाच्या निवडी ८ जून रोजी जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये वाशिम शहर अध्यक्षपदी मनिष मंत्री तर पोहरादेवी मंडळ अध्यक्षपदी गणेश जाधव यांची वर्णी लागली.

### 'ड' यादीतील घरकुल मंजूर करण्याची मागणी

**मानोरा :** तालुक्यातील फुलउमरी येथील प्रधानमंत्री आवास योजनेच्या ड यादी



मधील घरकुल मंजूर करावे.अशी मागणी माजी पंचायत समिती सदस्य अभिषेक चव्हाण यांनी केली आहे. ९ जून रोजी गट विकास अधिकारी यांना एक निवेदन देण्यात आले. ड यादीत सुमारे २५० नावे आहेत. फुल उमरी येथिल लोकसंख्या मोठी असूनही लक्ष्य कमी देण्यात आले. त्यामुळे अनेक योग्य लाभार्थी घरकुल पासून वंचित आहेत. म्हणून वरिष्ठ कार्यालया मध्ये या बाबत पाठ पुरावा करून लक्ष्य वाढवून ड यादी मधील लोकांना संधी द्यावी.अशी मागणी चव्हाण यांनी केली आहे.

### शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश



**वाशीम :** वारा जहागीर जि प सर्कलमधील १०० कार्यकर्त्यांनी आमदार शामभाऊ खोडे,भाजपा जिल्हाध्यक्ष पूरूषोत्तम चितलांगे, जिल्हा कार्याध्यक्ष भाजपा, राजू पाटील राजे,यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपाचे कार्यकर्ते तथा सरपंच सेवा संघाचे डॉ प्रमोद गंगावणे यांच्या नेतृत्वाखाली वारा जहागीर जि प सर्कलमधील १०० कार्यकर्त्यांनी भाजपा मध्ये प्रवेश घेतला आहे. डॉ प्रमोद गंगावणे ह्याची सरपंच सेवा संघाचे माध्यमातून जिल्हा भरातील ग्राम पंचायतीवर पकड आहे, त्यामुळे त्यांचा ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांवर ची पकड मजबूत आहे, त्यामुळे भाजपा पक्षात प्रवेश करण्यासाठी कार्यकर्ते उत्सूक आहेत, त्यातीलच एक भाग म्हणजे नूकतेच वारा जहागीर सर्कलमधील १०० कार्यकर्त्यांनी भाजपात नूकताच प्रवेश केला आहे.

### रेल्वेच्या मुख्य तिकीट निरीक्षकाचा सेवानिवृत्ती निमित्त गौरव



**वाशिम :** दक्षिण मध्य रेल्वेचे अकोला-वाशिमचे मुख्य तिकीट निरीक्षक सुरेश इंगळे हे ३७ वर्षसेवा देऊन कर्तव्यातून निवृत्त झाले. यावेळी नांदेड विभाग रेल्वे तर्फे सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी अकोल्याचे मुख्य तिकीट निरीक्षक संदीप दुबे, योगेश ठाकूर, प्रशांत जी., गजानन पहुरकर, प्रणिना, दिलीप बलखंडे, अनिल चतुरकर, सूर्यकांत, गिरिवत महतो, गजानन दिनकर डोंगरे, कैलास वानखडे यांच्यासह वाशिम-मध्य रेलवे दक्षिण रेल्वेचे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्याला 'आकांक्षीत' मधून बाहेर काढणार

## संपर्क मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा आशावाद

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अनसिंग, दि. ९ :** वाशिम जिल्हा हा आकांक्षित जिल्हा मधून बाहेर काढून विकासात्मक जिल्हा म्हणून महायुतीच्या काळात उदयास आणू. असा आशावाद जिल्ह्याचे संपर्क मंत्री. नामदार राधाकृष्णजी विखे पाटील यांनी व्यक्त केला. ते मोदी सरकारचे ११ वर्षात या कार्यक्रमांतर्गत राजस्थानी भवन या ठिकाणी दि. ८ जून रोजी बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार श्याम खोडे, हे होते तर सत्कारमूर्ती भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे , प्रमुख अतिथी म्हणून आ.सईताई प्रकाशराव डहाके, राजू पाटील राजे, विजयराव जाधव , सुरेश लुंगे ,अशोक हेडा डॉ, गंगावणे, नितेश मलिक विजय काळे, डॉ.राजीव काळे,



मायाताई वाघमारे, शुभदा नायक, राहुल तूपसांडे, लखन सिंग ठाकूर प्रा. वीरेंद्रसिंह ठाकूर, चंद्रकांत ठाकरे, गोपालदास चितलांगे, जि प सदस्य अर्चनाताई खोरणे, बाळू भाऊ मुरकुटे, दिलीप रत्नपारखी, नथू कापसे, विनोद जाधव डॉ. दीपक ढोके, राजाभाऊ मानधने, प्रल्हाद गोरे, रवींद्र पळसकर, विठ्ठल सातव,गजानन नवगणकर, साईनाथ वाघमारे, श्याम ठाकूर, राम अंकुशकर, राजा भैया पवार, निलेश पेंढारकर, शंकरराव बोरकर, सतीश उगले, शरद चव्हाण मोहन गांजरे विजय नपते गजानन ढेकणे, तसेच जिल्ह्यातील १६ मंडळ अध्यक्ष यांच्यासह जिल्ह्यातील महत्त्वाचे नेते मंचकावर उपस्थित होते.

मोदी सरकारच्या ११ वर्षाच्या विकासात्मक गोष्टींचा आढावा उपस्थित जनते समोर राधाकृष्ण विखे पाटील यांनी मांडला. वाशिम जिल्हा हा आकांक्षित जिल्ह्या मधून बाहेर काढून विकासात्मक जिल्हा म्हणून महायुतीच्या काळात उदयास आणू असा आशावाद व्यक्त अकरा. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती,नगर परिषद, ग्रामपंचायत, या सर्व निवडणुका जिंकण्या साठी कार्यकर्त्यांनी आजपासूनच प्रचंड मेहनत घ्यावी असे आवाहन याप्रसंगी केले वाशिम ग्रामीण व अनसिंग मंडळा मध्ये यावेळी १०० जणांचा प्रवेश सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत झाला तसेच जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांचा सत्कार अनसिंग मंडळाच्या वतीने घेण्यात आला.

यावेळी आ. शाम भाऊ खोडे आ सई ताई डहाके, सुरेश लुंगे, विजयराव जाधव, यांची भाषणे झालेत या कार्यक्रमाला महिला पुरुषवर्ग कार्यकर्ते नेते बूथ प्रमुख पदाधिकारी यांच्या सह जवळपास १२०० जणांची उपस्थिती होती अनसिंग नगरीमध्ये नामदार राधाकृष्णजी विखे पाटील यांच्यासह सर्व मान्यवरांचे जोरदार स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे संचालन गणेश खंडाळकर व सुभाष भाऊ नानोटे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बबलू अडाणी, नवनाथ निरगुडे, गिरीधर मुसळे, गजानन नवगणकर, रवींद्र पळसकर, एस चव्हाण अवी ढोके ज्ञानेश्वर ढोके, बालू भाऊ माल दिगंबर खोरणे मारुती माने, राजू इंगोले यश चव्हाण सह कार्यकर्त्यांनी केले.

## जुन्या वादातून माजी सरपंचाची हत्या

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिरपूर जैन, दि. ९ :** जुन्या वादातून दोघांनी कोयत्याचा वार करून एकाची हत्या केल्याची घटना ७ जून रोजी सायंकाळी ६:३० ते रात्री १० वाजताच्या सुमारास चिंचाबापेन शेतशिवारात घडली. याप्रकरणी ८ जून रोजी शिरपूर पोलिस स्टेशनला दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. सुधाकर रामेश्वर लोखंडे (रा. दापुरी खुर्द, ता. रिसोड) असे मृतकाचे नाव असून, विठ्ठल विश्वनाथ अंबुरकर व रामेश्वर विजय जाधव (दोघेही रा. दापुरी खुर्द) अशी आरोपींची नावे आहेत.



मृतकाचा मुलगा आदित्य सुधाकर लोखंडे याच्या फिर्यादीनुसार, मृतक सुधाकर लोखंडे व आरोपी विठ्ठल अंबुरकर, रामेश्वर जाधव हे मित्र होते. ७जून रोजी दोन्ही आरोपींनी फिर्यादीच्या वडिलाला फिरायला नेले. यादरम्यान चिंचाबापेन शेतशिवारात जुन्या वादावरून आरोपींनी सुधाकर लोखंडे यांच्यावर कोयत्याचा वार करून त्यांचा खून केला. या फिर्यादीवरून शिरपूर पोलिस स्टेशनला आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३ (३), ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास शिरपूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक केशव वाघ करीत आहेत.

## बाजार समिती आहे की वाहनतळ? व्यापाऱ्यांची दादागिरी!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अनसिंग, दि. ९ :** अनसिंग येथील उपबाजार समितीची जागा सध्या बाजारपेठेऐवजी वाहनतळ म्हणून वापरली जात आहे. यामुळे परिसरात अनागोंदीचे वातावरण निर्माण झाले आहे. व्यापाऱ्यांनी आपली वाहने सर्रासपणे बाजार परिसरात उभी करून नागरिकांच्या हालचालीस अडथळा निर्माण केला आहे. विशेष म्हणजे, याबाबत वारंवार तक्रारी होऊनही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही



केलेली नाही.

सकाळपासूनच बाजार समितीच्या आवारात व्यापाऱ्यांची दुचाकी आणि चारचाकी वाहनांची गर्दी दिसून येते. परिणामी, खरीदीसाठी आलेल्या ग्राहकांना जागा मिळेनाशी झाली आहे. काही वेळा वादावादीचीही वेळ येते. यामुळे स्थानिक नागरिक आणि शेतकरी वर्ग प्रचंड नाराज आहे.

स्थानिक रहिवासी रामू पाटील म्हणाले, ''हे परिसर बाजारासाठी आहे की पार्किंगसाठी? आम्ही कित्येक वेळा ग्रामपंचायतीकडे आणि बाजार समितीकडे तक्रार पोस्टने पाठविली , पण कुणीच लक्ष देत नाही.''

दरम्यान, बाजार समितीच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे कानाडोळा केल्याचे स्पष्ट होत आहे. प्रशासनाने त्वरीत हस्तक्षेप करून बाजारातील शिस्त पुन्हा प्रस्थापित करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## लघु पाटबंधारे विभागाकडून सानुग्रह निधीची मागणीच नाही!

### प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर लघु पाटबंधारे विभागाचा अन्याय

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. ९ :** वाशीम येथील लघु पाटबंधारे विभागाकडून जिल्ह्यातील सानूग्रह अनूदानाची मागणी आजपर्यंत केली नाही. यामूळे जिल्ह्यातील प्रकल्प ग्रस्त शेतकरी यांना सानूग्रह निधी मिळणयास विलंब होत आहे. प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाल्यास संबंधित अधिकारी यांना जबाबदार धरून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे. वाशिम जिल्हयातील सन २००६ ते २०१३ मधील सरळ खरेदीधारक प्रकल्प ग्रस्तांना महाराष्ट्र शासनाने ८३२ कोटीचे सानूग्रह अनूदान मंजूर करण्यात आले होते, परंतु त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता ल पा यो वाशीम कडून निधीची मागणी करण्यास विलंब होत



असल्याने विदर्भ बळीराजा प्रकल्प ग्रस्त कृती संघर्ष समितीचे विदर्भ कार्याध्यक्ष माणिकराव गंगावणे गूरूजी यांच्या नेतृत्वाखाली आज समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी वाशीम यांना निवेदन देवून संबंधित निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दरम्यानच्या काळातील विविध आंदोलनाची शासनाने दखल घेऊन २०२४ मधे विदर्भ विकास महामंडळ नियामक समिती च्या बैठकीत सानुग्रह अनुदान वितरीत करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रकल्पग्रस्तांना प्रती हेक्टर ५ लक्ष रुपये सानुगृत अनुदान वितरित करण्याचे आदेश ऑक्टोबर २०२४ मध्ये दिले. त्यानुसार मुख्यमंत्री आणि चंद्रशेखर बावनकूळे,पालक मंत्री अमरावती यांच्या हस्ते दि. १६ एप्रिल २०२५ रोजी पाच प्रकल्प ग्रस्तांना धनादेशाचे वितरण करण्यात आले. वाशीम येथील ल पा विभागाकडून जिल्ह्यातील सानूग्रह अनूदानाची मागणी आजपर्यंत केली नाही, यामूळे जिल्ह्यातील प्रकल्प ग्रस्त शेतकरी यांना सानूग्रह निधी मिळणयास विलंब झाल्यास संबंधित अधिकारी यांना जबाबदार धरून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे, यावेळी प्रकल्प ग्रस्त कृती संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष तथा विभागीय कार्याध्यक्ष माणिकराव गंगावणे गूरूजी, सचिव संजय गंगावणे, संतोष भिसडे इत्यादी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतल्यास घरपट्टी, पाणीपट्टी माफ!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा लाड, दि. ९ :** तालुक्यातील बेंबळा ग्रामपंचायतीने जिल्हा परिषद शाळेतील घटती पटसंख्या लक्षात घेऊन एक आदर्श निर्णय घेतला आहे. गावातील जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्याचा निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला. या निर्णयाचे कौतुक होत आहे.

ग्रामपंचायत सरपंच सुरेखा देवेंद्र चेक्रे, उपसरपंच विशाल ठाकरे आणि सचिव डी. जी. कदम यांच्या पुढाकाराने ग्रामसभेचे आयोजन करून हा निर्णय घेण्यात आला. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ई-माझी शाळा उपक्रमांतर्गत स्मार्ट टीव्हीच्या माध्यमातून डिजिटल शिक्षण दिले जात आहे. तसेच, शाळेतील शिक्षक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध आहेत.

या उपक्रमासाठी प्रथम इन्फोटेक फाउंडेशन, मुंबई यांच्या माध्यमातून शाळेला ४३ इंची स्मार्ट टीव्ही व ऑफलाइन डिजिटल अभ्यासक्रमही पुरवण्यात आला आहे. शाळेमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही नियमितपणे केले जाते. त्यामुळे गावातील शंभर टक्के विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी आणि त्यांच्या पालकांवर आर्थिक भार कमी व्हावा, यासाठी या तर्षी शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे. जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी बेंबळा ग्रामपंचायतने घेतलेल्या निर्णयाचे गटविकास अधिकाऱ्यांसह शिक्षणाधिकारी श्रीकांत माने, तसेच जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी, विठ्ठल भुसारी, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांनी कौतूक केले आहे.

> वाशिम जिल्ह्यात पहिल्यांदाच अशा प्रकारचा निर्णय घेतल्याबद्दल बेंबळा ग्रामपंचायत, मुख्याध्यापक व शिक्षकांचे अभिनंदन. हा निर्णय इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरेल.
>
> **- बी. बी. गावंडे,** केंद्रप्रमुख, कामरगाव

> जिल्हा परिषद शाळेची गुणवत्ता अतिउत्तम आहे. गावातील प्रत्येक विद्यार्थ्याने शाळेत प्रवेश घ्यावा यासाठी आम्ही हा निर्णय घेतला. व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायतीचे यामध्ये मोलाचे सहकार्य आहे.
>
> **- विशाल ठाकरे,** उपसरपंच, बेंबळा

## वटपौर्णिमा: वटवृक्षाचे रोपण करण्यासाठी चिमुकले सरसावले

### राष्ट्रीय हरित सेना एस.एम.सी. इंग्लिश स्कूलचा उपक्रम

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. ९ :** पर्यावरणामध्ये वडाच्या झाडाला असलेले महत्व लक्षात घेता वडाच्या फांद्या न तोडता वडाच्या झाडाचे वृक्षारोपण व संवर्धन करा. असे आवाहन राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक अभिजीत मुकुंदराव जोशी व निसर्ग ईकोक्लबच्या विद्यार्थ्यांनी केले आहे.

जेष्ठ महिण्यात येणारा ''वटपौर्णिमा'' हा सण नावाप्रमाणेच वटवृक्षाशी निगडीत आहे.

वडाचे झाड दिर्घकाळ टिकणारे असून त्याला विपूल पर्णसंभार असतो. त्यामुळे वडाचे झाड हवा प्रदूषण नियंत्रणा बरोबरच ध्वनी प्रदूषण नियंत्रणाचे काम हि उत्तम रितीने करतात. तसेच त्याच्या घनदाट पालवीमुळे हि झाडे हवेतील तापमान कमी करून शितलता देतात. वडाच्या झाडाला वर्षभर पिकलेली फळे येत असल्यामुळे बऱ्याच प्राण्यांना व पक्षांना अन्न मिळते याची लाल चुटुक फळे खायला अक्षरशः शेकडो पक्षी याच्यावर तुटून पडतात तसेच बरेच प्राणी व पक्षी वडाच्या झाडाचा निवार्यासाठी उपयोग करतात .अशाप्रकारे वटवृक्ष हा एक संपूर्ण परिसंस्थेचे उदाहरण आहे .ह्याच्या पारावर बसून पांथस्थ विश्रांती घेतात. खेड्यातील व्यापारी ह्याच्या सावलीत आपली दुकाने थाटात त्यावरूनच त्याला



बनिया म्हणजेच ''बनियन ट्री'' असे नांव पडले असावे .ह्या वृक्षाला फुटणार्या पारंब्या त्यांचे स्वतंत्र वृक्षात रुपांतर होऊन त्याला मिळणारे दीर्घायुष्य या गुणधर्मा मुळे त्याला ''अक्षय वृक्ष'' असे म्हटले गेले आहे. आजच्या काळात बऱ्याच विकास कामांसाठी पूर्वीच्या काळी लावण्यात आलेल्या वडांच्या झाडांची तोड करण्यात आलेली आहे. वडाचे झाड हळूहळू वाढते तथापि आजकालच्या गतीमान जगांमध्ये बहुतेक जण लागवडीसाठी जलद वाढणाऱ्या व शोभीवंत वृक्ष प्रजातीची निवड करतात त्यामुळे पुरातन काळात जतन करण्यात आलेल्या या वृक्षांची संख्या खूप कमी झाली आहे. आपल्या पूर्वजांनी वडाच्या झाडाचे महत्त्व ओळखून संस्कृती मध्ये वटपौर्णिमेच्या निमीत्याने वटपूजा करण्याची प्रथा रुढ केली. पूर्वीच्या काळी स्त्रीया वडाच्या झाडाच्या ठिकाणी जाऊन वटपूजा करीत असत. तथापी आता वडांच्या झाडांची संख्या कमी झाल्याने वडांच्या फांद्या घरी आणून त्याची पूजा करण्याची अनिष्ठ पद्धत रूढ होत आहे. हि बाब वटपौर्णिमा साजरी करण्याच्या मूळ उद्देशासाठी पूर्णत: विसंगत असून त्यामुळे उलट वडांच्या झाडांची बेसुमार छाटणी होत असते या अनिष्ठ प्रथेला आळा घालण्यासाठी शाळेच्या प्राचार्य मीना उबगडे व राष्ट्रीय हरीत सेनेचे समन्वयक अभिजीत मुकुंदराव जोशी यांच्या मार्गदर्शनात वटवृक्षरोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला .उपस्थित मान्यवरांच्या व राष्ट्रीय हरित सेनेच्या चिमुकल्यांच्या हस्ते वटवृक्षारोपण करण्यात आले .तसेच या वटपौर्णिमा पर्यावरणामध्ये वडाला असलेले महत्त्व लक्षात घेता वडाच्या फांद्या न तोडता वडाच्या झाडाचे वृक्षारोपण व संवर्धन करण्याचे आवाहन राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक अभिजीत मुकुंदराव जोशी व निसर्ग ईकोक्लबच्या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाचे विभिगीय वन अधिकारी अशोक प-हाड, सहायक वनसंरक्षक राजेंद्र कातखेडे, वनपाल समाधान सानप, वनरक्षक ए .एस .लेमले ,बी .सी . वानखेडे, एस .के .जुमडे शाळेतील शिक्षीका सुनिता बोरकर, स्मीता पाटील-खर्चे, कुसुम मापारी, संगीता गाडे, अनुराधा दायमा, स्वाती बोदडे, किरण देशमुख , शाळेचे माळी विशाल भंगी व राष्ट्रीय हरित सेनेचे चिमुकले अक्षरा अग्रवाल, अनघा ढेंगळे, ईश्वरी ढोबळे, चंचल चौधरी, सांची शर्मा, गार्गी जाधव, राधिका बल्लाळ, प्रांजल पवार, चैताली भगत, अल्पेश ढेंगळे, कृष्णा घुले यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे आयोजन व संचलन राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी केले. उल्लेखनीय बाब म्हणजे वटवृक्षारोपण व संवर्धनाचा उपक्रम राष्ट्रीय हरित सेना एस एम सी इंग्लिश स्कूलच्या वतीने गेल्या १६ वर्षीपासून राबविण्यात येत आहे

## थोडक्यात

### एकाच परिवारातील दोन्ही मुले 'अग्निवीर'मध्ये



**हिवरखेड :** इंदिरानगरमधील रहिवासी सर्वसामान्य कुटुंबातील श्रीकृष्ण महादेव हागे शेतमजुरी करतात. त्यांच्या पत्नीनेसुद्धा शेतमजुरी करीत आपल्या दोन्ही मुलांना शिकवून आदर्श निर्माण केला. त्यात मोठा मुलगा प्रतीक हागे याने दोन वर्षांअगोदर अग्निवीरमध्ये प्रयत्न केले व यशस्वी झाला. त्याच्या पाठोपाठ लहान भाऊ राम हागे यांनीसुद्धा वयाच्या १९ व्या वर्षी अग्निवीरमध्ये देशाची सेवा करण्यासाठी व आपल्या आई-वडिलांचे नाव मोठे करण्याचे स्वप्न पाहत त्याने सुद्धा भरारी घेतली व नुकतेच दोन दिवसांअगोदर आपले ट्रेनिंग पूर्ण करून गावामध्ये आला व पूर्ण इंदिरानगरमध्ये जल्लोषचे वातावरण निर्माण झाले. एका शेतमजुराची दोन्ही मुले अग्निवीरमध्ये देशाची सेवा करणार आहेत. दोन्ही भावांना अग्निवीर या दलामध्ये निवड झाल्याने सर्व कुटुंबाला आनंदाचा सागर मिळाला, तसेच शेजारी राहणाऱ्या अनेक मुलांसाठी त्यांनी आदर्श निर्माण केला. भविष्यात इंदिरानगरमधून आणखी अग्निवीर जवान देशासाठी सेवा करण्यासाठी निर्माण होतील. प्रतीक हागे व राम हागे या दोन भावांप्रमाणे श्रीकृष्ण महादेव हागे यांच्या मुलाप्रमाणे आदर्श घेतील, अशी अपेक्षा सर्व गावकऱ्यांची व इंदिरानगरवासी व्यक्त करीत आहेत.

### डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या तेराव्या कथासंग्रहांचे झाले प्रकाशन



**दानापूर :** डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या 'पजाया' या स्त्रीवादी कथासंग्रहांचे ज्येष्ठ कथाकार सुरेश आकोटकर, ज्येष्ठ कवी रमेश मगरे, ज्येष्ठ कवयित्री रेषा आकोटकर, प्रा.वृषाली मगरे, तसेच हास्यकवी नितीन वरणकार, कथाकार मोहन काळे यांच्या उपस्थितीत इंद्रप्रस्थ टॉवर्स अकोला येथे लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या तेराव्या कथासंग्रहांचे प्रकाशन झाले. 'पजाया' हा संग्रह स्त्रीवादी कथासंग्रह असून, निकोप समाजासाठी, दृष्टीसाठी, मैत्रीसाठी आणि संवादासाठी, अशा साहित्याची आज गरज आहे, असे उद्गार सुरेश आकोटकर यांनी काढले. तर प्रतिमा इंगोले यांनी आजपर्यंत समाजातील, निरनिराळे ज्वलंत प्रश्न आपल्या लेखनीद्वारा, यशस्वीपणे, मांडले आहे आणि आपल्या कथासामर्थ्याने राज्यशासनाच्या पुरस्कारासह निरनिराळे शंभरावर पुरस्कार मिळविले आहेत, असे मत रमेश मगरे यांनी मांडले. या वयातही प्रतिमा इंगोले त्याच ताकदीने लिहितात आंणि वाचकांना आकृष्ट करतात, हे खूप कौतुकास्पद आहे, असे रेषा आकोटकर यांनी सांगितले.

### मोखा ग्रामपंचायतने केले अखेर कचरापेट्यांचे वितरण



**जानोरीमेळ :** निंबा अंदुरा सर्कलमधील अकोला जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेले मोखा ग्रामपंचायतने अखेर कचरापेट्यांचे ऑक्टोबर महिन्यापासून रखडलेले वितरण २ जूनला दोन्ही गावांमध्ये करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्रामपंचायत कर्मचारी किशोर बागडे जानोरीमेड येथील वार्ड क्रमांक एकमधील सदस्य पती राजेश काळे, विठ्ठल कुरवाडे, वानखडे, सुधाकर खोटरे ,मधुकर काळे, सचिन मस्के, दत्तात्रय काळे, दीपक काळे, दर्शन काळे, नीलेश काळे, मनकर्णा परघरमोर, काळेबाई, गावातील नागरिक उपस्थित होते, तसेच कचरापेट्यांच्या वितरणामध्ये एक ओला कचरा पेटी व एक सुका कचरा पेटी वाटप करण्यात आले; मात्र सार्वजनिक ठिकाणी ड्रम लावायचे अजून बाकी आहेत. ते सुद्धा ग्रामपंचायत प्रशासनाने लवकरात लवकर लावावे, अशी नागरिकांची मागणी आहे. ग्रामपंचायतमध्ये कोरोना काळापासून अद्याप पर्यंत अपंग लोकांचा निधी वाटप करण्यात आलेला नाही. तसेच पावसाळ्यापूर्वी जे नियोजन असते ते नियोजनसुद्धा लावण्यात आलेले नाही. ३० मे रोजी देवराव परघरमोर यांच्या घरासमोर रस्त्यावर मोठा खड्डा पडलेला आहे. त्या रस्त्याच्या संदर्भात ग्रामपंचायत प्रशासनाला लेखी विनंती अर्ज करण्यात आलेला आहे. पावसाळ्यात इथं खूप मोठा त्रास होतो. त्या त्रासापासून ग्रामपंचायत प्रशासनाने त्यावर भराव टाकून तो त्रास दूर करावा, कारण शाळा सुरू झाल्यानंतर अनेक विद्यार्थी गावातील म्हातारी मंडळी तसेच संपूर्ण गावातील मंडळींना तोच एक रस्ता व्यवस्थित जाण्यासाठी आहे, तसेच अजिंक्य भारत अंकामध्ये तीन वेळेला गुरांचा पाणी पिण्याचा हौद या प्रश्नावर बातमी प्रकाशित करण्यात आले होते. अजूनही ग्रामपंचायत प्रशासन झोपेचे सोंग घेऊन नागरिकांच्या तसेच गुराढोरांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने दोन्ही गावातील प्रश्नांकडे लक्ष देऊन जिथे आवश्यकता आहे, त्या ठिकाणी योग्य काम करून घ्यावे.

# उद्या अडीच हजार कोटी रूपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ९ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्या, ११ जून रोजी अडीच हजार कोटींहून अधिक किमतीचे जिल्ह्यातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण होणार आहे. स्थानिक अकोला क्रिकेट क्लब मैदानावर आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घोषणा करतील.**



पूर्णा नदीवरील काटीपाटी बॅरेज प्रकल्प भूमिपूजन समारंभ (४५४.६२ कोटी), पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला इमारतीचा कोनशिला समारंभ (२४९.४१ कोटी), अकोला महानगरपालिका क्षेत्रांतर्गत केंद्रशासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत मलनि:सारण (टप्पा-१) चे काम भूमिपूजन समारंभ (६२९.०६ कोटी), अकोला महानगरपालिका क्षेत्रांतर्गत प्रधानमंत्री इ-बस सेवा योजना अंतर्गत महापालिकेचा ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशनचे उभारणी करण्याचे काम भूमिपूजन (१८.९९ कोटी), हायब्रीड ॲन्युटी कार्यक्रम अंतर्गत मूर्तिजापूर-दहीगाव-गुडधी-उमरी- अकोला राज्यमहामार्ग २८४ वरील कि.मी. ०/०० ते ३६/०० महामार्गाची सुधारणा करणे, अकोला-मलकापूर-कानशिवनी-मोरगाव काकड-बोरगाव खुर्द जिल्हा प्रमुख मार्ग क्र. १९ वरील कि.मी. ०/०० ते २४/५०० महामार्गाची सुधारणा करणे - भूमिपूजन समारंभ (४१०.१० कोटी), हायब्रीड ॲन्युटी कार्यक्रम अंतर्गत उकळी बाजार- नेर- नांदखेड- किनखेड राज्यमहा मार्ग २७८ वरील कि.मी. ६३/०० ते ७९/०० किनखेड ते दहीहांडा महामार्गाची सुधारणा करणे (९७.३७ कोटी), अकोट मतदार संघातील राज्यमार्ग क्र.४७ रावेर, पातुर्डा, पिंपळगाव, खांडवी, जळगाव जामोद, हिवरखेड, अकोट या मार्गावरील (रंभापूर ते हिवरखेड ते वारखेड भाग) साकळी क्र. ११६/६०० ते १५६/००० चे हायब्रीड ॲन्युटी अतंर्गत (३११.४४ कोटी), अकोला येथे पोलीस अधिकारी / कर्मचारी करिता दक्षता नगर येथे २४६ निवास स्थाने व परिसर विकास कामे कोनशिला (१२९.२३ कोटी), अकोला तालुका क्रीडा संकुल बांधकाम कोनशिला समारंभ (५ कोटी),अकोला शहरातील अद्ययावत सांस्कृतिक भवनाचे बांधकाम - कोनशिला समारंभ (१५ कोटी)अकोला शहरातील ऑलिम्पिक दर्जाचे जलतरण तलावाचे बांधकाम- कोनशिला समारंभ (९.९६ कोटी),अकोला येथे सर्वोपचार रुग्णालयातील नवीन वार्ड इमारतीचे बांधकाम- भूमिपूजन समारंभ (१५१.५६ कोटी)बार्शीटाकळी शहरातील मुख्य रस्त्याचे बांधकाम करणे - भूमिपूजन समारंभ (९.९९ कोटी), ३३/११ के.व्ही. हिवरा कोरडे उपकेंद्र ता. मूर्तिजापूर भूमिपूजन समारंभ (३.२० कोटी), ३३/११ के.व्ही. पारद उपकेंद्र, ता. मूर्तिजापूर भूमिपूजन समारंभ (३.२८ कोटी).

**लोकार्पण :** अकोला तहसील तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोलाचे नवीन प्रशासकीय इमारतीचे काम- लोकार्पण समारंभ (१२.०५ कोटी), अकोला येथे महिला व बालविकास भवन इमारतीचे बांधकाम- लोकार्पण समारंभ (६.५० कोटी), जिल्हाधिकारी कार्यालय नवीन इमारत- लोकार्पण समारंभ (८.२९ कोटी), अकोला शहर व अकोट शहर येथील सीसीटिव्ही प्रकल्प - लोकार्पण समारंभ (९ कोटी), बार्शीटाकळी तालुक्यातील भेंडीमहाल गाव येथील सौर प्रकल्प, क्षमता १० मेगा वॅट, ३३ के.व्ही. लोकार्पण समारंभ (४५ कोटी), बार्शीटाकळी तालुक्यातील रेडवा गाव येथील सौर प्रकल्प, क्षमता २ मेगा वॅट, ३३ के. व्ही. लोकार्पण समारंभ (९ कोटी), एकूण रक्कम २५८८.०५ कोटी रूपये.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शेकडो युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. ९ :** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्ह्यातील नेते तथा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल काळणे यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील शेकडो युवकांचा पक्षप्रवेश आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, खा. प्रफ ुल्ल पटेल, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आ.अमोल मिटकरी, संजय खोडके, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, ग्रामीण जिल्हाध्यक्ष मोहम्मद बद्रुजमा यांच्यासह राष्ट्रवादीचे नेते, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील युवकांची अजितदादांना पसंती असून, मोठ्या सख्येत विविध पदाधिकारी असलेले युवक प्रवेश करतील. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल काळणे यांच्या नेतृत्वात विविध गावातील युवा सरपंच, उपसरपंच, सामाजिक कार्यकर्ते, हे पक्ष प्रवेश करणार असून, या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अधिक मजबूत होईल, असा आशावाद व्यक्त करण्यात येत आहे.

> येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती, नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी युवक काँग्रेसची भूमिका महत्त्वाची ठरेल.
> **- अमोल काळणे**
> जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस अकोला.



## अकोट उपविभागामध्ये रात्री राबविले 'ऑपरेशन प्रहार'

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. ९ :** जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी जिल्ह्याचा पदभार घेताच जिल्ह्यात अवैध धंदे पूर्णपणे बंद करणे, पोलीस दप्तरी नोंद असलेल्या गुन्हेगारांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीचा आलेख खाली आणण्यासाठी कायदा व सूव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या असामाजिक तत्वच्या लोकांवर लक्ष ठेवाण्याचे आदेश देत त्यावर कारवाया करण्यावर लक्ष केंद्रित केले.



या कारवायांना 'ऑपरेशन प्रहार' असे नाव दिले. त्यानुसार जिल्ह्यातील पोलीस कामाला लागले असून, जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात अवैध धंदे करणाऱ्यांना भूमिगत होण्याची पाळी आली आहे. याच ऑपरेशन प्रहार अंतर्गत अकोट उपविभागात ८ व ९ जूनच्या मध्यरात्री पोलिसांनी एक अग्निशस्त्र जप्त केले आहे, तसेच अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाया केल्या आहेत, तर सोबतच पोलीस दप्तरी नोंद असलेल्या आरोपींचीही तपासणी केली गेली आहे. 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी अनमोल मित्तल यांनी अकोट उपविभागामध्ये ८ जून २५, तसेच ९ जून २५ चे मध्यरात्रीला 'ऑपरेशन प्रहार' राबविले आहे. या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अकोट उपविभागामध्ये ५ ठाणेदार, दुय्यम अधिकारी व त्यांनी नेमलेली टिम यांना अवैध धंद्यावर आणि गुंड प्रवृत्तीच्या इसमांवर कारवाई करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या.'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत पो.स्टे.अकोट ग्रामीण येथे अवैध गावठी अग्निशस्त्र बाळगणाऱ्या आरोपीवर आर्म ॲक्टप्रमाणे कारवाई करून एक गावठी अग्निशस्त्र किंमत १५,००० रुपयांचे जप्त करण्यात आले. घातक शस्त्र जवळ बाळगणाऱ्या आरोपीवर ४ केसेस, रात्री दरम्यान दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयास्पद फिरणाऱ्या आरोपीवर ६ केसेस, सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन करणारे आरोपीवर १० केसेस, दारूबंदी कायद्यान्वये ८ केसेस व रात्री उशिरा प्रतिष्ठाण उघडे ठेवल्याबाबत २ केसेस करण्यात आल्या असून, ३१ आरोपींवर संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले. एकूण ४४ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याचवेळी मागील ५ वर्षांमध्ये रेकॉर्डवरील गुन्हे करणारे गुन्हेगार कलम ३०२ भादंवि (खून) २३ आरोपी व कलम ३०७ भादंवि (खुनाचा प्रयत्न करणारे, २२ आरोपी तसेच निगराणी बदमाश ८ असे एकूण ५३ आरोपी तपासण्यात आले.

## महावितरणने केली मान्सूनपूर्व कामांना सुरुवात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**दानापूर, दि. ९ :** वीज तारांजवळ असलेल्या वृक्षांच्या फांद्याची तोड करून महाविरतणच्यावतीने दानापूर परिसरात मान्सूनपूर्व कामांना सुरुवात केली आहे. झाडाच्या फांद्यातून गेलेल्या वीज तारा मोकळे करण्याचे काम दानापूर वीज कर्मचाऱ्यांनी चालू केले आहे. तेल्हारा तालुक्यातील दानापूर वीज कार्यालयांतर्गत ७ गावे समाविष्ट आहेत. बरेच ठिकाणी वीज तारा झाडांच्या फांद्यांना स्पर्श करतात. त्यामुळे पावसाच्या दिवसात थोडा वारा -पाऊस येताच लाइनवर फॉल्ट होऊन गावातील वीज गुल होते. वीज कर्मचाऱ्यांना लाइन सुरळीत करण्यासाठी तासन्तास वेळ लागतो. त्यामुळे वृद्ध, आजारी, लहान बालके यांना विजेअभावी खूप त्रास सहन करावा लागतो.

गावातील प्रत्येक नागरिकांना पावसाळ्यात सुद्धा वीज पुरवठा सुरळीत मिळावा, याकरिता दानापूर वीज कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता दिनेश थेरे यांच्या मार्गदर्शनात दानापूर ते सौंदळा या



१० किमी अंतराचे वीज तारांना स्पर्श करणाऱ्या झाडांच्या फांद्या दानापूरचे लाइनमन निखिल मिसाळ,वानखडे, शेळके यांच्या उपस्थितीत मजूर लावून तोडण्यात आल्या आहेत, तसेच कृषी पंपाच्या लाइनला लागणाऱ्या झाडांच्या फांद्याची सुध्दा छाटणी करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कळंबी महागाव , दि. ९ :** ८ जून २०२५ रोजी मौजे हाता येथे शेतकऱ्यांना विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत डॉ. गोपाल मंजुळकर व त्यांच्या टीमने खरीप हंगामातील मुख्य पिकावरील कीड व रोग व्यवस्थापन, माती परीक्षण, घरगुती बियाणे वापराचे महत्त्व, बीजप्रक्रिया, शासनाच्या कृषी योजना, जनावरांचे आजार व त्याचे व्यवस्थापन याबद्दल मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम तालुका कृषी अधिकारी डोंगरे , मंडळ कृषी अधिकारी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषी पर्यवेक्षक बोळे , कृषी सहायक गणेश लहाने यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी रीत्या पार पाडण्यासाठी आत्माचे शेगोकार, सरपंच ,उपसरपंच व ग्रामपंचायत कार्यालय हाता यांचे विशेष सहकार्य लाभले.

## सामाजिक संदेश देऊन केला वाढदिवस साजरा!

### बालसंस्कार शिबिराला परीक्षा व शालेय साहित्याचे वाटप



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. ९ :** तालुक्यातील देवरी येथील समाजसेवक, पत्रकार योगेश लबडे त्यांना विदर्भरत्न, समाजरत्न, समाजभूषण, कोरोना यौध्दा, संत गाडगेबाबा सेवा पुरस्कार, स्वामी विवेकानंद पुरस्कार आदी अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांनी त्यांचा वाढदिवस कुठल्या हॉटेलला किंवा धार्मिक स्थळावर साजरा न करता सप्तखंजेरी वादक राष्टीय प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांच्या सिरसोली येथे सुरू असलेल्या बालसंस्कार शिबिरात शालेय साहित्याचे वाटप करून एक वेगळा संदेश दिला.

पूर्वी योगेश लबडे यांनी आपला वाढदिवस स्मशानात जाऊन साजरा केला होता. अंधश्रद्धा निर्मूलनचे कामसुद्धा ते करीत असतात. त्यांनी कोरोना काळात ४० क्विंटल धान्य वाटप व ११०० पिशव्या रक्तसंकलन केले व शेकडो रुग्णांना जीवनदान दिले, तसेच मेळघाटमध्ये बालविवाह थांबविण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. अंधश्रद्धा निर्मूलन, शैक्षणिक, व्यसनमुक्ती आदी समाजाभिमुख कामे सतत करत असतात. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्त केलेले सामाजिक कार्य लक्षात घेता, सप्तखंजेरीद्वारे प्रबोधन करणारे प्रबोधनकार सत्यपाल महाराज तसेच अमरावती लोकसभा मतदारसंघ खासदार बळवंत वानखेडे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

### शेकडो रुग्णांना मोफत उपचार मिळण्यासाठी निस्वार्थ सेवा

योगेश लबडे हे नेहमी रुग्णसेवा करीत असतात. त्यांनी आतापर्यंत शेकडो रुग्णांना मोफत उपचार मिळवून देण्यासाठी निस्वार्थ सेवा दिली. हीच त्यांची ओळख आहे.

- **खा. बळवंत वानखडे,** अमरावती.

### विद्यार्थ्यांना वही, एक पेन हा उपक्रम राबवून समाजहित जोपासतात

दीनदुबळ्यांची सेवा हीच ईश्वर सेवा समजून घेऊन योगेश लबडे ही सेवा देत असतात. आपल्या मित्र परिवाराच्या सहकार्याने ते वर्षभरात विद्यार्थ्यांना वही एक पेन हा उपक्रम राबवून समाजहित जोपासतात.

- **सत्यपाल महाराज,** प्रबोधनकार.

## शेतकऱ्यांच्या झालेल्या मोठ्या नुकसानाकडे विमा कंपनीचे दुर्लक्ष

### जर लवकर निर्णय घेतला नाही तर ग्राहक मंचमध्ये जाण्याचा दिला इशारा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**दानापूर, दि. ९ :** पंधरा ते वीस दिवसांपूर्वी दानापूर परिसरात आलेल्या वादळ-वाऱ्यासह पावसाने आणि गारपिटींनी शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. यामध्ये दानापूर येथील शेतकरी निखिल रामराव मिसाळ यांचे प्रचंड नुकसान झाले असून, त्यांच्या सर्वे नं. ३६३ मधील एक हेक्टर ६२ आर क्षेत्रातील केळीचे घड व झाडे पूर्णपणे मोडून पडली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे अंदाजे सहा लाख रुपयांचे नुकसान झाले




आहे. याबाबत १६ मे २०२५ रोजी या नुकसानाची माहिती मिसाळ यांनी व अन्य शेतकऱ्यांनी विमा कंपनीच्या टोल फ्री क्रमांक १४४४७ वर दिली होती. त्यानंतर स्थानिक पटवारी अंकुश मानकर आणि कृषी सहायक महेश इंगळे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा तयार केला व शासनाकडे अहवालही सादर केला; मात्र विमा कंपनीने अद्याप कोणतीही दखल घेतलेली नाही. जर विमा कंपनीने लवकरात लवकर निर्णय घेतला नाही, तर ही तक्रार ग्राहक मंचासमोर नेण्यात येईल, असा इशारा त्यांनी विमा कंपनीला दिला आहे.

मिसाळ यांनी २६ ऑक्टोबर २०२४ रोजी विमा कंपनीकडे अधिकृतपणे विम्याचा हप्ता भरलेला असूनही, आजपर्यंत कंपनीकडून कोणतेही सर्वेक्षण किंवा नुकसानाचे मूल्यांकन झालेले नाही. वारंवार तक्रार करूनही विमा कंपनीने दुर्लक्ष केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. ''शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीचा सन्मान करून योग्य ती भरपाई देणे हे विमा कंपनीचे कर्तव्य आहे; मात्र कंपनीकडून आमच्याकडे केवळ दुर्लक्षच झाले आहे. ही शेतकऱ्यांसोबतची घोर अन्यायकारक बाब आहे,'' असे मिसाळ यांनी सांगितले. त्यांनी विमा कंपनीला नोटीस देत असा इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर निर्णय घेण्यात आला नाही, तर ही तक्रार ग्राहक मंचासमोर नेण्यात येईल.

# अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा


बुलढाणा, मंगळवार १० जून २०२५ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### थानवी यांच्या दुचाकी चोरीचा काही तासात शोध

**खामगाव :** स्थानिक टिळक पुतळ्याजवळील जय प्लायवुड या दुकानात साहित्या खरेदी करण्यासाठी फोटोग्राफर कृष्णकुमार मधुसुदन थानवी (वय ६०, रा. शिवाजीवेस) हे दुचाकी क्र. एमएच-२८-वाय-००४५ (अं. किं. २० हजार रूपये) ने गेले होते. खरेदी झाल्यानंतर परत आले असता त्यांना दुचाकी जागेवर दिसून आली नाही. या प्रकरणी कृष्णकुमार थानवी यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. तपासादरम्यान पोलिसांनी टिळक पुतळा परिसरातील सीसीटीव्ही फुटेजवरून काही तासातच दुचाकी चोरटा अनंता विठ्ठल बहादरे (वय ३२, रा. पिंपळगाव काळे) याला अटक केली व त्याचे जवळून दुचाकी जप्त केली. ही कारवाई पोना सागर भगत यांनी केली.

### छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर

**साखरखेर्डा :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने राविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान तहसील कार्यालय अंतर्गत प्रत्येक महसूल मंडळात राबविण्यात येत असून दिनांक ११ जून रोजी सागरखेर्डा येथील जिजामाता विद्यालयात या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे . तरी साखरखेर्डा महसूल मंडळातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे . सर्व सामान्य जनता , शेतकरी , विद्यार्थी, महिला यांचा महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रकरणाचे निराकरण करणे , व जनतेच्या तंक्रारी तत्पर निकालात काढणे. तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम व गतीमान करण्यासाठी या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी बहुसंख्य नागरिकांनी महा राजस्व सम ाधान शिबिराचा लाभ घ्यावा असे ग्राम महसूल मंडळ अधिकारी रघविर सोळंके तसेच प्रशांत पोंधे , लखन राजपूत यांनी केले आहे .

### उत्तमराव डोईफोडे यांचे निधन

**शेगाव :** पंचायत समितीचे सेवानिवृत्त लेखापाल प्रभाकर मुरलीधर लताड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर देऊळगाव राजा येथे अंत्यासंस्कार करण्यात आले पश्चात त्यांची पती श्रीमती निर्मला लताड, भाऊ बहिणी असा मोठा परिवार आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १०५० - २३०० |
| गहू | २४२५-२४७५ |
| तुर | ४१०० - ६६७५ |
| हरभरा | ४३०० - ५४५० |
| सोयाबीन | ३४००- ४३७५ |
| भुईमुग | ३८०० - ५२७५ |
| उडीद | ४२७५ - ६५५० |
| मक्का | १५०० - २०५५ |
| मूंग | ३००० - ६३०० |
| मलाई चना | ७०००-७२०० |
| बाजरी | १५५०- १५५० |

# वर्गखोली नसल्यामुळे चिमुकल्यांचे हाल !

## वर्ग भरतो झाडाखाली,शिक्षण विभागाचे दुर्लक्ष

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
डोणगाव दि.९

**येथील जिल्हा परिषद शाळेमधे ११ तुकड्या असून ८ वर्ग खोल्या आहेत. ३ वर्गखोल्या कमी असल्यामुळे विध्यार्थ्यांना उघड्यावर झाडाखाली बसून शिक्षण घ्यावे लागते. त्यामुळे नवीन शिक्षण सत्र सुरू होण्यापूर्वी वर्ग खोल्यांची सुव्यवस्था करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.**



मेहकर तालुक्यातील सवर्ात मोठी डोणगाव येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेमध्ये ३४७ च्या जवळपास विध्यार्थी असून ११ तुकड्या आहेत. सध्या मात्र ८ तुकड्या आहेत. त्याला पाहता ३ वर्ग हे उघड्यावर झाडाखाली किंवा एकाच वर्गात दाटिवाटीने भरतात. अश्यात एका वर्षापूर्वी पालकांनी आंदोलन केल्या नंतर वर्ग खोल्या मंजूर करण्यात आल्या होत्या मात्र त्याचे काम अद्याप झाले नाही. विध्यार्थ्यांना बसायला वॉटर प्रूफ टेन्ट किंवा बुलढाणा जिल्हा परिषद मध्ये शाळा भरवण्यासाठी स्कुल बस देण्याची मागणी पालकांनी केली. एकीकडे जिल्हा परिषद शाळेला घरघर लागलेली असतांना दुसरीकडे या शाळेत विध्यार्थी संख्या वाढत आहे.

मात्र या ठिकाणी असलेल्या असुविधेला पाहता १५ फेब्रुवारी २०२४ रोजी पालकांनी आंदोलन केले होते. त्यावर तत्कालीन आमदार संजय रायमूलकर यांनी विधानसभेत तारांकित प्रश्न मांडला होता. तेव्हा शिक्षण विभागाने लगबग करत ३ वर्ग खोल्या मंजूर केल्या. मात्र पुढे त्याचे काय झाले ते कळलेच नाही. अश्यात वर्ग खोल्या नसल्याने हिवाळा व उन्हाळा या दोन ऋतूत झाडाखाली खुल्या परिसरात वर्ग भरवण्यात येतात.

अश्यात पावसाळ्या मध्ये उघड्यावर झाडाखाली वर्ग भरवण्यात येऊ शकणार नाही. त्याला पाहता पावसाळ्या मध्ये खुल्या मध्ये वर्ग भरवण्यासाठी वॉटर प्रूफ टेन्ट द्यावे किंवा बुलढाणा जिल्हा परिषद मध्ये शाळा भरवण्या साठी डोणगाव ते बुलढाणा जाणे येणे करण्यासाठी स्कूल बसची व्यावस्था करण्यात यावी. यासाठी एक निवेदन शिक्षण मंत्री, शिक्षण संचालक प्राथमिक पुणे, शिक्षण उपसंचालक प्राथमिक अमरावती,जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी प्राथमिक, गट विकास अधिकारी मेहकर व गट शिक्षण अधिकारी मेहकर यांना अवगत केल्या गेले आहे.

# लाखोंचा गुटखा घेऊन खामगावात आलेली बोलेरो पकडली

## ६५ पोते गुटखा जप्त; अब्दुल हमीद चौकात कारवाई

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.९

खामगाव इतर शहरातून खामगावात आलेला लाखो रुपयांचा गुटखा शहर पोलिसांनी पकडला आहे. स्थानिक अब्दुल हमीद चौकात एका बोलेरो पिकअप मधून हा गुटखा आला होता. वेळीच पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्याने पोलिसांनी त्वरित त्याा ठिकाणी जाऊन गुटख्यासह सदर बाहन जाम केले आहे.

शहरात मोठ्या प्रमाणावर गुटखा तस्करी होत असून परराज्यातून तसेच इतर जिल्ह्यांमधून शहरात गुटखा आणला जातो. दरम्यान आज एका बोलेरो पिकअप मधून येथील अब्दुल हमीद चौकात मोठ्या प्रमाणावर गुटखा आल्याची गुप्त माहिती शहर पोलिसांना मिळाली. या आधारे पोलिसांनी त्वरित त्याा ठिकाणी जाऊन पाहिले असता एक बोलेरो पिकअप (क्र.एम.एच २८ बी. बी-२०६९) दिसली. पोलिसांना पाहून सदर बाहनाचा



चालक पसार झाला. पोलिसांनी सदर बाहनात तपासणी केली असता त्याा मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा दिसून आला. यावेळी पोलिसांनी सदर बाहन शिवाजी नगर पोलीस स्टेशनला आणून लावले असून त्याातून ६२ पोते गुटखा जप्त केला आहे. याचाबत पोलीस विभागाच्यावतीने अन्न औषध प्रशासन विभागाला माहिती देण्यात आली असून वृत्त लिहीपर्यंत पुढील कार्यवाही सुरू होती.

# धुऱ्याच्या वादावरून एकास मारहाण; दोघांविरूध्द गुन्हा दाखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
साखरखेर्डा दि.९

पिंपळगाव सोनारा येथील माजी सैनिकास धुऱ्याच्या वादावरून जिवघेणा हल्ला केल्या प्रकरणी साखरखेर्डा पोलिसांनी दोघा भावाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे .

पिंपळगाव सोनारा येथील दिनकर लक्ष्मण साखरे , अरुण लक्ष्मण साखरे , वामन लक्ष्मण साखरे या तिघा भावंडांची शेती आहे . वाटणी झाल्यानंतर तिघांनी धुरा टाकून आप आपली शेती करीत आहेत . २० दिवसांपूर्वी अरुण आणि वामन यांनी शेती नांगरणी करीत असताना दिनकर यांच्या शेतातील धुरा फोडला . नांगरणी करणारे ट्रॅक्टर चालक व मालक विनोद ठोसरे यांना दिनकरने ७ जून रोजी विचारणा केली असता त्याने कबूल केले . आणि शेतात येवून धुरा व्यवस्थीत करण्याचे काम सुरू केले . त्यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेले अरुण साखरे आणि वामन साखरे यांनी धुरा व्यवस्थीत करीत असताना अडथळा निर्माण केला . त्यावरुन तिघा भावंडात वाद निर्माण झाला आणि अरुण व वामन या दोघांनी दिनकर साखरे याला लोखंडी रॉड आणि लाठीकाठीने जबर मारहाण करून जखमी केले . शेजारी शेत असलेल्या मारोती साखरे यांनी मध्यस्थी करून भांडण सोडविले . जखमी दिनकर साखरे यांना साखरखेर्डा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले . तेथे प्राथमिक उपचार करून बुलढाणा येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले . दिनकर साखरे यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून पोलिसांनी घेतलेल्या जबानी नुसार ८ जून रोजी रात्री उशिरा अरुण लक्ष्मण साखरे , वामन लक्ष्मण साखरे या दोघांविरुद्ध साखरखेर्डा पोलिसांनी कलम ११५(२) , ११८(१) , ११८(२) , ३(५) , ३५१(२) भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल केला आहे

# जि.प.उच्च प्रा.शाळेत नववा वर्ग सुरू करण्यास जिल्हा परिषदेची मान्यता

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
दे.राजा दि. ९

तालुक्यातील सावखेड भोई येथे येत्याा शैक्षणिक वर्षापासून नववा वर्ग सुरू करण्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.



जि.प.उच्च प्राथमिक शाळा सावखेड भोई येथे इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत ३०६ एवढी पटसंख्या आहे.येथील ग्रामस्थ,शाळा व्यवस्थापन समिती यांची शाळेला ९वा वर्ग जोडण्याची मागणी लक्षात घेऊन देऊळगाव राजा पंचायत समितीचे माजी सभापती हरीष शेटे यांनी जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा करून मान्यता मिळवली.सदर शाळा श्री योजनेसाठी प्रस्तावित असून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी उत्कृष्ट शाळा आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची पुढील शिक्षणाची सोय व्हावी यासाठी या शाळेला ९वा वर्ग जोडणे आवश्यक होते.आ.मनोज कायंदे यांनी यासाठी विशेष सहकार्य केले.नववा वर्ग मान्यतेसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, शिक्षणाधिकारी प्राथमिक बी.आर. खरात, गटविकास अधिकारी मुकेश माहोर, गटशिक्षणाधिकारी दादाराव मुसदवाले यांनी सहकार्य केले. शाळेला नववा वर्ग जोडल्याबद्दल सरपंच सौ.संगता हरिष शेटे सर्व सदस्य ग्राम पंचायत, संतोष टेकाळे.अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती तथा सर्व सदस्य, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक, समस्त गावकरी सावखेड भोई यांनी आनंद व्यक्त केला असून परीसरातील देऊळगाव राजा,भिवगाव बु.,जुमडा, पिंपळगाव चिलमखा येथील विद्यार्थ्यांना सावखेड भोई येथील शाळेत प्रवेश घ्यावा असे आवाहन केले आहे.

# मोताळ्यात लवकरच घडणार जलक्रांती

## राहेरा धरण पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात; आ.गायकवाड यांनी केली कामांची पाहणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मोताळा दि.९

मोताळा तालुक्यातील पाण्याच्या टंचाईवर कायमस्वरूपी उपाय म्हणून उभारण्यात येणारे राहेरा येथील धरण आता अंतिम टप्प्यात पोहोचले असून लवकरच हे प्रकल्प पूर्णत्वास येणार आहे. या धरणामुळे तालुक्यात जलक्रांती घडणार असून अनेक गावांमध्ये शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाण्याचा मोठा प्रश्न सुटणार आहे. या पार्श्वभूमीवर बुलडाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांनी नुकतीच धरण स्थळी पाहणी करून कामांची माहिती घेतली. त्यांनी अभियंत्यांसोबत चर्चा करत कामाच्या दर्जाबाबत समाधान व्यक्त केले व उर्वरित काम तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

धरण पूर्ण झाल्यानंतर राहेरा परिसरासह आसपासच्या गावांतील शेतकऱ्यांना जलसिंचनासाठी भरपूर पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे तालुक्यातील शेती समृद्ध होणार असून पाण्यावर अवलंबून असलेले अर्थकारण देखील बळकट होईल. राहेरा येथे २००८ पासून धरणाचे ४०% काम हे ८ वर्ष सुरू होते परंतु हा प्रकल्प निधी अभावी रखडून पडला होता मागील दोन वर्षापासून बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार धर्मवीर संजुभाऊ गायकवाड यांच्या कार्यतत्परतेमुळे तसेच नियोजनामुळे धरणाचे उर्वरित ७० टक्के कामाकरिता २५ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देऊन अत्यंत जलद गतीने मागील ४ महिन्यांमध्ये धरणाचे उर्वरित ८०% काम अंतिम टप्प्यात पूर्ण करून धरणाची धार दाबण्यात आलेली आहे, यामुळे आजूबाजूची १२०० एकर जमीन ओलिताखाली येणार आहे, यावेळी उपसासिंचन योजनेकरिता देखील २० कोटी रुपये धर्मवीर आमदार संजुभाऊ गायकवाड यांनी मंजूर करून घेतले तसेच कोर्टाने आदेश दिल्यामुळे बुडीत क्षेत्रातील जे शेतकरी प्रकल्पग्रस्त होते ज्यांचा या प्रकल्पाला विरोध होता त्यांच्या पुनर्वसनासाठी देखील आमदार साहेबांच्या प्रयतामुळे वाढीव ४८ कोटी रुपये निधी तसेच सरळ खरेदी झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ०५ लाख रुपये असे एकूण १ कोटी २१ लक्ष त्यामुळे जवळपास धर्मवीर आमदार संजुभाऊ गायकवाड यांच्या प्रयताने एकूण ११० कोटी रुपये आमदार झाल्यापासून मंजूर करून आणून हा प्रकल्प पूर्णत्वास नेला. यामध्ये गावातील पुनर्वसनाची सर्व कामे जसे की रस्ते, नाल्या, संरक्षणभिंत, शाळा याकरता देखील धर्मवीर आमदार संजु गायकवाड यांनी १० कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध करून दिला आणि पाणीपुरवठ्याच्या विहिरीसाठी देखील निधी उपलब्ध करून दिला. यावेळी त्या ठिकाणी संबंधित कॉन्ट्रॅक्टरने लवकरात-लवकर काम पूर्णत्वास आणल्याबद्दल धर्मवीर आमदार संजय गायकवाड यांनी त्यांचे देखील अभिनंदन केले. यावेळी त्या ठिकाणी शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक, पाटबंधारे विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी,संबंधित शासकीय कंत्राटदार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अजित कंपनीच्या बोगस मक्का वाणामुळे शेतकऱ्यांची फसवणूक

## नुकसान भरपाई न दिल्यास कंपनी प्रतिनिधींना फिरू देणार नाही : रामाथारकर यांचा इशारा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
शेगाव दि.९

शेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांवर अजित कंपनीने बियाण्याच्या नावाखाली अन्नदात्यांची बिनधास्त फसवणूक केली आहे. या कंपनीच्या मक्का वाणामुळे शेतकऱ्यांचे अक्षरशः आर्थिक कंबरडे मोडले आहे. त्यामुळे अशा फसव्या कंपन्यांना जिल्ह्यातून हाकलून लावल्याशिवाय शिवसेना शांत बसणार नाही, असा स्पष्ट इशारा शिवसेना शेगाव तालुका प्रमुख रामा पाटील थारकर यांनी दिला आहे. .शेगाव तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी अजित कंपनीचे मक्का बियाणे पेरले होते. मात्र, या बियाण्याच्या वापराने मक्याची वाढ अत्यांत तोकडी, आणि कणसांमध्ये फक्त २ ते ५ दाणे आढळून आले. यामुळे कणसाचा पत्ता नाही आणि उत्पादन शून्य, असे भयावह चित्र दिसून आले. शेतकऱ्यांनी वेळोवेळी कंपनीच्या प्रतिनिधींना संपर्क केला, तक्रारी केल्या. पण प्रतिनिधींनी पाहणी तर दूरच, साधे उत्तर देण्याचेही सौजन्य दाखवले नाही. यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी आपली व्यथा शिवसेना तालुका प्रमुख रामा पाटील थारकर यांच्याकडे मांडली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता सदर प्रकार कृषी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिला. त्याानंतर उपविभागीय कृषी अधिकारी व बियाणे निरीक्षकांनी शेतशिवाराला भेट देऊन ५ कणसांपैकी फक्त २ ते ५ दाणेच आढळल्याचे अहवालात नमूद केले आहे. म्हणजेच कंपनीने दिलेले वाण पूर्णतः निकृष्ट आणि अयोग्य होते, हे स्पष्ट झाले आहे.




हा प्रकार म्हणजे बियाण्याच्या आड शेतकऱ्यांच्या घामाला लुबाडण्याचा घृणास्पद प्रकार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. एवढं होऊनही अजित कंपनी मूकबधीर बनून बघ्याची भूमिका घेत आहे.

''आमची शिवसेना अशा बोगस कंपन्यांना सोडून देणार नाही. अजित कंपनीने तातडीने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अन्यथा या कंपनीच्या प्रतिनिधींना बुलढाणा जिल्ह्यात पाय ठेवू दिला जाणार नाही. हे आंदोलन थांबणार नाही, पेटणारच!'' असा थेट इशारा रामा पाटील थारकर यांनी दिला. या प्रकरणात प्रशासनानेही तातडीने पावले उचलून संबंधित कंपनीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, हीच जनतेची मागणी आहे. शिवसेना अन्नदात्याच्या बाजूने खंबीरपणे उभी आहे आणि उभीच राहील!

# पोलिसदादांचा ताण वाढतोय; परिसरात पोलिसांची कमतरता

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
डोणगाव दि.९

डोणगाव हे गाव राज्य महामार्गावर असून या गावाला जवळपास २७ खेडे जोडलेले आहेत येथे पोलीस स्टेशन ही आहे पण गत काही दिवसांपासून डोणगाव परीसरात अवैध धंदे व गुन्ह्यांचे प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे पोलीसांच्या ताणात भर झाली असल्याचे दिसून येत आहे.

डोणगाव येथे पोलीस स्टेशन ला एक ठाणेदार तसेच पि. एस आय व जवळपास २६ पोलीस कर्मचारी मान्य असताना डोणगाव पोलीस स्टेशन येथे २७ गावांना सध्या फक्त १८ कर्मचारी तैनात आहेत त्यातील ही काही कर्मचारी बंदोबस्त कामी बाहेर गावी जातात तर काही कर्मचारी मेहकर येथे प्रतिनियुक्ती वर आहे. तर काही न्यायालयीन कामावर तैनात असल्याने डोणगाव येथील पोलीस स्टेशन मोजक्या पोलीस कर्मचारी यांच्या भरोशावर असल्याने डोणगाव येथे सध्या अवैध रेती वाहतूक तसेच अवैध गौणाखनिज व अवैध प्रवासी वाहतूक तसेच अवैध दारू विक्री तसेच गुटखा विक्री प्रमाणात वाढ झाली असून रात्री अपरात्री सर्रासपणे हॉटेल सुरू राहतात व यातुनच डोणगाव येथे गुन्ह्याचे प्रमाण वाढत असुन मोजके पोलीस कर्मचारी असल्याने पोलीस कर्मचारी यांच्यावर कामाचा ताण वाढत आहे. याचाच फायदा अवैध धंदे वाले घेत असल्यानेपोलीस स्टेशन ला त्वरित मान्य कर्मचारी संख्या उपलब्ध करून दिल्यास गुन्हेगारी ला नक्कीच पायबंद बसू शकतो एवढे मात्र नक्की.

अजिंक्य भारत

आपलं अमरावती

मंगळवार, दि. १० जून २०२५

## थोडक्यात

### अपघातातील जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

**आसेगाव पुर्णा :** अमरावती येथून कार्यक्रम आटोपून दुचाकीने (एमएच २७-बीडी २७७७) अचलपूरकडे परत येत असताना दुचाकी अनियंत्रित होवून अपघात झाला. त्यात सतीश उत्तमराव इंगोले (५०, रा. जीवनपुरा, अचलपूर) यांना गंभीर दुखापत झाली. मात्र, अमरावती येथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याबाबत राहुल दादाराव इंगोले (३८) यांनी आसेगाव पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मृतकाविरुद्ध २८१, १०६ (१) अन्वये गुन्हा दाखल केला.

### चारचाकीच्या धडकेत ऑटो उलटून; एक जखमी

**चांदूर रेल्वे :** भरधाव चार चाकीने (एमएच २७-बीएक्स २२३९) ऑटोला मागून जोरदार धडक दिली. त्यात ऑटो पलटी होवून चालक गंभीर जखमी झाला. ही घटना सातेफळ फाट्याजवळ घडली. याबाबत जखमी ऑटो चालक अनिल साहेबरावजी वाढोणकर (४९, रा. माळीपुरा, चांदूर रेल्वे) यांनी चांदूर रेल्वे पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी चार चाकी चालकाविरुद्ध २८१, १२५ (बी) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीवरील तिघे जखमी

**येबदा :** दुचाकीने गावाकडे येणाऱ्या तिघांना ट्रॅक्टरने धडक दिली. त्यात दुचाकीवरील तिघे जखमी झाले. ही घटना सोनखेड येथे घडली. याबाबत जखमीचे नातेवाईक जावेद खान शरीफ खान (२६) यांनी येवदा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### फूस लावून १५ वर्षीय मुलीला पळविले

**खोलापूर :** येथील पोलीस क्षेत्रात येणाऱ्या एका गावात १५ वर्षीय मुलीला एका परिचित युवकाने फुस लावून पळवले. याबाबत तिच्या पालकांनी फियाद दिली. खोलापूर पोलिसांनी युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### जीवे मारण्याची धमकी देत दोघांना लुटले

**परतवाडा** – बाहेरुन जेवण करून परत येणाऱ्या दोन युवकांनी दोघांनी जीवे मारण्याची धमकी देत बळजबरी खिशातून ७ हजार रुपये काढून घेत लुटले. ही घटना नबील कॉलनी कब्रस्थानजवळ घडली. याबाबत सोहेल खान हकमी खान (२६, रा. कांडली) याने परतवाडा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी सोहेल खान उर्फ चिंटू अख्तर खान (३०) व सलीम खान उर्फ कल्लू साबीर खान (२८) यांच्याविरुद्ध ३०९ (६), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करीत अटक केली.

### राजना येथे युवकाला चौघांची मारहाण

**आसेगाव :** पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या राजना येथे क्षुल्लक वादातून चौघांनी युवकाला मारहाण करीत शिविगाळ केली. जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत अहमद खाँ हसन खाँ पठाण (२८, रा. राजनापुर्णा) याने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी चौघांविरुद्ध दुखापतीचा गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास आसेगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

### जीवे मारण्याची धमकी; युवकाला मारहाण

**आसेगाव :** जुन्या वादातून युवकाला शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत नात्यातीलच काही जणांनी मारहाण करीत जखमी केले. ही घटना वाकी रायपुर येथे घडली. याबाबत अनिकेत नामदेव कुरवाडे (२४) याने दिलेल्या तक्रारीवरून आसेगाव पोलिसांनी पंकज भानुदास कुरवाडे (३०), सागर भानुदास कुरवाडे (३५), प्रदीप भानुदास कुरवाडे (३२) व एक महिला यांचयावर ११८(१), ३५२, ३५१(२), ३(५) कलमान्वये गुन्हा दाखल केला.

# 84 हजार विद्यार्थी भाग एक वरच थांबले!

## अंतिम गुणवत्ता यादी आता 11 जूनला

## अकरावी प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जारी

अजिंक्य भारत |सुधीर केने

**अमरावती, दि. ९** राज्यात यावर्षीपासून अकरावीचे ऑनलाइन प्रवेश सुरू झाले. परंतु, या प्रवेशाचा गुंता अद्यापही सुटलेला नाही .त्यामुळे आता प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जारी करण्यात आले आहे. 84 हजार विद्यार्थ्यांनी केवळ भाग एकच भरल्यामुळे त्यांना दुसरा भाग भरण्यासाठी कालावधी द्यावा लागला आहे. त्यामुळे अंतिम गुणवत्ता यादी ११ जूनला प्रकाशित होणार आहे.

सन २०२५- २६ पासून संपूर्ण राज्यामध्ये उच्च माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रणाली द्वारे सुरू करण्यात आलेले आहे. ८ जून २०२५ रोजी अंतिम गुणवत्ता यादी घोषित करण्यात येणार होती त्याऐवजी अंतिम गुणवत्ता यादी याचा ११ जून २०२५ रोजी घोषित करण्यात येणार आहे. पूर्वी अर्ज भाग दोन २ जून २०२५ रोजीच्या वेळापत्रकामध्ये एक दिवसाचा कालावधी देण्यात आलेला होता. 84 हजार विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग एकच भरलेला आहे परिणामी भाग दोन त्यांनी लॉक केला नाही या विद्यार्थ्यांकरिता पुन्हा अधिकचा



कालावधी सहा व सात जून रोजी दुपारी साडेबारा वाजेपर्यंत देण्यात आला. ७ जून २०२५ रोजी दुपारी एक वाजता पासून तात्पुरती गुणवत्ता यादीवर आक्षेप नोंदविण्यासाठी ९ जून २०२५ चा कालावधी देण्यात आला आहे. तात्पुरत्या गुणवत्ता यादीवरील सर्व आक्षेप नोंदविणे व ते निकाली काढणे यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून हा दिनांक देण्यात आला आहे. एकंदरीत १२ लाख ७१ हजार अर्ज प्राप्त झालेले आहे. या अर्जावर अंतिम गुणवत्ता यादी, व्यवस्थापन कोटा, इन हाऊस कोटा, अल्पसंख्यांक कोटा आणि कॅम्प राऊंड मधील गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांचे अलोकेशन करण्यास तसेच शाळा महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश निश्चित करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा यासाठी अकरावी प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जारी करण्यात आले आहे.

**सुधारित वेळपत्रक**

| दिनांक | प्रवेश प्रक्रियेचा तपशिल |
|---|---|
| १२ जून ते १४ जून २०२५ | शुन्य फेरी प्रवेश<br>व्यवस्थापन कोटा, संस्था अंतग्रत इनहाऊस कोटा,<br>अल्पसंख्यांक कोआ अंतर्गत प्रवेश |
| २६ जून २०२५ | प्रथम फेरी गुणवत्ता यादी प्रसिद्धी |
| २७ जून ते ३ जुलै २०२५ | प्रथम फेरीचे गुणवत्ता यादी नुसार प्रवेश |

# टास्कमध्ये अडकला अन् 28 लाख गमावून बसला!

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** वेगवेगळे प्रॉडक्ट विकण्याचे टास्क पूर्ण करण्याच्या नावाखाली व दामदुप्पटे परताव्याच्या बहाण्याने येथील एका ३८ वर्षीय खासगी नोकरदाराशी टास्क फ्रॉड करण्यात आला. त्याची २८ लाख ९९० रुपयांनी ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी सायबर पोलिसांनी ७ जून रोजी विविध बँक अकाऊंटधारकांविरुद्ध फसवणूक व आयटी ॲक्टअन्वये गुन्हा दाखल केला. पार्टटाइम जॉब व अधिक नफा देण्याच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी ऑनलाइन पद्धतीने गाडगेनगर




पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 38 वर्षीय तरुणाशी ऑनलाइन संपर्क साधला. त्याला फर्निचर व अन्य प्रॉडक्ट ऑनलाइन विकण्याचा टास्क दिला. एक टास्क पूर्ण झाल्यानंतर त्याच्या खात्यात देखील खात्यात पैसे जमा होत असल्याने तरुणाला सायबर चोरांवर विश्वास बसला. सायबर भामट्यांनी पुढील टास्क देण्यासाठी तरुणाला रक्कम जमा करायला सांगितली. काही रक्कम जमा केल्यानंतर टास्क अपूर्ण आहे, असे सांगून अधिक रक्कम भरली तर त्यावर चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवले. टास्क पूर्ण करण्याच्या बहाण्याने तरुणाकडून तब्बल 28 लाख 990 रुपये वेगवेगळ्या खात्यांमध्ये ट्रॉन्सफर करून घेत फसवणूक केली. ही घटना 21 एप्रिल ते 21 मे या घडली. याप्रकरणी तरुणाने शनिवारी (दि. 7) सायबर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार फिर्यादीला संपर्क साधणारा मोबाइल युजर, फिर्यादीला लिंक पाठवणाऱ्यासह विविध बँकेच्या खातेदारांविरोधात गुन्हा दाखल केला.

# रेमंड कंपनीची भरधाव ओमनी व्हॅन पुलावर आदळली

## 9 कामगार जखमी, चार कामगारांची प्रकृती चिंताजनक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**तिवसा, दि.९** – रविवारी सकाळी घरी परतत असलेल्या मजुरांसाठी नेहमीसारखी सुरुवात असलेला दिवस एका भीषण दुर्घटनेने काळरूप धारण करेल, अशी कल्पनाही नसेल. गुरुकुंज मोझरी ते नांदगाव पेठ एमआयडीसी मार्गावरील शेंदोळा खुर्दजवळील बायपास पुलावर सकाळी साडे आठच्या सुमारास ओमनी व्हॅनचा अपघात झाला.

रेमंड कंपनीत रात्रपाळी करून घरी परतत असलेले नऊ मजूर एमएच 27 बीव्ही 9282 क्रमांकाच्या ओमनी व्हॅनमधून प्रवास करत होते. मात्र, चालकाला झोपेची डुलकी आल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि



थेट पुलावर जाऊन व्हॅन आदळली. या अपघातात आशिष गोपालकर (30), आकाश जाने (28), अश्विन तवर (31), ऋषभ सावळकर (27), अक्षय कोठे, हर्षल रुद्रकार (22), आकाश गरड (22), वैभव कुऱ्हाडे आणि मंगेश ठाकरे (35) हे गंभीर जखमी झाले. यातील अश्विन तवर यांची प्रकृती अत्यवस्थ असून त्यांना अमरावतीतील रेडिएंट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. उर्वरित जखमींवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.घटनेनंतर संबंधित युवकांच्या घरी हळहळ आणि धावपळ सुरू झाली. घरच्यांना एक क्षणात दुःखाच्या सावटाने वेढले.

# महामार्गावरील कठडे कापून बनविला रस्ता

## व्यावसायिकाचा प्रताप... महामार्ग विभागाचे दुर्लक्ष

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बडनेरा, दि. ९ :** गेल्या काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात महामार्ग बायपास हायवे वर रस्त्यावर जागोजागी महामार्गाचे कठोळे तोडून व्यवसायकांनी दुकाने हॉटेल धाबे टाकून महामार्गावर रस्ते बनवले यामध्ये मोठ्या प्रमाणात अपघाताचे प्रमाण वाढले आहे

वाहनाच्या संकेत दिवसेंदिवस वाढ होत आहे यामुळे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग चे पदरीकरण करण्यात आले . तसेच या मार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने लोखंडी कठळे बनवण्यात आले . परंतु येथील महामार्गावरील बसवलेले कठडे काही व्यवसायकानी आपल्या सोयीसाठी तोडले आहेत. तिथून येण्या जाण्यासाठी मार्ग बनविला आहे



यामुळे जाणीवपूर्वक अपघाताला आमंत्रण देत असल्याचे अनेक सुजाण नागरिकचे म्हणणे आहे याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे.

दिवसेंदिवस वाढत असलेल्या लोकसंख्येत वाढ होते त्यामुळे वाहना सुद्धा वाढ झाली आहे. त्यामुळे महामार्ग मोठे करण्यात आले. अपघाताचे प्रमाण कमी व्हावे यामुळे रस्ते मोठ्या प्रमाणात मोठे करण्यात आले परंतु व्यवसाय त्यांनी यावर सुद्धा अतिक्रमण करून महामार्गावर लावलेले लावलेले कठळे दोन्ही बाजूचे ग्राहकांना येण्याजनाकरिता लावलेले लोखंडी कठळे यामधून मार्ग तयार केला आहे.

राष्ट्रीय महामार्ग असल्याने या महामार्गावर वाहनाची वर्दळ असते त्यामुळे रस्ता उलन त्यांना सुसाट वाहनांनी केव्हा अपघात घडेल हे सांगता येत नाही याविषयी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली असल्याचे नागरिकांनी सांगितले परंतु अद्याप कोणतीही कारवाई तसेच नवीन कठळे बनवण्यात नाही आले. त्यामुळे अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. कठळे कापण्यात आल्यावर यावर कोणतीच कारवाई केली नाही त्यामुळे अपघातात वाढ होताना दिसत आहे. काल बडनेरा परिसरात एक्सप्रेस हायवे वर रस्त्यावर पती-पत्नी तसेच तीन मुलाचा अपघात झाला यावर ट्रक रस्त्यावर उभा होता . परंतु नियम महामार्गावरील सांगतो की रस्त्यावर वाहन थांबवता येत नाही त्यामुळे हा अपघात घडला तसेच वाहन चालक रस्त्यावर उभे राहून धाबे, हॉटेल, काही व्यवसाय टाकलेले दुकान यावर आपले ट्रक थांबून उभे राहतात यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात घडत आहे.

यामुळे कठळे तोडून व्यवसाय करणाऱ्या कारवाई करण्यात यावी अशी नागरिकाची मागणी केली जात आहे.

### क्षुल्लक कारणावरून मुलांची वडिलांना मारहाण

**चिखलदरा :** गांगरखेडा येथे क्षुल्लक वादातून दोन मुलांनी पित्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. जीवे मारण्याची धमकीही दिली. याबाबत वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी मारहाण करणाऱ्या दोन मुलांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास चिखलदरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

### महिलेचा विनयभंग

**अमरावती** – महिलेचा विनयभंग करुन तिला धमकी देण्यात आली. ही घटना अंजनगाव सुर्जी ठाण्याच्या हद्दीत 4 जून रोजी उघडकीस आली. पीडित 22 वर्षीय महिला ही बाथरुमला गेली. त्यावेळी मोहम्मद जफर अब्दुल सलील (35) याने त्यांच्या पाठीमागे जावून बाथरुमचा दरवाजा आतून बंद केला. त्याने पीडित महिलेला शरीरसुखाची मागणी करुन त्यांचा विनयभंग केला.

# साबांविच्या हस्तेखोरी धोरणामुळे हिरव्यागार झाडांची अवैधरित्या कत्तल?



संग्रहित

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि. ६ :** जून रोजी तालुक्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती ते ब्राम्हणवाडा थडी गावा पर्यंत काही दिवसापासुन कॉंक्रिट रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे हिरव्यागार झाडांची खुलेआम कत्तल करण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हस्तेखोरी धोरणामुळे चांदूर बाजार वनरक्षक यांच्या वरदहस्तामुळे परवानगी पेक्षा जास्त हिरव्यागार वृक्षांची रानकसाया कडून कत्तलेआम करण्यात येत असून याला जबाबदार असनाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही करनाार केव्हा? कॉंक्रिट रस्त्याच्या कामासाठी रोडच्या दोन्ही बाजू कडील झाडांची बुडा पासून कत्तल करण्यात येत आहे. ऐकीकडे सरकार घोषणा करते की झाडे लावा झाडे जगवा आणि दुसरीकडे अधीकारी आणी रानकसायाकडून यांच्या साटेलोटे पनामुळे मोठ्या प्रमाणवर वृक्षांची अवैधरित्या कत्तल करण्यात येत आहे. यावर अंकुश लावून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी वृक्षप्रेमी यांचे कडून मोठ्या प्रमाणामध्ये होत आहे.

# बच्चू कडू यांच्या आंदोलनाला राकेश टिकैत यांचा पाठिंबा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** प्रहार जनशक्तीचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नसानसात आंदोलन भरलेलं आहे. सध्याचे देशातील सरकार हे आंदोलनकर्त्यांना राजकीयदृष्ट्या संपवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे आगामी काळात आंदोलन करणाऱ्यांची संख्या खूपच कमी असेल... आंदोलनकर्त्ये खूपच कमी असतील. मात्र बच्चू कडू हे यातीलच एक आहेत जे शेतकऱ्यांसाठी लढत राहतील असं म्हणत शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी बच्चू कडू यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तसेच सातबारा कोरा करण्यासह इतर काही मागणीसाठी बच्चू कडू यांनी मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळी बेमुदत अन्नत्याग आंदोलन केलं आहे. या आंदोलनाला राकेश टिकैत यांनी आज भेट दिली. तसेच टिकैत





यांनी यावेळी कडू यांच्या आंदोलनाला आपला पाठिंबा जाहीर केला.

आपल्या भाषणात राकेश टिकैत म्हणाले, शेतकऱ्यांच्या लढाईत महाराष्ट्र, उत्तरप्रदेश आणि हरियाणाचा लढा हा कायम एकत्रित राहिला आहे. बच्चू कडू हे काय आज आंदोलन करत नाहीत.. शेतकऱ्यांसाठीचा त्यांचा लढा हा मागील अनेक वर्षांपासून सुरु आहे. जेव्हा ते आमदार होते तेव्हा ते विधानभवनात शेतकऱ्यांसाठी बोलायचे, आता ते आमदार नाहीत तरीही शेतकऱ्यांसाठी तसेच दिव्यांगांसाठी आंदोलन करत आहेत. आज महाराष्ट्र आणि केंद्रात जे सरकार सत्तेत आहे ते आंदोलन कर्त्यांना, तसेच इतर राजकीय पक्षांना दाबण्याचा प्रयत्न करतात. धार्मिक मुद्द्याच्या नावाखाली एकमेकांना भडकवण्याचे काम सुरु आहे. अशा या सरकार विरोधात आंदोलन करणाऱ्या बच्चू कडू यांच्या रक्तातच आंदोलनाची धार आहे असं म्हंटल राकेश टिकैत यांनी बच्चू कडू यांचं कौतुक केलं.






राकेश टिकैत पुढे म्हणाले, म्हणाले, भारतात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या या महाराष्ट्रात बघायला मिळतात. खरं तर संपूर्ण देशात जी कृषी पॉलिसी लागू आहे तीच महाराष्ट्रातही आहे, मात्र तरीही महाराष्ट्रातूनच सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या करत आहेत कारण याठिकाणी शेतकऱ्यांची मजबूत अशी संघटना नाही. सध्याचे देशातील सरकार हे आंदोलनकर्त्यांना राजकीयदृष्ट्या संपवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे आगामी काळात आंदोलन करणाऱ्यांची संख्या खूपच कमी असेल... आंदोलनकर्त्ये खूपच कमी असतील. मात्र बच्चू कडू हे यातीलच एक आहेत जे शेतकऱ्यांसाठी लढत राहतील असं राकेश टिकैत यांनी म्हंटले आहे.

## थोडक्यात

### नवी वस्ती येथे जुगारावर धाड

**अमरावती** - बडनेरा पोलिसांनी नवी वस्ती येथील आठवडी बाजारात सुरू असलेल्या जुगारावर धाड टाकली. या वेळी ३ हजार ४७५ रुपयांचे साहित्य जप्त केले, तर गौतम चक्रधर चिंचखेडे (४२) याच्याविरुद्ध जुगार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला.

### क्षुल्लक कारणावरून युवकावर चाकूने हल्ला

**अमरावती :** पंचशील नगर येथे एका युवकाने दुसऱ्यावर क्षुल्लक कारणातून चाकू हल्ला करीत जखमी केले. याबाबत संदीप मारोतराव बोरकर (३०) यांनी फ्रेजरपुरा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी चाकू हल्ला करणाऱ्या युवकाविरुद्ध ११८ (३) अन्वये गुन्हा दाखल केला.

### पुन्हा एका दुचाकीची चोरी

**अमरावती :** अज्ञात चोरट्याने एका शाळेसमोरील मैदानात उभी असलेली दुचाकी (एमएच २७-सीएफ ७६८५) चोरून नेली. ही घटना गाडगे नगर पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या परिसरात घडली. तिची अंदाजे किंमत 45 हजार रुपये आहे. याबाबत सचिन मुरलीधर खांडे (४५, रा. राधा नगर) यांनी गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध ३०५ (बी) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### नगर वाचनालयासमोरून दुचाकी लंपास

**अमरावती :** मित्राची दुचाकी नादुरुस्त असल्याने त्याला फिर्यादी गोविंद विनोद बंग (३२, रा. बालाजी प्लॉट) यांनी आपली दुचाकी (एमएच-१४-जीआर ९३६८) वापरण्यास दिली. मित्र कामानिमित्त श्याम चौकात गेला. त्या वेळी त्याने दुचाकी नगर वाचनालयासमोर उभी केली. मात्र, अज्ञाताने ती चोरून नेली. याबाबत गोविंद बंग यांनी कोतवाली पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध ३०५ (ब) अन्वये गुन्हा दाखल केला.

### हॉटेल मालकाची दुचाकी घेवून कर्मचारी पळाला

**अमरावती :** गेल्या तीन महिन्यांपासून हॉटेलमधये कुक म्हणून काम करणाऱ्या युवकाने हॉटेल मालकाची दुचाकी (एमएच २७-सीक्यू २२३३) घेवून पळून गेला. दुचाकीची अंदाजे किंमत ४० हजार रुपये आहे. याबाबत आदित्य मनोजराव हिवसे (३५, रा. अंबागेट, पटवीपुरा रोड) यांनी नांदगाव पेठ पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी ३१६ (२) कलमान्वये हस्तीमल सल्लुर (३५, रा. गांधीग्राम, गुजरात) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### तीन अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई

**अमरावती :** विना परवाना दारू विक्री करणे गुन्हा असतानाही काही जण अवैधरित्या दारू विक्री करतात. त्यांच्यावर वेळावेळी कारवाईदेखील करण्यात येते. अशीच कारवाई फ्रेजरपुरा, बडनेरा व भातकुली पोलिसांनी त्यांच्या कायक्षेत्रा करीत तीन अवैध दारू विक्रेत्यांवर दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. त्यांच्या ताब्यातून एकूण ५ हजार १३० रुपयांची ६७ पावट्या दारू जप्त केली. शेख राजा शेख इकबाल (२३), गौतम लक्ष्मण गायकवाड (५३) व साहेबराव शेषाराव राऊत (५२) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

# मंगल कार्यालयातील शिळे अन्न खाल्ल्याने तीन गायींचा मृत्यू

## थिलोरी येथील शेतकऱ्यांचे नुकसान

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. ९** - दर्यापूर येथील मेहेर कृपा रिसॉर्टमध्ये फेकण्यात आलेल्या शिळ्या अन्नामुळे विषबाधा होऊन थिलोरी येथील तीन गायींचा मृत्यू झाला आहे. ही घटना प्रचंड संतापजनक असून, नागरिकांनी प्रशासनाच्या दुर्लक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



थिलोरी येथील शेतकरी अमित होले व निलेश सुधाकर राऊत यांच्या गायी चराईसाठी बाहेर गेल्या असता, त्यांनी भातकुली रोडवरील मेहेर कृपा रिसॉर्टच्या परिसरात टाकलेले शिळे अन्न खाल्ले. त्यातून विषबाधा झाल्याने निलेश राऊत यांच्या दोन व अमित होले यांच्या एका गाईचा मृत्यू झाला. यापूर्वीही अमित होले यांच्या एका गाईचा अशाच प्रकारे मृत्यू झाला होता. गायीच्या मृत्यूनंतर अमित होले यांनी नगर परिषद दर्यापूरकडे लेखी तक्रार सादर केली होती. मात्र, आजवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. सदर प्रकरणाची तक्रार दर्यापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पोलीस अधिक तपास करत आहेत. अशा प्रकारच्या घटनांमुळे सार्वजनिक आरोग्यावर आणि जनावरांच्या जीवितावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. शासकीय यंत्रणांनी तात्काळ लक्ष घालून, अशा रिसॉर्ट्सवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांचा पहिला दोन दिवसांचा दौरा मेळघाटात

## विविध विकास योजनांचा घेतला आढावा

अजिंक्य भारत प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आपला जिल्ह्यातील पहिलाच दोन दिवसांचा दौरा दुर्गम मेळघाटातील धारणी तालुक्यात केला. या दौऱ्यात त्यांनी आदिवासी विकास, आरोग्य सेवा आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेतला. त्यांच्या या दौऱ्यामुळे स्थानिक प्रशासनाला विकासाची दिशा मिळाली आहे.



दौऱ्यात आदिवासी विकास विभागांतर्गत प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. या सभेत जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम, शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, नामांकित आश्रमशाळेतील प्रवेश तसेच इतर विविध योजनांवरील कामकाजाची माहिती घेण्यात आली. सर्व शासकीय योजनांचे लाभ तळागाळातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याबाबत जिल्हाधिकारी येरेकर यांनी सूचना दिल्या.

धारणी प्रकल्प कार्यालय येथे जिल्हाधिकारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या तिथीनिमित्ताने प्रतिमा पूजन करून मानवंदना अर्पण केली. त्यांनी शिवराज्याभिषेकाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांना प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

त्यानंतर त्यांनी धारणी तहसील कार्यालय येथे भेट देऊन पाहणी केली. नैसर्गिक आपत्तीमधील बाधित शेतकऱ्यांच्या ई-केवायसी आणि ॲग्रीस्टॅक नोंदणीविषयी संपूर्ण प्रक्रियेची माहिती घेतली. तसेच धारणी उपजिल्हा रुग्णालय येथे भेट देऊन जिल्हाधिकाऱ्यांनी अत्याधुनिक रक्तपेढीचे निरीक्षण केले आणि नवीन इमारतीची पाहणी केली. आरोग्य सेवांच्या दर्जाबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये दाखल असलेल्या कुपोषित बालकांच्या कुटुंबासोबत संवाद साधला. उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित 'सुसंवाद' कार्यक्रमात जिल्हाधिकाऱ्यांनी आशा सेविकांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा सेविकांचा सत्कार केला.

# आज चांदूरबाजारमध्ये सरकारविरोधात मुंडण आंदोलन

## बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाची धग

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि. ९ :** राज्यातील शेतकरी व दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी जनतेचा खंदा लढवय्या नेता, माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी कालपासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीस्थळ, मोझरी येथे बेमुदत अन्नत्याग उपोषणाला प्रारंभ केला आहे.दोन दिवस उलटूनही सरकारने कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्याने राज्य सरकारचा निषेध करण्यासाठी आज मंगळवारी सकाळी ११ वाजता शेकडो शेतकरी व दिव्यांग बांधव चांदुर बाजार तहसील कार्यालयावर मुंडन आंदोलन करणार आहेत.

राज्यातील लाखो शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी, शेतमजुरांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ, मनरेगाच्या मजुरीत वाढ, शेतमजुरांना विमा संरक्षण, सेंद्रिय खतांना अनुदान, तसेच दूध उत्पादकांना योग्य दर या प्रमुख मागण्यांसाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी मोझरी येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीजवळ दोन दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी सरकारने शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफी आणि सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आश्वासन पूर्ण केले नाही.

# शेगांव मार्गावरील तेलाई माता मंदिराची नवीन जागेत पायाभरणी

## आ.सौ. सुलभा खोडके यांच्या हस्ते तेलाई माता नवीन मंदिराचे भूमीपुजन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** जनतेला सुखसोयी उपलब्ध करून देण्यासह व विकासाला चालना देत असतांना कधीकधी अनेक बाबींचा विकासाला अडथळा निर्माण होतो. काही विषय हे जनतेच्या जिव्हाळ्याचे व त्यांच्या भावनांशी जुळलेले असतात. अशा परिस्थितीत काही कटू निर्णय घेऊन विकासाची वाटचाल पुढे करावी लागते. मात्र काही नवीन पर्याय शोधून जनतेच्या भावनेचा आदर करणेही महत्वाचे असते. जनतेच्या आस्थेतूनच विकासाला गती मिळणार असून तेलाई माता मंदिराची नवीन जागेत पायाभरणी झाल्याने शेकडो भाविकांची स्वप्नपूर्ती होणार असल्याचे भावोद्गार आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केले.



शेंगाव -रहांटगांव मार्गावरील पुरातन ग्राम दैवत तेलाई मातेच्या नूतन मंदिराचे विधिवत भूमिपूजन आ.सौ. सुलभाखोडके यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आमदार सौ. सुलभाताईंनी विधिवत पूजन करून या नूतन मंदिराची पायाभरणी केली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून साहू समाज अध्यक्ष रामचंद्र गुप्ता, तेलाई माता मंदिर ट्रस्ट अध्यक्ष - विनोद वडतकर, शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके , समाजसेवक प्रशांत उर्फ गुड्डू धर्माळे, रवी पंजाबी, तपोनेश्वर मंदिर अध्यक्ष अनिल भोजराज साहू, आर्किटेकट- प्रणय प्रमोद कापडे, दिलीप लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलतांना आ. सौ. सुलभाताई खोडके म्हणाल्या कि, शहरातील धार्मिक स्थळे हे आपले श्रद्धास्थान असून ते समाजविकासाचे शक्तिकेंद्र बनले आहे.

शहरात पायाभूत सुविधांची पूर्तता होत असतांना शहर सौदर्यीकरण तसेच धार्मिक स्थळांच्या विकास करण्याचा सुद्धा प्रयत्न आहे. धार्मिक स्थळाच्या ठिकाणी चांगल्या पायाभूत व भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी आपण नेहमीच कटिबद्ध असल्याची ग्वाही आमदार यांच्या वतीने देण्यात आली. यावेळी आपल्या प्रास्ताविकामधे गुड्डू धर्माळे यांनी शेंगाव-रहांटगांव मार्गावरील पुरातन तेलाई माता मंदिराचे धार्मिक महत्व विशद केले. याठिकाणी दरवर्षी नवरात्री उत्सव, कीर्तन , भागवत सप्ताह, दांडिया , संगीत संध्या व भजन उत्सव साजरे होत असून हे मंदिर जनतेच्या आस्थेशी जुळलेले आहे. या मंदिराच्या नवीन बांधकामसाठी आ.सुलभाताई खोडके यांनी पुढाकार घेतल्या बद्दल गुडू धर्माळे यांनी अभिनंदन व्यक्त केले. या कार्यक्रमाला सुरेश गावंडे, मंगेश नेरकर, सुभाष पाचपोर, मनीष ठाकरे, सुनील घुगे, सतीश चर्जन, मंगेश मोहने, सतीश सावळे, किशन कळंबे, प्रदीप निमकर, गजानन काळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व भाविक मंडळी उपस्थित होते.

# संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनेचे मानधन त्वरीत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे

## भिमक्रांती संघटनेची मागणी

## मानधन १५०० वरुन ५००० हजार करावे

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** गुरुवार, ५ जून रोजी भिमक्रांती सामाजिक संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणविस साहेब यांना जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे मार्फत संजय गांधी निराधार व श्रावण बाळ वृध्द निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांना गेल्या ६ ते ७ महिन्यापासून मानधन मिळाले नाही. ते त्वरीत मिळण्यात यावे याबाबतीत निवेदन पत्र देण्यात आले. संजय गांधी निराधार व श्रावणबाळ वृध्द निवृत्ती वेतन योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना मिळणाऱ्या लाभाची रक्कम १५०० रुपये वरुण ५००० रुपये मानधान वाढविण्यात यावे अशी मागणी योजनेचा निध याबाबत.



महाराष्ट्र राज्य शासनाने लाडकी बहीन योजनेसाठी महिला बाल विकास मंत्रालकडे 410 कोटी 30 लाख रुपये इतका सामाजिक न्याय व समाज कल्याण विभागाचा निधी वळविला ही माहीती खुद सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी दिली व त्या बद्दल संताप व्यक्त केला.राज्य शासनाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा निधी इतरत्र वळविल्यामुळे अनेक अपंग,निराधार,विधवा, परितत्या व तसेच संजय गांधी निराधार व श्रावणबाळ वृद्ध निवृत्ती वेतन योजनेचे पात्र लाभार्थी यांना गत ६ ते ७ महिण्यापासुन मिळणारी लाभाची रक्कम मिळाली नसल्याने त्यांचेवर उपासमारीची वेळ आली आहे. वृद्ध,अपंग,विधवा यांना याच योजनेचा आधार असल्यामुळे त्यांना औषधी,अन्न धान्य व उदरनिर्वाहाचे साधन नसलेल्यांना खुप अडचनिंचा सामना करावा लागत असुन त्यांना भिक मागण्याची वेळ आली आहे. सरकारने या विषयाकडे गाभिर्याने लक्ष द्यावे व या सोबतच सदर निराधार वृद्ध,विधवा,अपंग यांना मिळणारे तुटपुंजे रुपये १५०० मासिक मानधान मिळते त्यातही ६ ते ७ महिण्यापासुन त्यांना या लाभापासुन जाणिवपुर्वक वंचित ठेवल्या जात आहे.रुपये १५०० मध्ये निराधारांचे उदरनिर्वाह,औषधी उपचार होणे आजच्या महागाईच्या युगात कठीण झाले असून त्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे.तरी मायबाप सरकारने त्यांचे मासिक मानधन १५०० रुपये वरुन वाढ करुन ५००० रुपये मानधन करण्यात यावे सोबतच महाराष्ट्र राज्य शासनाने लाडकी बहीन योजनेसाठी महिला व बालविकास मंत्रालयाकडे वळविलेला सामाजिक न्याय व समाज कल्याण विभागाचा निधी शासनाने परत करावा तसेच अपंग, निराधार, वृध्द, परितक्त्या, विधवा यांना मिळणाऱ्या लाभाच्या योजना संजय गांधी निराधार व श्रावणबाळ वृध्द निवृत्ती वेतन योजनेचा निधी त्वरीत आठ ते दहा दिवसात पात्र लाभार्थयांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावा, यासोबतच मागासवर्गीय, अनुसूचित जाती तसेच आदिवासी यांच्यावर केला अन्याय! सदर निवेदनाची गांभिर्याने दखल घेण्यात यावी अन्यथा भिमक्रांती सामाजिक संघटना, महा.राज्य संघटनेच्या वतिने राज्यभर तिव्र जनआंदोलन छेडण्यात येईल असा इशारा भिमक्रांती सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपालभाऊ ढेकेकर यांनी दिला.निवेदन देते वेळी संस्थापक अध्यक्ष गोपाल ढेकेकर,अमरावती वि.स. महिला अध्यक्षा सरीता खंडारे, संत कबीर नगर शाखा अध्यक्षा मंगलाताई वानखडे, कमलताई खंडारे, सौ. रंजना डोंगरे, आशा वडे, परमानंद खीराळे, मनोज खंडारे, अमरावती कामगार जिल्हा अध्यक्ष सुमीत गणवीर, रुपेश कुत्तरमारे, शांती शाहू, सुनंदा खंडार,सुमन मेश्राम इत्यादी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# पावसाळ्या पूर्वीची उपाययोजना करण्यासाठी सर्व यंत्रणाप्रमुखांनी ठोस पावले उचलावी

## आ.रवी राणा यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे मागणी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. ९ :** पावसाळ्याला सुरुवात झाली आहे पावसाळ्यापूर्वी उपाययोजना तातडीने त्या त्या विभागाणे , त्या त्या यंत्रणा प्रमुखांनी ठोस पावले उचलावी. यासाठी पत्रात नमूद केलेल्या मुद्यावर नवनियुकक्त जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सर्व विभागास लेखी निर्देश देण्यात यावे. यासाठी अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती आ.रवी राणा यांनी ग्रामीण भागातील व अमरावती शहरी भागातील अनेक लोकाभिमुख मुद्दे पत्रात नमूद करून त्या मागणीचे पत्र आ.रवी राणा यांचे खाजगी सचिव उमेश ढोणे यांनी प्रथमता जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना शुभेच्छा देऊन तदनंतर लोकाभिमूक मागणींचे पत्र सोपविले.



पत्रांमध्ये नदी नाल्याला जे कठडे तुटलेले आहेत ते दुरुस्त करणे. विद्युत पोलवरिल लोमकळलेल्या विद्युत वाहिन्याट्ट तारा दुरुस्त करणे , वाकलेले विद्युत पोलट्ट जीर्ण झालेली विद्युत पोल दुरुस्त करणे जे वादळी वाऱ्यासह अतिवावासामुळे वरील पोल पडू शकतात.लोमकळू शकतात. ज्यापासून नागरिकांच्या जिवाला धोका होऊ शकतो. असे पोल दूरस्त करणे गरजेचे आहे. नाल्यामध्ये गाळ साचल्याने किंवा भराव असल्याने नाल्याचे पाण्याचा प्रवाहाला धोका निर्माण होऊ शकतो. ज्यामुळे पाण्याचा प्रवाह थांबून पावसाचे पाणी नागरीवस्तीमध्ये शिरत असते अशा घटना दरवर्षी होताना दिसतात.अशा नाल्यांमधील गाळ काढण्याचे नियोजन करणे.खोलीकरण रुंदीकरण करणे. शहराला जोडणारी ग्रामीण बारमाही रस्ते ज्या रस्त्यावर मोठे खड्डे पडलेले आहेत ते खड्डे पावसाचे पाणी साचून अधिक खोल होतात ज्यामुळे अनावधानाने प्रवाशांच्या वाहनाला अपघात होतात अशा रस्त्यावरील खड्डे बुजविणे डागडुजी करणे गरजेचे आहे. शहरातील व ग्रामीण भागातील जी झाडे जीर्ण झालेली आहेत तसेच काही ठिकाणी विद्युत पोल जंगलेली आहे.वाकलेली आहेत ती वादळी वाऱ्यासह येणाऱ्या पावसामुळे पडू शकतात ज्यामुळे जीवित आणि वित्तहानी नाकारता येत नाही.अशा घटना टाळण्यासाठी त्यांच्या त्या त्या विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे त्यासाठी जिल्हाधिकारी म्हणून संबंधित यंत्रणेला आपण निर्देश द्यावे असे पत्रात आमदार रवी राणा यांनी नमूद केले आहे त्या सविस्तर मागणीचे पत्र उमेश ढोणे यांनी नवनियुक्त आशिष येरेकर जिल्हाधिकारी यांना सोपविले आहे. हि कारवाही पूर्ण झाल्यास काहीं प्रमाणात नागरिकांना त्रास कमी होईल.

# अंजनगावबारी चावळी चौकात मोकाट जनावरांचा सुळसुळाट

## वाहतुकीस अडथळा;नागरिक त्रस्त ■ मोकाट जनावरांचा बंदोबस्त स्थानिक प्रशासन केव्हा करणार?

अजिंक्य भारत | साहेबराव राऊत

**अंजनगाव बारी, दि. ९ :** अंजनगाव बारीतील चौक येथे गेल्या काही महिन्यापासून मोकाट जनावरांचा ठिय्या रस्त्यावर पहायला मिळत असुन ये- जा करणाऱ्या नागरिकास तसेच वाहतूकीस अडथळा निर्माण होत असुन अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. ज्या परिसरात मोकाट जनावरांचा वावर आहे त्याठिकाणी जिल्हा परिषद मुलांची व मुलींची शाळा असुन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही जनावरे घोकादायक ठरत आहे. चौकाला मुख्य चार रस्ते जुळले असुन चौफुलीच्या मध्यभागी ही जनावरे बसुन घाण करुन लहान मुले व वृद्धाच्या ये-जा तसेच आरोग्याच्या दृष्टीने अडथळा निर्माण करत आहे.

कुठे ही जनावरे वाहतुकीचा मुख्य रस्ता रोखून ठेवत असुन अशा ठिकाणी हे मोकाट जनावरे मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण करत असल्याचे दिसत असुन गावालागूनच शेती असल्याने शेतकऱ्यांना उभ्या पिकांचे नुकसान झाल्याच्या घटनाही ऐकायला येत आहे. यावर स्थानिक ग्रा.पं.प्रशासनाने अंकुश लावून या जनावरांचा बंदोबस्त करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.



> चावळी चौकात लहान मुलांच्या शाळा तसेच वृद्धांना बसण्याची व्यवस्था असल्यामळे ये-जा करताना तसेच सायंकाळी रात्रीच्या अंधुक प्रकाशात ही जनावरे दिसत नसल्याने अचानक रस्त्यावर येतात. त्यामुळे अपघाताला कारणीभुत ठरत असल्याने स्थानिक प्रशासनाकडे याकडे गांभिर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.
>
> **अक्षय वाईकर, अंजनगाव बारी**

## घटना-घडामोडी



### क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांना दिग्रसमध्ये अभिवादन

**दिग्रस :** क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त सोमवारी दिग्रस येथील बिरसा मुंडा चौकात विविध सामाजिक संघटना आणि आदिवासी समाज बांधवांतर्फे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमास सेवानिवृत्त तहसीलदार बी.टी. कन्नाके, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक भीमराव खारोडे, आणि अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे तालुका अध्यक्ष पुरुषोत्तम कुडवे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्यासोबतच दिलीप जवादे, उत्तम सोळंके, विनोद नाटकर, गजानन गंडाळे, गजानन खरबडे, गजानन इंगळे, ससाणे, नितीन नाईक, लक्ष्मण डुकरे, परशराम डहाणे, पंजाब वानखेडे, संतोष महाराज, विनोद कोवे, भारत मेश्राम, आत्माराम पारधी, बालाजी खेकाळे, प्रज्वल पवार, अशोक मानतुटे, कैलाश कन्नाके, पारधी, पुरुषोत्तम इंगळे यांच्यासह अन्य अनेक समाज बांधव आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून बिरसा मुंडा यांच्या आदिवासी हक्कांसाठीच्या गौरवशाली लढ्याला आणि त्यांच्या सर्वोच्च बलिदानाला उजाळा देत, त्यांचे प्रेरणादायी विचार समाजात पुढे नेण्याचा संकल्प केला.



### समता साहित्य अकादमीतर्फे गुणवंतांचा गौरव

**यवतमाळ :** समता साहित्य अकादमी, यवतमाळ जिल्हा शाखेतर्फे नुकत्याच झालेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा प्रेरणादायी गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. अकादमीच्या राष्ट्रीय व जिल्हास्तरीय प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी अकादमीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. देवानंद तांडेकर, जिल्हाध्यक्ष दिलीप बारडे, महासचिव विजय बिजूलकर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सावरकर आणि सदस्य सुधीर राजूरकर या मान्यवरांच्या हस्ते गुणवंतांना सन्मानपूर्वक सन्मानित करण्यात आले. दहावीच्या परीक्षेत अत्यंत उज्ज्वल यश मिळवलेल्या गुणवंत गुंजन मिठे (९३.६०%), नारायणी हिंगलासपुरे (९२.६०%), रश्मी ज्ञानेश्वर ठवकर (९२%) आणि तन्मय अजय शिंदे (९२%) आदी विद्यार्थ्यांचा यावेळी उत्साहात विशेष गौरव करण्यात आला. याचबरोबर, बारावीच्या परीक्षेतही उल्लेखनीय यश प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाची आणि यशाची दखल घेऊन त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन देण्यासाठी हा प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित केला होता, अशी सविस्तर माहिती प्रसिद्धी प्रमुख जयदेव पाटील यांनी दिली.



### वटपौर्णिमेनिमित्त वटवृक्षांचे रोपण

**यवतमाळ :** मंगळवारी (दि. १० जून) येणाऱ्या वटपौर्णिमेचे औचित्य साधून आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी, यवतमाळ येथील प्रभाग क्रमांक २३ मध्ये सामाजिक कार्यकर्त्या प्रगती सुपलकर यांच्या पुढाकाराने वटवृक्षांच्या रोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. सामाजिक सद्भावनेच्या या उपक्रमात प्रभागातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. या उपक्रमाद्वारे पर्यावरण रक्षण आणि भारतीय संस्कृती जपण्याचा सुंदर, दुहेरी संदेश देण्यात आला. वटवृक्ष हा भारतीय संस्कृतीत अत्यंत पूजनीय असून, त्याचे रोपण करून सण साजरा करण्याचा हा अभिनव प्रयत्न अत्यंत स्तुत्य असल्याचे मत उपस्थित महिलांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला रश्मी दिवेकर, प्राजक्ता देशपांडे, ममता महाजन, सारिका वानखडे, नंदिनी सातारकर, सोनाली ढोबळे, नीता शिरभाते, प्रतिभा चौधरी, सुप्रिया रापर्तीवार, भारती वानखडे, रीना वानखडे, सपना चोपडे यांच्यासह प्रभागातील अन्य अनेक महिला उत्स्फूर्तपणे आणि मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होत्या.

### 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

**वणी :** जागतिक पर्यावरण दिनाचे (५ जून) औचित्य साधून आणि 'एक पेड माँ के नाम' या देशव्यापी उपक्रमाला प्रतिसाद देत, वणी येथील लक्ष्मीनारायण नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात नुकताच वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात विविध मान्यवरांनी सक्रिय सहभाग नोंदवला. कापूस पणन महासंघाचे संचालक संजय खाडे, पतसंस्थेचे अध्यक्ष ईश्वर खाडे, बाजार समितीचे सचिव अशोक झाडे, तसेच राजू धावंजेवार आणि परशुराम पोटे या प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. 'वृक्षारोपण हे केवळ एकदिवसीय कार्यक्रम न राहता, लावलेल्या प्रत्येक रोपाचे सातत्यपूर्ण संगोपन होणे अधिक आवश्यक आहे,' असे महत्त्वपूर्ण मत संजय खाडे यांनी यावेळी आवर्जून व्यक्त केले. या कार्यक्रमास महादेव दोडके, ज्ञानेश्वर बोनगीनवार यांच्यासह लक्ष्मीनारायण पतसंस्थेचे व्यवस्थापक चेतन मांडवकर, अनुज भट, प्रफुल चटकी, प्रसाद राजूरकर, कैलास खिरटकर, सचिन ढवस, भारती आगुलवार, सोनाली पालकर, प्रिया चावरे आदी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृक्षारोपण मोहिमेला दोन वर्षांपासून 'ब्रेक'

## पर्यावरणासाठी धोक्याची घंटा, तज्ज्ञांकडून चिंता व्यक्त, पाणीटंचाई, निधीअभावी योजना रखडली

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ,दि. ९ : जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांपासून वृक्षारोपण मोहीम थांबल्याने पर्यावरण तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. पाणीटंचाई, निधीअभावी रखडलेल्या या मोहिमेमुळे हवामान बदल, जैवविविधतेच्या ऱ्हासासारखे गंभीर धोके निर्माण झाले असून, ही धोक्याची घंटा आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमींकडून या गंभीर बाबीवर ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.**



### वृक्षारोपण थांबण्याची प्रमुख कारणे

**पावसाचे कमी प्रमाण आणि भूजल पातळी खालावल्याने निर्माण झालेली पाणीटंचाई, हे वृक्षारोपण थांबण्यामागे प्रमुख कारण आहे. यासोबतच, रोपे, लागवड आणि देखभालीसाठी लागणाऱ्या निधीची कमतरता, तसेच शासकीय धोरणांमधील बदल व प्रशासकीय उदासीनता यांमुळेही या महत्वपूर्ण मोहिमेला मोठा फटका बसला आहे.**

### पर्यावरणावर होणारे गंभीर परिणाम

**वृक्षारोपण थांबल्याने हवेतील कार्बन डायऑक्साइड वाढून हवामान बदलाचा धोका वाढेल. तापमान वाढ, अनियमित पाऊस वाढेल. वन्यजीवांचे नैसर्गिक निवासस्थान नष्ट झाल्याने जैवविविधतेचा ऱ्हास होईल. तसेच, झाडांअभावी मातीची धूप वाढून जमिनीची सुपीकता कमी होईल आणि नैसर्गिक परिसंस्थेचे संतुलन पूर्णपणे बिघडेल.**

गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रात, विशेषतः यवतमाळ आणि आसपासच्या परिसरात, मोठ्या प्रमाणात राबविल्या जाणाऱ्या वृक्षारोपण मोहिमांना अचानक 'ब्रेक' लागला आहे. या अनपेक्षित थांब्यामुळे पर्यावरण तज्ज्ञांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, याचे पर्यावरणावर दूरगामी आणि गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. केवळ झाडे लावणे थांबले नाही, तर पर्यावरणाच्या संरक्षणाच्या एका महत्वपूर्ण चळवळीला खीळ बसली आहे. यामागे अनेक गुंतागुंतीची कारणे असल्याचे दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने पावसाचे कमी झालेले प्रमाण आणि घटलेली भूजल पातळी यामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई हे एक मोठे कारण आहे. रोपांच्या वाढीसाठी पाण्याची नियमित उपलब्धता आवश्यक असते, मात्र पाण्याच्या कमतरतेमुळे ही मोहीम राबविणे कठीण झाले आहे. यासोबतच, आर्थिक आणि प्रशासकीय कारणेही तितकीच जबाबदार आहेत. वृक्षारोपणासाठी रोपे खरेदी, वाहतूक, लागवड आणि पुढील काही वर्षांसाठी त्यांची देखभाल यावर मोठा खर्च येतो. निधीच्या कमतरतेमुळे अनेक संस्था आणि शासकीय यंत्रणांना हा भार उचलणे अवघड झाले आहे. तसेच, सरकारच्या धोरणांमधील बदल किंवा प्रशासकीय उदासीनतेमुळेही अनेकदा अशा मोहिमांना अपेक्षित गती मिळत नाही. वृक्षारोपण थांबल्याने पर्यावरणावर होणारे परिणाम अत्यंत गंभीर आहेत. झाडांच्या कमतरतेमुळे हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढून हवेच्या गुणवत्तेत घट होते आणि हवामान बदलाचा धोका अधिक तीव्र होतो. यामुळे तापमान वाढ, अनियमित पाऊस आणि नैसर्गिक आपत्त्यांमध्ये वाढ होऊ शकते. तसेच, झाडे अनेक वन्यजीव, पक्षी आणि कीटकांचे नैसर्गिक निवासस्थान असल्याने, त्यांच्या ऱ्हासामुळे जैवविविधतेचे मोठे नुकसान होते. मातीची धूप वाढून जमिनीची सुपीकता कमी होण्याचाही धोका आहे. ही परिस्थिती म्हणजे पर्यावरणासाठी एक धोक्याची घंटा असून, यावर वेळीच गांभीर्याने विचार करून सरकारने, स्थानिक प्रशासनाने, स्वयंसेवी संस्थांनी आणि नागरिकांनी एकत्र येऊन या मोहिमेला पुन्हा गती देणे, ही काळाची गरज आहे.

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक घोषित

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.९:** जवाहर नवोदय विद्यालय समितीने २०२५-२६ या शैक्षणिक सत्रासाठीच्या प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. इयत्ता पाचवीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही प्रवेश परीक्षा शनिवार (दि. १३) डिसेंबर २०२५ रोजी होणार असून, अर्ज भरण्याची अंतिम मुदत मंगळवार (दि. २९) जुलै २०२५ आहे.

अर्ज भरताना पालकांनी काही बाबींची नोंद घेणे आवश्यक आहे. परीक्षेसाठी कोणताही शुल्क आकारले जाणार नाही, मात्र अर्ज नेट कॅफे किंवा आपले सरकार सेवा केंद्रावरूनच भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना मराठी, इंग्रजी किंवा हिंदी यापैकी परीक्षेचे माध्यम निवडता येईल. शाळेच्या स्थानानुसार ग्रामीण किंवा शहरी पर्याय निवडावा. आवश्यक कागदपत्रांमध्ये विद्यार्थ्यांचा फोटो, आधार कार्ड, पालक व विद्यार्थ्यांची सही, आणि तिसरी ते पाचवीच्या शालेय माहितीचा समावेश आहे. आरक्षणासाठी जात प्रमाणपत्र केंद्र सरकारच्या नियमांनुसार असणे बंधनकारक आहे. अर्ज सादर करण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या नावाची स्पेलिंग तपासून घ्यावी व आधार कार्ड अद्ययावत नसल्यास त्यास वेळ लागू शकतो, हे लक्षात ठेवावे. नोंदणीनंतर पालकांनी अर्जाची प्रत जपून ठेवावी. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जवाहर नवोदय परीक्षापूर्व मार्गदर्शन केंद्राच्या जिल्हाप्रभारी आम्रपाली बागेश्वर यांनी केले आहे.

# शेतीत जीएम तंत्रज्ञानावरील निर्बंध हटवा

## शेतकरी संघटनेची मागणी; सविनय कायदेभंगाचा इशारा



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ९ :** शेतीत जनुकीय अभियांत्रिकी (जीएम) व कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या तंत्रज्ञानावरील निर्बंध हटवावेत आणि डाळी-तेलबियांचा वायदे बाजारात समावेश करावा, अशी जोरदार मागणी शरद जोशी स्थापित शेतकरी संघटनेने केली आहे. शासकीय यंत्रणेने यात अडथळा आणल्यास तीव्र प्रतिकार व आंदोलनाचा इशाराही संघटनेने दिला.

एचटीबीटी कापूस बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी २०१९ पासून सुरू असलेले सविनय कायदेभंगाचे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा, व यात अडथळा आणणाऱ्या कृषी-पोलीस खात्यांच्या धाडींना प्राणघातक हल्ले समजून आत्मरक्षणार्थ प्रतिकार करण्याचा गंभीर इशारा संघटनेने दिला. पंजाब-हरियाणाप्रमाणे महाराष्ट्रानेही बायर कंपनीच्या जीएम मका चाचण्यांना तात्काळ ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे, अशी मागणी केली. वायदे बाजारातून वगळल्याने डाळी-तेलबियांचे भाव पडले असून, विशेषतः सोयाबीनचा वायदे बाजारात समावेश न झाल्यास सप्टेंबरमध्ये 'सेबी' कार्यालयाला घेराव घालण्याचा इशारा दिला. ही मागणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा अध्यक्ष असलेल्या मंत्री गटाकडे तातडीने केली आहे.

# अपघातात एक जण ठार

**घाटंजी, दि. ९ :** शेतातील सौरऊर्जेचे काम करण्यासाठी आर्णीवरून कुऱ्हा येथे दुचाकीने जात असताना, अचानक गाय आडवी आल्याने झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या इसमाचा नागपूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. किशोर गुलाबराव खडसे असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे. किशोर खडसे हे त्यांच्या शेताकडे जात असताना, अचानकपणे गाय आडवी आल्याने त्यांच्या दुचाकीवरील नियंत्रण सुटले व अपघात झाला. यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले होते, मात्र तेथे त्यांची प्राणज्योत मालवली. याप्रकरणी ज्ञानेश्वर गुलाबराव खडसे यांनी दिलेल्या तक्रारीवरून, अपघातास कारणीभूत ठरल्याने मृत किशोर खडसे यांच्याविरुद्धच गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# ललित गजभिये प्रकरणी पोलिसांच्या भूमिकेची चौकशी करण्याचे आदेश

**यवतमाळ, दि.९:** येथील व्यावसायिक ललित गजभिये यांनी, पोलिसांनी रेती तस्करांशी संगनमत करून आपल्याला एका खोट्या गुन्ह्यात अडकवल्याचा आरोप करत न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणाची गंभीर दखल घेत केळापूर येथील विशेष सत्र न्यायालयाने २९ मे २०२५ रोजी वणीच्या उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांना (एसडीपीओ) या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

ललित गजभिये हे मालमत्ता खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांनी १२ सप्टेंबर २०२३ रोजी मारेगाव तालुक्यातील कोसारा घाटावरील रेती तस्करीबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. याच तक्रारीचा राग मनात धरून, मारेगाव पोलिसांनी कथित रेती तस्कर सय्यद मन्सूर सय्यद दाऊद, सय्यद कादर सय्यद दाऊद यांच्याशी संगनमत करून, आपल्यावरच देशी कट्टा दाखवून खंडणी मागितल्याचा खोटा गुन्हा दाखल केला, असा गजभिये यांचा आरोप आहे. यानंतर स्थानिक गुन्हेशाखा व मारेगाव पोलिसांनी आपल्याला अटक करून दोन महिने तुरुंगात डांबले आणि घरातून शस्त्र जप्त केल्याचा बनाव रचल्याचेही त्यांनी म्हटले आहे. वरिष्ठ अधिकारी व शासनाकडे दाद मागूनही न्याय न मिळाल्याने त्यांनी केळापूर न्यायालयात केस दाखल केली. गजभिये यांनी घटनेच्या वेळी स्वतः:च्या कार्यालयात असल्याचे सीसीटीव्ही फुटेज व इतर महत्त्वपूर्ण पुरावे न्यायालयात सादर केले. या पुराव्यांची दखल घेत अतिरिक्त सत्र न्यायाधीश एच. एस. सातभाई यांनी 'एसडीपीओ' यांना चौकशीचे आदेश दिले. यापूर्वीच नागपूर खंडपीठाने गजभिये यांच्याविरुद्धच्या 'एफआयआर'ला स्थगिती दिली आहे. सदर प्रकरणात सय्यद मन्सूर सय्यद दाऊद, स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलिस अधिकारी आधारसिंग सोनवणे, विवेक देशमुख, जनार्दन खंडेराव, ज्ञानेश्वर सावंत, सय्यद कादर सय्यद दाऊद, सय्यद दाऊद सय्यद मुसा हे प्रतिवादी आहेत. प्रतिवादीतर्फे करण्यात आलेले अनेक अर्ज सुद्धा केळापूर तसेच उच्च न्यायालयाने फेटाळून लावले असल्याने न्यायालयाच्या अंतिम निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ललीत गजभिये यांच्या वतीने पांढरकवडा येथील न्यायालयात वकील सिद्धार्थ लोढा तर उच्च न्यायालयात संकेत भांडारकर केस लढत आहे.

# धोंडेपीर बाबांचा संदल उत्साहात

## उमरखेड येथे हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दर्शन



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ९ :** सुफी संतांची भूमी म्हणून ओळख असलेल्या उमरखेड शहरात, बकरी ईदचे औचित्य साधून धोंडेपीर बाबांचा वार्षिक उर्स आणि संदल मिरवणूक ७ जून रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी झाली. शहरातील गांधी चौकातून निघालेल्या या मिरवणुकीत शेकडो चाहते व सर्वधर्मीय नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

उमरखेड शहरातील अनेक प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत या भव्य संदल मिरवणुकीचा समारोप धोंडेपीर बाबा यांच्या दर्ग्यावर अत्यंत भक्तिभावाने करण्यात आला. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या सर्व हिंदू-मुस्लीम बांधवांचे आणि चाहत्यांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. यामध्ये मुजावर सय्यद नूर, सय्यद वाहेद, माजी नगरसेवक सय्यद अफसर, तसेच सय्यद इब्राहिम, सय्यद वसीम, सय्यद आवेस, सय्यद सरफराज, सय्यद अमन, सय्यद मोसिन आणि सय्यद इमरान यांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उमरखेड पोलिसांनी संपूर्ण मिरवणूक मार्गावर अत्यंत चोख बंदोबस्त ठेवला होता. या परंपरेतून शहरातील सामाजिक सलोखा अधिक दृढ होत असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# सावळीकरांनी दिलेली प्रेमाची शिदोरी न संपणारी!

## ठाणेदार संदीप बारींगे : कर्तव्यनिष्ठ आणि संवेदनशील अधिकाऱ्याला प्रेस क्लबकडून भावपूर्ण निरोप

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**सावळी सदोबा, दि. ९ :** ठाणेदार संदीप बारींगे यांच्या बदलीमुळे हळहळलेल्या सावळी सदोबावासीयांनी आणि प्रेस क्लबने त्यांना भावपूर्ण निरोप दिला. त्यांच्या लोकाभिमुख कार्याचे कौतुक झाले, तर ङ्गतुमच्या प्रेमाची शिदोरी कायम सोबत राहील,ङ्ख असे बारींगे भावुकपणे म्हणाले.



### लोकाभिमुख कार्याची अनोखी छाप

**ठाणेदार संदीप बारींगे यांनी आपल्या कार्यकाळात नागरिकांच्या समस्या संवेदनशीलतेने सोडवण्यावर भर दिला. गुन्हेगारीवर कठोर कारवाई करत असतानाच, त्यांनी तरुणांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण केले. त्यांच्या याच लोकाभिमुख कार्यामुळे ते अल्पावधीतच अत्यंत लोकप्रिय ठरले आणि परिसरातील नागरिकांच्या मनात त्यांनी आदराचे स्थान मिळवले.**

पारवा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सावळी सदोबा पोलीस दूरक्षेत्रात आपल्या कार्यकाळात लोकाभिमुखतेचा नवा आदर्श निर्माण करणारे ठाणेदार संदीप बारींगे यांची नुकतीच प्रशासकीय बदली झाली. त्यांच्या बदलीमुळे संपूर्ण परिसरात एक भावनिक वातावरण निर्माण झाले असून, एका कर्तव्यनिष्ठ आणि संवेदनशील अधिकाऱ्यला निरोप देताना नागरिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नेतेही हळहळले. त्यांच्या सन्मानार्थ सावळी सदोबा प्रेस क्लब संघटनेच्या वतीने नुकतेच एका निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या कार्यकाळात ठाणेदार बारींगे यांनी येणाऱ्या प्रत्येकाला सन्मान देणे, प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणे, नागरिकांच्या समस्या तात्काळ आणि संवेदनशीलतेने सोडवणे, गुन्हेगारीवर कठोर कारवाई करणे आणि तरुणांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करणे या गुणांमुळे अल्पावधीतच सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजवले होते. प्रेस क्लब संघटनेच्या सदस्यांनी आपल्या भाषणात, ङ्गबारींगे यांनी कायद्याची कडक अंमलबजावणी करताना माणुसकीचा विसर कधीच पडू दिला नाही,ङ्ख या शब्दांत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. या कार्यक्रमात आपल्या भावना व्यक्त करताना ठाणेदार संदीप बारींगे स्वतः भावुक झाले. ते म्हणाले, ङ्गसावळी परिसरातील नागरिकांनी जी माणुसकीची भावना आणि प्रेमाची शिदोरी दिली आहे, ती मी कधीच विसरणार नाही. हीच शिदोरी मला पुढील वाटचालीत बळ देईल. प्रशासकीय निर्णयामुळे मी जरी येथून जात असलो, तरी या भागातील माणसे माझ्या मनात कायम घर करून राहतील.ङ्ख या कार्यक्रमाला अरविंद चव्हाण, जे.बी. पठाण, श्रीकांत देशमुख, सुरेश पवार, दुर्गेश कर्नेवार, सुरेश राठोड, मोहम्मद सर्वे, रमेश राठोड, आकाश राठोड, धनराज पवार, राहुल राऊत, असिफ सुमार, राजेश नागोसे, अजय मारबते, हरीश खरात, विनायक कोट्टावार, परषोत्तम नेवारे यांच्यासह अनेक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, तरुण नेते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतीच्या मालकी हक्कावरून वाद

**वडकी, दि. ९ :** शेतीच्या मालकी हक्कावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीला दगड व स्प्रिंकलरच्या पाईपने मारहाण केल्याची घटना वडकी येथे नुकतीच घडली. याप्रकरणी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी रोहीत बाबाराव धोटे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी नितीन मदन हिकरे व कृष्णा झाडे यांनी फिर्यादीसोबत वाद घातला. 'या शेताचा मालक मी आहे, तू शेतातून बाहेर निघ,' असे म्हणत त्यांनी शिवीगाळ केली. त्यानंतर वादाचे रूपांतर मारहाणीत होऊन आरोपींनी दगड व स्प्रिंकलरच्या पाईपने रोहीत धोटे यांना मारहाण केली. या तक्रारीवरून पोलिसांनी नितीन हिकरे व कृष्णा झाडे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## थोडक्यात

### १५ हजारांचा मुद्देमाल लंपास

**यवतमाळ :** शहरातील झांवर लेआउट येथील एका बंद घराचे कुलूप तोडून अनोळखी चोरट्याने आत प्रवेश केला. ही घटना ५ जूनच्या सायंकाळपासून ते ६ जूनच्या सकाळदरम्यान घडली. फिर्यादी दिलीप लक्ष्मणराव तोडसे (वय ६३) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चोरट्याने घरातील बेडरूममधील कपाटातून १३,००० रुपये रोख आणि २,००० रुपये किमतीचे फास्टट्रॅक कंपनीचे घड्याळ असा एकूण १५,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी ८ जून रोजी गुन्हा नोंदवून अनोळखी आरोपीचा शोध सुरू केला आहे. शहरात गत काही दिवसांपासून चोरी, घरफोडी, जबरी चोरी अशा घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे.

### पत्नीला विळ्याने मारून केले जखमी

**यवतमाळ :** अमराईपुरा येथे कुल्फीवाल्यासोबत का बोलत आहेस, या कारणावरून झालेल्या वादात एका व्यक्तीने फिर्यादीस मारहाण केली. ही घटना ७ जून रोजी सायंकाळी घडली. रघुसिंग पवार (वय ४०) यांच्या तक्रारीनुसार, आरोपी नितीन बबनराव पवार (वय २३) याने त्यांना थापडाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच दुकानातील विळा उचलून मारण्याचा प्रयत्न केला असता, फिर्यादीची पत्नी मध्ये आल्याने त्यांच्या हाताच्या पंजाला विळा लागून त्या जखमी झाल्या. याप्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी ८ जून रोजी गुन्हा नोंदवून आरोपीविरुद्ध कारवाई सुरू केली आहे.

### दोन वाहनांची समोरासमोर धडक

**यवतमाळ :** शहरातील वनवासी मारुती पेट्रोलपंपासमोर ७ जून रोजी रात्री दोन चारचाकी वाहनांची समोरासमोर धडक झाली. यात एक चालक जखमी झाला असून वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. संजीव मॅथ्यु (वय ५९) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते त्यांच्या कारने (एमएच-२९ आर ३५८०) जात असताना, विरुद्ध दिशेने आलेल्या एमएच-२९ बीपी १०८९ क्रमांकाच्या कार चालकाने निष्काळजीपणे गाडी चालवून त्यांच्या वाहनाला धडक दिली. यात ते स्वतः जखमी झाले व वाहनाचे २०,००० रुपयांचे नुकसान झाले. अवधूतवाडी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

# अनधिकृत कपाशी बियाण्यांचा साठा जप्त

## बाभूळगावात कृषी व पोलिस विभागाची संयुक्त कारवाई, १२ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**बाभूळगाव, दि. ९:** येथील पोलिस आणि कृषी विभागाने केलेल्या एका मोठ्या संयुक्त कारवाईत, प्रतिबंधित अनधिकृत कपाशी बियाणांचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत पाच लाख १६ हजार रुपयांच्या बियाण्यांसह दोन वाहने असा एकूण १२ लाख १६हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी, तिघांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाभूळगाव बस स्थानक परिसरात एका इको गाडीतून (क्र. एमएच २९/सीबी २६९०) प्रतिबंधित कपाशी बियाण्यांची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. याआधारे, जिल्हा परिषद मोहीम अधिकारी प्रवीण जाधव, मंडळ कृषी अधिकारी संजय पवार, विस्तार अधिकारी सी. एस. हेडाऊ आणि स्थानिक पोलिस पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. या कारवाईत, किशोर रामराव वाटमोडे (रा. गवंडी) यांच्या बाभूळगाव येथील 'किशोर इलेक्ट्रिक ॲण्ड रिवाइंडिंग' दुकानाच्या गोदामातून आणि आसेगाव (देवी) येथील ज्ञानेश्वर किसन साखरकर यांच्या घरातून 'उद्यम', 'ग्लायफो गार्ड', 'तिलक' या नावांची एकूण ४०० पॅकेट अनधिकृत कापूस बियाण्यांची जप्त करण्यात आली. या बियाण्यांची अंदाजित किंमत पाच लाख १६ हजार ७५० रुपये आहे. तसेच, गुन्ह्यात वापरलेली सात लाख रुपये किमतीची दोन चारचाकी वाहनेही जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी पंचायत समितीचे कृषी अधिकारी किशोर अंबारकर यांच्या तक्रारीवरून प्रवीण वासुदेव साखरकर, रमेश सुखदेव लांजेवार आणि किशोर रामराव वाटमोडे (सर्व रा. गवंडी) या तीन आरोपींविरुद्ध बियाणे कायदा, पर्यावरण संरक्षण कायदा, कापूस बियाणे अधिनियम आदी विविध कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, कृषी विकास अधिकारी लहुदास आडे व मोहीम अधिकारी प्रवीण जाधव यांच्या मार्गदर्शनात पार पडली.

### लोणीत 5.40 लाखांचे बोगस बियाणे जप्त



**राळेगाव,दि.9:** स्थानिक गुन्हे शाखेच्या माहितीवरून कृषी अधिकारी मनिषा पाटील यांनी लोणी येथे धाड टाकून 5.40 लाखांची 50 बोगस कापूस बियाणे पाकिटे जप्त केली. ही पाकिटे प्रशांत विठ्ठलराव भोकरे यांच्या घराशेजारील शेडमध्ये कुटारात लपवली होती. विनापरवाना व प्रतिबंधित बियाणे साठवल्याप्रकरणी राळेगाव पोलिसांत गुन्हाही दाखल झाला आहे. नीलेश भोयर, राहुल वंजारी यांनी कारवाईत सक्रिय सहभाग घेतला. शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करून फसवणूक टाळावी, असे आवाहन पाटील यांनी केले. लोणी येथील पोलिस पाटील प्रशांत भोकरे हे अनेक वर्षांपासून अनधिकृत बियाणे विकण्याचा व्यवसाय करत असल्याची संतप्त चर्चा परिसरात आहे. या अवैध धंद्यातून मोठी आर्थिक उलाढाल करून ते मालामाल झाल्याचे बोलले जात आहे. असे अनेक जण शेतकऱ्यांना गोड बोलून, प्रतिबंधित बियाणे पेरणीसाठी भाग पाडून त्यांची फसवणूक करत असल्याचेही समोर येत आहे.

### CAPTION दुसऱ्यांदा रौप्य...




**यवतमाळ : जगात सर्वांत अवघड मानली जाणारी 'रेस'म्हणजे 'कॉम्रेड मॅराथन'(द अल्टीमेट ह्यूमन रेस) ही होय. कॉम्रेड्स मॅरेथॉनच्या इतिहासाच्या 98वर्षांत देशासाठी सलग दोनदा 'रौप्य पदक' जिंकणारा देव पंचफुला श्रीरंग चौधरी (अप रन-डाऊन रन) याने स्वत:चेच रेकॉर्ड मोडले. यावर्षी 7:03 तासांत 90 किलोमीटरचे अंतर पार करीत त्याने भारताचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर लिहिले.**

# पांढरकवडा बसस्थानकावरील चोरीचा दिवसभरातच पर्दाफाश

## नऊ जणांची आंतरजिल्हा टोळी जेरबंद; लाखोंचा ऐवज जप्त

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पांढरकवडा, दि.९:** पांढरकवडा बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेऊन एका महिलेच्या बॅगेतील १०६ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश करण्यात पांढरकवडा पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी नऊ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून ९.७५ लाख रुपयांचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली ४.५० लाख रुपयांची कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

घटनेची माहिती अशी की, ९ मे २०२५ रोजी दुपारी दीड वाजता आरती विशाल भागानगरकर (वय २५, रा. बालाजीनगर, बोरी-पाटण) या माहेरी जाण्यासाठी यवतमाळ बसमध्ये चढत असताना, अनोळखी चोरट्याने त्यांच्या बॅगेतील सोन्याचे दागिने चोरले होते. याप्रकरणी पांढरकवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस उपनिरीक्षक नितीन सुशीर आणि त्यांच्या डी.बी. पथकाने गुन्ह्यात वापरलेल्या वाहनाचा शोध घेतला. यातून आरोपी चालक आशीष गणेशराव वाडीव आणि साहिल भेदन पुरबले (दोघे रा. वर्धा) यांना अटक केली. त्यांच्या चौकशीतून बसस्थानकावर चोऱ्या करणाऱ्या महिलांच्या टोळीचा छडा लागला. यामध्ये सत्यफुला भेदन पुरबले (६०), रोशना लखन शेंडे (४०), कमलाबाई रमेश राखेडे (६०), भुली नाजीम शाह (२५), आणि मिलन सिकंदर शाह (२८) (सर्व रा. फुलफैल, वर्धा) यांचा समावेश आहे. चोरीचे सोने विकणारा त्यांचा साथीदार करण भेदन पुरबले (रा. कन्हान) आणि सोने खरेदी करणारा कन्हान येथील सराफ राकेश गंगाप्रसाद गुप्ता यांनाही आरोपी करण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक दिनेश झांबरे यांच्या मार्गदर्शनात पोउपनि नितीन सुशीर व त्यांच्या पथकाने केली आहे.

# उमरखेडमध्ये जुन्या वादातून तरुणाचा निर्घृण खून

## आठवडी बाजारात मध्यरात्री थरार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**उमरखेड, दि.९:** शहरातील आठवडी बाजार परिसरात जुन्या वादातून दोन गटात झालेल्या सशस्त्र हल्ल्यात एका २५ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली. रविवार (दि. ८) जून रोजी मध्यरात्री घडलेल्या या घटनेमुळे उमरखेड शहरात पुन्हा एकदा टोळीयुद्धाची दहशत पसरली आहे.

मयत शेख अजहर उर्फ शुटु शेख अकबर (वय २५) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. रविवारी रात्री ताजपुरा वॉर्डमध्ये दोन गटांत भांडण झाले होते. त्यानंतर मध्यरात्री १२:३० च्या सुमारास आठवडी बाजार परिसरात दोन्ही गट पुन्हा समोरासमोर आले. यावेळी आरोपी शेख मुदस्सीर शेख जमील, शेख सोहेल शेख जमील, शेख उबेद शेख निसार, शेख आशिर शेख खतीब व त्यांच्या तीन ते चार साथीदारांनी संगनमत करून शेख अजहर याच्यावर चाकू, तलवार आणि रॉडने जीवघेणा हल्ला केला. रक्तबंबाळ झालेल्या अजहरला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी मयताच्या भावाच्या तक्रारीवरून उमरखेड पोलिसांनी आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवला आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

# डोळंबा येथे वादळी पावसाचे थैमान

## घरांवरील टिनपत्रे उडाली; वाहतूक ठप्प, पिकांचे नुकसान

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि. ९ :** तालुक्यातील डोळंबा, कोपरा आणि महागाव परिसरात सोमवारी, (दि. ९) जून रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार थैमान घातले. यात अनेकांच्या घरांवरील टिनपत्रे उडून गेली, तर मोठमोठी झाडे उन्मळून पडल्याने जनजीवन विस्कळीत होऊन मोठे नुकसान झाले.

सकाळपासूनच्या असह्य उकाड्यानंतर आलेल्या या वादळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. हाता-तोंडाशी आलेली शेतातील तीळ, उन्हाळी ज्वारी पिकांसह आंब्याच्या फळबागांचेही अतोनात नुकसान झाल्याने बळीराजा पूर्णपणे हवालदिल, चिंतातूर झाला आहे. शिवारातील एका शेतातील गोठ्यावर भलेमोठे झाड कोसळून गोठ्याचेही प्रचंड नुकसान झाले. वादळी वाऱ्यामुळे रस्त्यावरील मुख्य लाईनचे विद्युत खांब कोसळल्याने कोपरा ते डोहंबा मार्गावरील वाहतूक अनेक तास ठप्प व पूर्णपणे बंद होती. तसेच, आर्णी-दिग्रस मार्गावरील कोपरा-पिंपरी फाट्यासमोरही वडाच्या झाडाचा एक मोठा भाग कोसळल्याने वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. या पावसाने वातावरणात मात्र काही काळ सुखद गारवा निर्माण केला होता.

### अखेर मृग बरसला; जोरदार हजेरी

**पाटण (बोरी), दि.९:** उन्हाच्या तीव्रतेने लाहीलाही झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा देत, मृग नक्षत्राच्या प्रारंभासोबतच पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. ८ जून रोजी मृग नक्षत्राला सुरुवात झाल्यानंतर काही तासांतच पावसाला सुरुवात झाली. आज, सोमवारी (दि. ९) जून २०२५ रोजी तर सोसाट्याचा वारा, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस बरसल्याने सर्वत्र पाणीच पाणी झाले. ३० मे पर्यंत झालेल्या अवकाळी पावसामुळे यंदा दुबार पेरणीची वेळ येते की काय, या चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी हे मॉन्सूनचे आगमन अनपेक्षित असले तरी अत्यंत दिलासादायक ठरले आहे. या पावसामुळे आता खऱ्या अर्थाने पेरणीच्या कामांना वेग येणार आहे.

# आरोग्य पतसंस्था निवडणुकीत 'एकता पॅनेल'चा एकतर्फी विजय

## 'परिवर्तन'चा धुव्वा : जयसिंगपूरे, मोटकेंच्या नेतृत्वाला पुन्हा कौल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.९:** जिल्हा आरोग्य सेवा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या निवडणुकीत, अशोक जयसिंगपूरे आणि अशोक मोटके यांच्या नेतृत्वाखालील 'एकता पॅनेल'ने विरोधी 'परिवर्तन पॅनेल'चा धुव्वा उडवत एकतर्फी विजय मिळविला. टिळक स्मारक मंदिरात झालेल्या मतमोजणीनंतर सोमवारी हे निकाल जाहीर झाले.

गेल्या २८ वर्षांपासून अध्यक्षपदी असलेल्या अशोक जयसिंगपूरे यांनी सेवानिवृत्त होऊनही आपले निर्विवाद वर्चस्व कायम राखल्याचे या निकालातून पुन्हा एकदा स्पष्ट झाले. एकता पॅनेलचे आरक्षित जागांवर केवल पाटील (३०१) व अनिल जयसिंगपूरे (३०१); महिला राखीव जागांवर हेमलता वैद्य (२९८), संगीता किनाके (२८४), योगिता खोडके (२८४), कल्पना कोतपल्लीवार (२८२) व निर्मला जाधव (२७८). सर्वसाधारण गटातून किशोर चिंतावार (२९१), रमेश अवघन (२८७), संजीव जानकर (२८३), जयंत करोडदेव (२८०), पुरुषोत्तम शेणमारे (२७८), अमोल पिंगे (२७६) व खान इरशाद अयुब खान (२७२) मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. पंजाब ढवळे हे यापूर्वीच बिनविरोध निवडून आले होते.

# 'हिरवे स्वप्न'साकारण्यासाठी 'पिवळ्या दागिन्यां'ची मोड

## शेतकरी राजाचे अर्थचक्र विस्कळित : अस्मानी-सुलतानी संकटे पाचविलाच, नव्या आशेने पुन्हा पेरणीची तयारी!

**राळेगाव तालुक्यात खरीप हंगामातील 'हिरवे स्वप्न' साकारण्यासाठी, शेतकरी आपल्या घरातील महिलांचे दागिने (स्त्री-धन) मोडून पेरणीसाठी पैसा उभारत आहेत. मागील हंगामातील अस्मानी-सुलतानी संकटांनी खचलेला शेतकरी, नव्या आशेने पुन्हा एकदा खरीप पेरणीसाठी सज्ज झाला आहे.**



**कैलास कोडापे**
राळेगाव
**तालुका वार्तापत्र**

एका दाण्यापासून शंभर दाणे पिकविण्यासाठी शेतात अहोरात्र कष्ट करणाऱ्या बळीराजाचे 'हिरवे स्वप्न'(यशस्वी हंगाम) साकार करण्यासाठी, त्याच्या घरातील महिला आपल्या अंगावरचे सोने-चांदीचे दागिने मोडून आर्थिक हातभार लावत असल्याचे हृदयद्रावक चित्र राळेगाव तालुक्यात दिसत आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर, सराफांकडे नवीन दागिने खरेदी करण्यापेक्षा जुने दागिने विकण्याचे (मोड) किंवा गहाण ठेवण्याचे प्रमाण वाढले आहे. हे चित्र तालुक्यातील भीषण कृषी संकटाची साक्ष देत आहे. राळेगाव हा आदिवासीबहुल तालुका आहे. येथील ७० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. तालुक्याच्या निर्मितीला चाळीस वर्षे होऊनही येथे एकही मोठा उद्योग-धंदा किंवा कारखाना नाही. शेती हाच एकमेव मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण वर्षभराचे आर्थिक गणित केवळ खरीप हंगामावर अवलंबून असते. मात्र, गेल्या काही हंगामापासून शेतकरी अस्मानी आणि सुलतानी अशा दुहेरी संकटात सापडला आहे. मागील वर्षी सोयाबीनवर आलेल्या रोगाच्या प्रादुर्भावाने आणि नंतर काढणीच्या वेळी झालेल्या परतीच्या पावसाने हजारो क्विंटल पिकाचे नुकसान झाले. यातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात तीळ, मूग, शेंगदाणा, ज्वारी यांसारखी पिके घेतली, पण तेथेही निसर्गाने साथ दिली नाही. ऐन काढणीच्या वेळी मे महिन्यात आलेल्या अवकाळी पावसाने रब्बी पिकांचेही अतोनात नुकसान केले. त्यातच, कापूस आणि सोयाबीनला बाजारात अपेक्षित भाव न मिळाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक चक्र पूर्णपणे विस्कळित झाले आहे. एवढे मोठे नुकसान होऊनही, शेतकऱ्यांनी हिंमत न सोडता नव्या खरीप हंगामासाठी पुन्हा कंबर कसली आहे. आर्थिक संकटात सापडलेल्या आपल्या घरधन्याचे मनोबल वाढविण्यासाठी आणि पेरणीसाठी पैसा उभा करण्यासाठी, घरातील महिलाच पुढे येऊन आपले दागिने देत आहेत. यंदा तरी दमदार पाऊस होऊन विक्रमी उत्पादन हाती पडेल, या एकाच आशेवर शेतकरी आता आभाळाकडे मृग कधी बरसतो याकडे डोळे लावून बसला आहे.

### कृषिकर्ज खरिपातील पेरणीच्या उपयोगी पडेना

**राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून शेतकऱ्यांना कृषिकर्ज दिले जाते. परंतु, बँकांकडून खरीप हंगामाकरीता वेळेवर कृषिकर्ज मिळत नाही. आजही तालुक्यातील ७०टक्के शेतकऱ्यांना कृषिकर्ज मिळालेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना एकतर सावकाराच्या दारी जावे लागते किंवा स्त्री-धन मोडून पैसे मिळवावे लागते. याला व्यवस्था जबाबदार असून याकडे लोकप्रतिनिधींचे लक्ष नसते, प्रशासन कागदपत्रांची पूर्तता करण्यात धन्य मानते. मात्र, जगाचा पोशिंदा आपली लढाई कशी लढते हे त्याचे त्यालाच ठाऊक असते.**

# आर्णी शहरात महिलांसाठी शौचालये बांधण्याची मागणी

## 'वंचित'चे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**आर्णी, दि.९:** आर्णी शहरात महिलांसाठी सार्वजनिक शौचालये नसल्याने विद्यार्थिनी व महिलांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी, प्रमुख ठिकाणी शौचालये बांधावीत, अशी जोरदार मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. अध्यक्ष उत्तम मुनेश्वर यांनी यासंदर्भात नगरपरिषदेला निवेदन दिले असून, शौचालयांची कामे ताबडतोब सुरू न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

आर्णी शहराला अनेक खेडी जोडलेली असून, हायस्कूल ते पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी परिसरातील खेड्यापाड्यातील हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी दररोज येथे येतात. शहरात एकच मुख्य रस्ता असल्याने त्यावर मोठी वर्दळ असते. मात्र, या रस्त्यावर कुठेही महिलांसाठी स्वच्छतागृह नसल्याने त्यांची मोठी कुचंबणा होते. नगरपरिषदेचा हा कारभार 'लज्जास्पद' असल्याची टीका निवेदनातून करण्यात आली आहे. महाळुंगी पॉइंट, माहूर चौक, बसस्थानक चौक, शिवनेरी चौक आणि पाण्याच्या टाकीजवळ अशा पाच मोक्याच्या ठिकाणी तातडीने महिलांसाठी शौचालय गृह बांधावीत, अशी मागणी करण्यात आली.